
आम्ही

# पार्लेकर

१९११ पासून


वार्षिक विशेषांक २०२२



**Atharv**

*Redefining Vile Parle*

# IT'S ALL ABOUT LAYOUT



## COMING TO
## UPPER VILE PARLE

+91 77388 66111/+91 89767 58404 | sales@atharvlifestyle.com

veenaworld.com



# वीणा वर्ल्ड युरोप 2023

डिस्काउंट्स ☒ छुपे खर्च ☒
ऑप्शनल्स ☒ गिमिक्स ☒

☑ फक्त आणि फक्त आयुष्यभर ☑
## आठवणीत राहतील असे आनंदाचे क्षण!

प्रत्येक भारतीयाने मनामनात जोपासलेलं स्वप्न म्हणजे युरोप. आयुष्यात एकदातरी युरोपवारी करायची ही प्रत्येकाची आंतरिक इच्छा, आणि म्हणूनच आम्ही म्हणतो तुमच्या स्वप्नातील युरोपची पूर्तता करताना योग्य निर्णय घ्या, छोट्या आमिषापोटी मोठा आनंद दवडू नका. वीणा वर्ल्ड आहे ना!
आमचं एकच लक्ष्य, 'तुम्ही वीणा वर्ल्डसोबत निर्धास्तपणे युरोप बघा, जास्तीत जास्त युरोप बघा, बाकी सर्व आमच्यावर सोपवा. आम्ही आहोत तुमचं युरोपचं स्वप्न आनंदात साकार करायला, काळजी नसावी.'

## चलो, बॅग भरो, निकल पडो! वीणा वर्ल्डसोबत युरोपला!

लवकरात बुकिंग करा आणि युनायटेड किंगडम (UK) तसेच युरोपमधील अनेक देशांसाठी लागणाऱ्या शेंगेन व्हिसा मिळविण्याच्या तयारीला लागा. तीन वर्षांच्या गॅपनंतर युरोप आता पूर्णपणे भारतीयांच्या स्वागताला तयार आहे. व्हिसा कॉन्स्युलेट्समधील गर्दी दिवसेंदिवस वाढत जाणार आहे, त्यामुळे व्हिसा अपॉईंटमेंट मिळणं कठीण होणार आहे. तेव्हा शुभस्य शीघ्रम!

अद्वितीय युरोप आणि तोही वीणा वर्ल्डच्या एक्स्पर्ट टूर मॅनेजरसोबत म्हणजे एक मस्त दुग्धशर्करा योगच! म्हणूनच की काय वीणा वर्ल्ड सुरू झाल्यावर 2014 ते 2019 ह्या सहा वर्षांत साठ हजार, तर गेल्या सहा महिन्यात सतराशे पर्यटकांनी वीणा वर्ल्डसोबत युरोपचा आनंद लुटला. युरोपची वारी वीणा वर्ल्डच्या अनेक पर्यटकांनी एक दोनदाच नव्हे तर दहा-बारा वेळा केली आहे. मुंबई ते मुंबई टूर मॅनेजरसोबतच 24/7 सज्ज असलेली संपूर्ण 'वीणा वर्ल्ड टीम' कटिबद्ध आहे तुमच्या स्वप्नातला युरोप प्रत्यक्षात साकारण्यासाठी. उत्कृष्टरित्या डिझाइन केलेल्या 85 ग्रुप टूर ऑप्शन्स मधून तुमची टूर निवडा आणि चला युरोपला, वीणा वर्ल्डसोबत!

- ऑल इन्क्लुझिव्ह टूर्स नो ऑप्शनल्स नो हिडन कॉस्ट
- कन्फर्म्ड एअरलाईन्स कम्फर्टेबल हॉटेल्स AC कोचेस
- इंडियन युरोपियन लोकल फूड ब्रेकफास्ट-लंच डिनर समाविष्ट
- स्थलदर्शन दरम्यान 'वीणा वर्ल्ड ट्रीट्स' उत्तमोत्तम ठिकाणी
- एन्ट्री फी सह जास्तीत जास्त स्थलदर्शन
- व्हिसा फी ट्रॅव्हल इन्शुरन्स* ड्रायव्हर-गाईड टिप्स समाविष्ट
- तुमच्या दिमतीला मुंबई ते मुंबई वीणा वर्ल्ड टूर मॅनेजर
- युरो वाढतोय! काळजी नसावी! संपूर्ण टूर प्राईस भारतीय रुपयात भरा
- डायरेक्ट जॉइनिंग लीविंग Ex-Destination टूर प्राईस उपलब्ध
- युरोप 2023 साठी 3550 पर्यटकांनी बुकिंग केले तुम्ही त्वरा करा!
- तुमच्या फॉरिन एक्सचेंजसाठी Veena World FOREX Authorised money changer



निर्धास्तपणे चला, सहलीवर तुमच्या दिमतीला आहेच वीणा वर्ल्ड टूर मॅनेजर!

**फॅमिली ग्रुप टूर्स, वुमन्स स्पेशल, सिनियर्स स्पेशल अशा वेगवेगळ्या 85 टूर ऑप्शन्समधून तुमची आवडती युरोप टूर निवडा. मात्र त्वरित बुकिंग करा.**

### युरोप - मल्टीकंट्री टूर्स
युरोपियन ड्रीम (युरोप+स्पेन+नीस)(23D)475000-500000
युरोपियन मॅजिक (19D) 395000 - 410000
युरोपियन मार्व्हल्स (17D) 365000 - 375000
युरोपियन ज्वेल्स+व्हर्साय (15D) 345000 - 355000
युरोपियन ज्वेल्स+डिस्नेलँड (15D) 350000 - 355000
युरोपियन एक्सप्लोरर (14D) 305000 - 315000
युरोपियन वंडर्स (13D) 300000 - 310000
युरोपियन हायलाइट्स (11D) 265000 - 275000
युरोपियन स्प्लेंडर्स (10D) 230000 - 240000
युरोपियन पॅनोरमा (7D) 180000 - 190000
सेंट्रल युरोप (क्रोएशिया+पोलंड) (15D) 290000 - 300000

### नॉर्दन युरोप टूर्स
स्कॅन्डिनेव्हिया विथ टॅलिन (8D) 240000 - 250000
स्कॅन्डिनेव्हिया रशिया (15D) 350000 - 360000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हिया (14D) Aug 20-380000-390000
आईसलँड फिनलँड (12D) Jul 21 - 325000 - 335000
आईसलँड स्वित्झर्लंड (11D) Jan 30 - 375000
आईसलँड बेल्जियम ब्रुज ॲमस्टरडॅम(11D)340000-350000
स्कॅन्डिनेव्हियन नॉर्दन लाइट्स (9D) Mar 16 - 320000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हियन नॉर्दन लाइट्स(14D)Dec 2'2023-440000
स्कॅन्डिनेव्हियन मिडनाइट सन (16D) 425000 - 435000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हियन मिडनाइट सन (14D)425000-435000

### युरोप - गोल्डन कॉम्बिनेशन्स
इंग्लंड स्कॉटलंड आयर्लंड वेल्स लंडन (15D) 360000-370000
इंग्लंड स्कॉटलंड आयर्लंड वेल्स (10D) 265000 - 275000
इंग्लंड स्कॉटलंड ॲमस्टरडॅम ब्रसेल्स(9D)250000-260000
इटली ऑस्ट्रिया स्विस पॅरिस लंडन (17D) 430000 - 440000
इटली स्विस पॅरिस लंडन (9D) 240000 - 250000
इटली ऑस्ट्रिया स्विस पॅरिस (14D) 330000 - 340000
ऑस्ट्रिया स्विस पॅरिस लंडन (13D) 350000 - 360000
स्विस पॅरिस ॲमस्टरडॅम ब्रसेल्स (11D) 275000 - 285000
व्हिएन्ना प्राग बुडापेस्ट ब्राटिस्लावा (7D) 175000 - 185000
स्विस पॅरिस स्पेन फ्रेंच रिव्हिएरा (15D) 325000 - 335000
लंडन स्विस पॅरिस (11D) 315000 - 325000
ऑस्ट्रिया स्विस पॅरिस (11D) 275000 - 285000
इटली स्विस पॅरिस (11D) 275000 - 285000
जर्मनी स्विस पॅरिस (12D) 290000 - 300000
ॲमस्टरडॅम ब्रसेल्स जर्मनी (9D) 230000 - 240000
ॲमस्टरडॅम ब्रसेल्स ब्रुज (6D) 165000 - 175000
इटली ऑस्ट्रिया स्विस (11D) 265000 - 275000
इटली ऑस्ट्रिया (8D) 215000 - 225000
इटली स्विस (8D) 225000 - 235000
ऑस्ट्रिया स्विस (8D) 225000 - 235000
स्विस पॅरिस (8D) 235000 - 245000

### युरोप - सिंगल कंट्री टूर्स
बेस्ट ऑफ रशिया (7D) Aug 3 - 175000 - 185000
बेस्ट ऑफ बाकू (5D) Feb 11 - 100000 - 110000

### युरोप - सिंगल कंट्री टूर्स
बेस्ट ऑफ स्वित्झर्लंड (7D) 220000 - 230000
ऑल ऑफ स्वित्झर्लंड (10D) Mar29, April 9-275000-285000
बेस्ट ऑफ ऑस्ट्रिया (7D) May 19 - 195000 - 205000
बेस्ट ऑफ जर्मनी (8D) Jun 19 - 195000 - 205000
बेस्ट ऑफ नॉर्वे (7D) Jul 7 - 230000 - 240000
बेस्ट ऑफ फिनलँड (7D) Aug 23 - 230000 - 240000
बेस्ट ऑफ इटली (7D) Apr 21, May 5-175000-185000
बेस्ट ऑफ फ्रेंच रिव्हिएरा (7D)May18-230000-240000
बेस्ट ऑफ स्पेन (8D) Apr 28 - 190000-200000
बेस्ट ऑफ क्रोएशिया (8D) Jun 30 - 225000-235000
बेस्ट ऑफ ग्रीस (8D) May 6, Jun 10-225000-235000
बेस्ट ऑफ मोरोक्को (8D) July 6 - 185000-195000
बेस्ट ऑफ टर्की (11D) Jan 14, Feb 11-195000-205000
बेस्ट ऑफ इजिप्त (9D) Jan 3, 10, Feb 7-150000-160000
बेस्ट ऑफ ट्युनिशिया (7D) Feb 26 - 175000-185000
बेस्ट ऑफ जॉर्डन (7D) Mar30, Apr 27-150000-160000

### मेडिटरेनीयन युरोप
स्पेन पोर्तुगाल मोरोक्को (13D) 290000 - 300000
स्पेन मोनॅको इटली फ्रेंच रिव्हिएरा (12D) 275000 - 285000
क्रोएशिया स्लोव्हेनिया मॉन्टेनेग्रो हंगेरी(11D)255000-265000
ग्रीस टर्की (12D) May 2, Jun 13-275000-285000
इजिप्त ग्रीस टर्की (14D) Apr23, May14-295000-305000
इजिप्त जॉर्डन इस्रायल(11D)Mar 26-240000-250000
जॉर्डन इस्रायल(8D)Jan 24, Feb 11-180000-190000

### युरोप - वुमन्स स्पेशल टूर्स
युरोप विथ व्हर्साय (15D) Apr 14 - 345000
युरोप (14D) May 23 - 305000
युरोप (11D) Apr 20 - 270000
युरोप (10D) Apr 2 - 230000
लंडन स्विस पॅरिस इटली (9D) May 6 - 245000
स्कॅन्डिनेव्हिया (9D) Jun 16 - 265000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हिया (14D) July 12 - 380000
स्विस (10D) Jun 21-280000/स्पेन (8D) Jul 14-195000
टर्की (11D) Feb 25-195000/ इजिप्त(9D)Aug 29-160000
ग्रीस (8D) Aug 5 - 230000
व्हिएन्ना प्राग बुडापेस्ट ब्राटिस्लावा (7D) May 23-180000

### युरोप - सिनियर्स स्पेशल टूर्स
युरोप (13D) Apr 3 - 300000
युरोप (7D) Jul 10 - 185000
युरोप (10D) Aug 25 - 235000
व्हिएन्ना प्राग बुडापेस्ट ब्राटिस्लावा (7D) July 11 - 180000
इजिप्त (9D)Feb 28-150000
स्विस (7D) Jul 16-220000

ख्रिसमस-न्यू इयर
देशविदेशातील सहली हाउसफुल्ल होत आहेत
**Book Now!**

Travel Now Pay Later!
0 Interest
0 Down Payment
T&C apply

देशविदेशातील आणखी ग्रुप टूर्स, कस्टमाइज्ड हॉलिडेज, इंडिया इनबाउंड आणि MICE कॉर्पोरेट टूर्ससाठी आजच veenaworld.com वेबसाईटला भेट द्या.

युरोप ग्रुप टूर्सच्या सहलखर्चात विमानप्रवास, ट्रान्सपोर्ट, हॉटेल वास्तव्य, ब्रेकफास्ट-लंच-डिनर, एन्ट्री फी सह स्थलदर्शन, ड्रायव्हर-गाईड टिप्स, ट्रॅव्हल इन्शुरन्स*, टूर मॅनेजर सर्व्हिसेस, व्हिसा फी आदि गोष्टींचा समावेश आहे

veenaworld.com • Call: 1800 22 7979 • Mon-Sat 10 to 7 • travel@veenaworld.com
Vile Parle: Sun-Vision Classic, Hanuman Road, Vile Parle (E), Mumbai 400057. Call: 887 997 2213

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Andheri 887 997 2216 | Bengaluru 887 997 2217 | Dadar-Prabhadevi 887 997 2203 | Girgaon-Charni Rd 887 997 2215 | Pune 887 997 2300 | Thane 887 997 2205 | Vile Parle 887 997 2213 |
| Bandra 887 997 2212 | Chembur 887 997 2202 | Dombivali 887 997 2206 | Kolkata 887 997 2288 | Sion-Matunga 887 997 2214 | Vasai 887 997 2209 | Forex 829 110 3883 |
| Borivali 887 997 2201 | Chinchwad 887 997 2310 | Ghatkopar-Vidyavihar 887 997 2221 | Malad 887 997 2219 | Thane Pokhran Rd 887 997 2204 | Vashi 887 997 2207 | Corporate Tours 887 997 2245 |

VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate.

All group tours are ex-Mumbai. Tour price is per person and on twin sharing basis. These Tour Prices are nett and no discount is applicable. At the time of booking, tour price to be paid in full INR by UPI/NEFT/RTGS/Cheque, in the name of 'Veena Patil Hospitality Pvt. Ltd.' No cash transactions at Veena World. Government taxes apply. Any increase in YQ taxes, airport taxes, VISA fees, surcharges (if any) will have to be borne by the travellers. T&C apply.

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

**वार्षिक विशेषांक २०२२**
**वर्ष ३१ वे**

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
सलोनी पाटील

**कविता संकलन**
अशोक बेंडखळे

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**मुखपृष्ठ**
विजयराज बोधनकर

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

**कार्यालय**
१, अल्फा, महात्मा गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ५७.
दूरध्वनी : ०२२–२६१२२४७५
ई– मेल : editorial@parlekar.com
वेबसाईट: www.parlekar.com
www.facebook.com/AamhiParlekar
aamhiparlekarblog.wordpress.com

ही पत्रिका श्री. ज्ञानेश चांदेकर यांनी संकेत प्रकाशनसाठी सी.सी. प्रिंटर्स, ३०, कामदार शॉपिंग सेंटर, मोंगीबाई रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७ येथे प्रकाशित केली.

अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



विजयराज बोधनकर हे मूळचे वर्धा जिल्ह्यातील धनोडी बहाद्दरपूरचे. बोधनकरांवर संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी बाबा यांच्या विचारांचा प्रभाव. घरातच विठ्ठल-रखुमाईचे मंदिर असल्यामुळे अध्यात्मिक संस्कार त्यांच्यावर झालेत. १९८३ साली केवळ स्वकष्टाने दोनशे रुपये घेऊन मुंबईत आले.आणि २८ वर्षांचा संघर्षमय प्रवास अनुभवला. संघर्षाच्या मुशीतूनच त्यांचं व्यक्तीमत्व घडलं. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मधून त्यांनी चित्रकलेची पदवी प्राप्त केली, त्यानंतर जाहिरात क्षेत्रात काम केल्यानंतर लोकसत्ता, लोकमत, सकाळ या दैनिकांसाठी तब्बल दहा वर्षे मुक्तचित्रकार या नात्याने जबाबदारी स्वीकारली. आणि तेथूनच ते नावारूपाला आले. लहानपणापासूनच लिखाणाची आवड असल्यामुळे लिहीते राहिले.

'रे मना' नावाच्या दिवाळी अंकाचे संपादक या नावाने जबाबदारी सांभाळली. या अंकाला दोन वर्षात तब्बल १४ पुरस्कार मिळाले. अनेक नामवंत दिवाळी अंकातून वैचारिक लेख आणि कविताही प्रसिद्ध होत असतात. महाराष्ट्रातच नव्हे तर चेन्नई, दिल्ली, बंगलोर येथेही त्यांची भव्य चित्र प्रदर्शने भरली असून त्यांची चित्रे देश-विदेशात पोहोचली आहेत.

www.vijayrajbodhankar.com या साईटवर आपण त्यांना भेटू शकता. दहा वर्षे 'देव-चित्रे' या विषयावर संशोधन करून, स्लाईड शो सोबत व्याख्यानही देतात. अशी महाराष्ट्रभर त्यांची व्याख्याने होतात. वक्तृत्व हा त्यांचा आणखी महत्त्वाचा पैलू. त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले असून, अनेक सामाजिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात ते कार्यरत आहेत.

'व्यास क्रिएशन्स' च्या उत्तोमोत्तम ग्रंथ मालिकेतील 'साहित्यिकांची स्वभावचित्रे' हे पुस्तक म्हणजे एक संग्राह्य आणि मनोवेधक दस्तावेज ठरेल, यात शंकाच नाही !

# चित्राविषयी थोडेसे



प्रत्येक निर्मिती मागे काहीतरी कारण असते. कारण असायलाच हवे असेही नाही पण माझ्या चित्रा मागची एक गोष्ट आहे. मी पहिल्या वर्गात असताना शाळेत पाटी आणि लेखणी घेवून जायचो. शाळेत त्या पाटीवर चित्र काढायचो आणि घरी आल्यावर आईला ती पाटी दाखवत म्हणायचो बघ मी चीतल काढलं. ते चित्र पाहून आई हसायची आणि म्हणायची 'अरे हे चित्र नाही बाराखडी आहे, तू अक्षरे लिहलेस अ ब क ड इ !' पण मला ती चित्रेच वाटायची. माझं मन तेव्हा पासून अक्षरांना चित्रंच समजतं आलय. २००८ साली माझं पहिलं चित्रप्रदर्शन भरलं होतं त्या चित्रातही अक्षरे होती, तेव्हापासून मी अक्षरांचा शोध घेतोय. अक्षराभोवती घुटमळत राहतो. फक्त माझ्या अक्षरांची मी कॅलिग्राफी होवू दिली नाही. अक्षर ही माणसाच्या स्वभावाचा आरसा आहे. जशी वृत्ती तसे त्या त्या माणसाचे अक्षर असते. प्रथम पाटीवर नंतर शाळेच्या, कॉलेजच्या वहीवर मग थेट कॅनव्हास वर त्यांचा प्रवास सुरू झाला. माणसाचा चेहरा बदलत जातो तसे अक्षर चित्रांचा माझा प्रवास बदलत गेला. मुर्ता पासून अमुर्ता पर्यंत प्रवास करताना माझ्याच अक्षरांनी मला चकित केले, मी जिवंत असे पर्यंत ही अक्षरे काय रूप घेतील याची मलाच उत्सुकता आहे. फेब्रुवारी २०२२ मधे जहांगीर मधे याच अक्षरावरच्या चित्र प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. त्या प्रदर्शनाचे नाव होते 'रिड मी' , या शिर्षकामुळे रसिकांची उत्सुकता वाढली. कारण त्या अक्षरांची गूढ अशी चित्रे तयार झाली होती आणि अक्षरे अंतर्धान पावली होती. रसिकांनी मोठी दाद दिली.त्यामुळे मनाची ऊर्जा अधिक वाढली. त्याच 'रिड मी' या मालिकेतील हे पेंटिंग आहे.

**विजयराज बोधनकर**



# संपादकीय...

'आम्ही पार्लेकर'चा २०२२ चा वार्षिक अंक आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. फक्त पार्लेकरांच्याच नव्हे तर समस्त मराठी जनांच्या भावविश्वाला गवसणी घालण्याचा प्रयत्न ह्या अंकात आम्ही केला आहे पण तो यशस्वी झाला आहे कि नाही ते वाचकांनीच ठरवायचे आहे.

करोनाचे सावट आता संपूर्णपणे दूर झाले आहे व आपल्या सर्वांचे जीवन आता पूर्ववत सुरु झाले आहे. उद्योगविश्व सुद्धा आता पूर्वपदावर यायचा प्रयत्न करत आहे. मध्यंतरी काही दिवस युक्रेन-रशिया मधील युद्धामुळे परत आंतरराष्ट्रीय स्तरावर अनिश्चितता वाढली होती पण आता परिस्थिती बऱ्याच प्रमाणात आटोक्यात आहे असे दिसते. आर्थिक नुकसान हे काही काळाने भरून येऊ शकते पण ह्या भीषण महामारीने आपल्यातील अनेकांच्या प्रियजनांना हिरावून घेतले आहे आणि हे नुकसान कधीही भरून येणार नाही. मात्र जीवनाचा प्रवाह वाहताच असतो. आपण सर्व ह्या काळ्याकुट्ट आठवणी मागे सारून नव्या उमेदीने जीवनाला भिडण्यासाठी सज्ज झालो आहोत. ह्याच कधीही न संपणाऱ्या जगण्याच्या उर्मीने मानवता युगानुयुगे आपले अस्तित्व टिकवून आहे, खरे ना !


कोरोना काळानंतर सर्व क्षेत्रात खूप मोठे बदल झाले आहेत. 'डिजिटलायझेशन' हा आज परवलीचा शब्द झाला आहे. उद्योग आणि शिक्षण क्षेत्राबरोबरच साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा ह्याचा प्रभाव आता जाणवू लागला आहे. घरबसल्या नाटक सिनेमाची तिकिटे काढणे हि गोष्ट आता जुनी झाली. आज इंग्लिश हिंदी प्रमाणे मराठीत सुद्धा अनेक OTT प्लॅटफॉर्म्स तयार होत आहेत व घरबसल्या आपल्या TV वर संपूर्ण मनोरंजन विश्व उलगडत आहे. अनेक लेखक आता प्रिंटेड पुस्तकांऐवजी ईबुक ला पसंती देत आहेत. लहान मुलांचा ओढा आज पुस्तके वाचण्याकडे नसून आवडीच्या विषयांवरील व्हिडीओ यूट्यूब वर पाहण्याकडे असतो. ज्ञानलालसा संपली नाही तर ती भागवण्याचे मार्ग फक्त बदलले आहेत.

मराठीच्या सांस्कृतिक प्रांगणात पार्ल्याचे महत्व मोठे आहे. अनेक, लेखक, कवी, चित्रकार, गायक, संगीतकार, नाटककार, विचारवंत इत्यादी मंडळींनी आपल्या कर्तृत्वाने, तेजाने हे प्रांगण उजळवून टाकले आहे. ह्यातील अनेकांच्या मदतीनेच हा 'आम्ही पार्लेकर'चा विषेशांक सजला आहे. मान्यवरांच्या मुलाखती, मराठी गझलांचे व्याकरण, वाढलेल्या घटस्फोटांची कारणमीमांसा, भारत चीन संबंध, पार्लेकरांचे दिवाळी अंकातील योगदान, जुन्या चित्रपटांची वैशिष्ट्यपूर्ण पोस्टर्स, CSMT स्टेशनचे स्थापत्य, ह्या वर्षीचे न्यूसमेकर्स असे अनेक विषय ह्या अंकात आहेत. व्यंगचित्रमालिका आहे. काही निवडक कवितांचा समावेश सुद्धा करण्यात आला आहे. असा हा विषेशांक आपल्या सर्वांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास वाटतो.

सर्वांना नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

आपला,

**ज्ञानेश चांदेकर**


ऋणानुबंध
पिढ्यांनपिढ्यांचे.
आमचे आणि
अस्सल पार्लेकरांचे.
व्हि.एम.मुसळुणकर
ॲन्ड सन्स ज्वेलर्स प्रा. लि.
| गोल्ड | डायमंड | प्लॅटिनम |
4, रेलकॉन हाऊस, विलेपार्ले (पू.), मुंबई 57.
दू. : 26153055/26149535 मो. : 9920114240.

# अनुक्रम


मंतरलेले दिवस ........ ८
प्रदीप वेलणकर

मराठी चित्रपटसृष्टीचे महानायक
अशोक सराफ ........ १२
पूजा सामंत

कविता
हरपले भान ........ १९
अशोक बेंडखळे

गुरुकुल ........ २०
अरुंधती भेडसगावकर

कविता
वाहत्या नदीच्या काठी ........ २३
रमेश नागेश सावंत

कर्म धर्म अधिकारी ...
अविनाश धर्माधिकारी ........ २४
(पोलीस उपअधिक्षक - Dy SP)
अमरेंद्र करंदीकर

ध्यास माझा आगळा ........ ३०
अनुश्री क्षीरसागर

व्यंगचित्रे
साहित्यसम्मेलन आणि पार्लेकर ........ ३५
श्रीनिवास प्रभुदेसाई

आपला सख्ख्य नसलेला
शेजारी - चीन! ........ ३९
चंद्रशेखर नेने

कविता
हरवत जाणं ........ ४३
विजयराज बोधनकर

भासाचा दुर्योधन ........ ४४
चित्रा वाघ

कविता
रस्ते फुलाफुलांचे..... ........ ४८
सदानंद डबीर

छत्रपती शिवाजी महाराष्ट्र टर्मिनस -
स्थापत्य शास्त्राचा विलोभनीय नमुना ........ ५०
संगीता बेहेरे

सोशल मिडिया आणि घटस्फोट ........ ५४
मुक्ता चैतन्य

**न्युज मेकर्स २०२२**

ऋषि सुनक ........ ५८

द्रौपदी मुर्मू ........ ५९

वोलोडिमिर झेलेन्स्की ........ ६०

विवेक अग्निहोत्री ........ ६१

संकलन - प्रज्ञा काणे

सिनेमा पोस्टर्स ........ ६२
अरुण पुराणिक

गजल कशी ऐकावी? ........ ६५
सदानंद डबीर


कविता
संवाद
लता गुठे ........ ६७
घर
चारुलता काळे

पार्लेकर आणि दिवाळी अंक ........ ६८
मंजिरी वैद्य


संगीतोपचार ........ ७०
मिलिंद जोशी

कविता
वळणावरती
सविता दामले ........ ७२
अरे माणसा
अल्पना कशाळकर

# मंतरलेले दिवस



> तिघांच्याही डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत होते. काहीतरी अद्भूत सापडल्याचा आनंद आमच्या स्पर्शातून आणि वाहणाऱ्या डोळ्यातून अनुभवत होतो. मग तालीम झाली नाही. दोन तासांनी पुनः गोवा हिन्दूच्या सर्व मंडळीसमोर आम्ही तसेच केले... सर्वचजण चकीत आणि अचंबित अवस्थेत होते.



**प्रदीप वेलणकर**

मी विक्रमला पहिल्यांदा पाहिले ते 'वाहतो ही दुर्वांची जुडी' या नाटकात आणि खूप प्रभावित झालो. त्या सुमारास तो काही मराठी चित्रपटातही भूमिका करीत असे. असे काही मोजके कलावंत होते की ते मराठी नाटक आणि सिनेमात अत्यंत सहजपणे वावरत होते. विक्रम त्यात अग्रक्रमी होता. मी 'संध्या छाया' नाटकात भूमिका करत असताना विक्रम विजयाबाई, श्री माधवराव वाटवे व श्री अरुण जोगळेकर यांना भेटायला बऱ्यापैकी येत असे. माझी नुसती तोंड ओळख होती. जेव्हा त्याने संध्याछाया नाटक पाहिले तेव्हा मध्यंतरात तो सरळ माझ्याकडे आला. हात पुढे केला व म्हणाला, 'अप्रतिम'.

त्यानंतर जेव्हा जेव्हा तो प्रयोगाला येई तेव्हा मला आवर्जून भेटे. पण तरीही ती मैत्री नव्हती . थोडीफार तोंड ओळखच होती.

पण जेव्हा 'बॅरिस्टर' नाटकाच्या तालमींना सुरुवात झाली, तेव्हा अगदी सुरुवातीचे ८/१० दिवस फक्त तो आणि मी आणि दिग्दर्शिका विजयाबाई इतकेच होतो. पहिले दोन दिवस तर आम्ही नाटकाची संहिता उघडलीही नाही. आम्ही तिघेही वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारीत होतो. त्यावेळी तो चेंबूरला रहात असे व मी पार्ल्यात. २ /३ दिवसच आम्ही तालमीहून परततांना लॅमिंग्टन रोड पासून सायक बस डेपो पर्यंत एकत्र जात असू. तिथे 'वडा-उसळ' व चहा घेऊन मी पार्ल्याला व तो चेंबूरला निघत असू. इथून खरी आमची मैत्री सुरू झाली. विजयाबाईंच्या मनात कदाचित हेच असावं. बॅरिस्टर मधल्या भूमिका उत्कृष्ठ वठवण्यासाठी कदाचित हे आवश्यकच होत. ही मैत्री पुढे आमच्यात कायम राहीली, अगदी कौटुंबिक स्तरावरही.

बॅरिस्टरच्या तालमीतले असे अगणित क्षण आम्ही नटवर्ग.... आम्ही दोघं.. सुनील तावडे, सुहास जोशी.. कधी विसरू शकत नाही. विशेषतः दोन प्रसंग.. पहिल्या अंकात.... 'ग्लोरियाला वेड लागल हो भाऊराव' आणि दुसऱ्या अंकात... 'ग्लोरिया इज डेड अँड गॉन :- त्यापैकी पहिला प्रसंग बसवतांना विजयाबाईंनी तो आम्हा दोघांकडून ४ -५ वेळा वाचून घेतला... मग हातात संहिता घेऊन साधारण हालचाली कशा असतील, त्या ढोबळमानानं बसवल्या. तसे आम्ही पुनः ४ /५ वेळा केल...

मग बाई म्हणाल्या, तुम्हांला साधारणपणे वाक्य काय आहेत, हालचाली काय आहेत,

www.vijayrajdevelopersllp.in

# तुमचा विश्वास हाच आमचा आत्मविश्वास

आलोक
LUXURY | SAFETY | CONVENIENCE
MahaRERA No.: P51800034809
Refer website:http://maharera.mahaonline.gov.in



Alok. F. P. No 68 & 69, Mahant Road Extension, Vile Parle [E], Mumbai: 400057.

गोपद्म
Maha RERA No. P51800033821
Refer website:http://maharera.mahaonline.gov.in



GOPADMA. F.P. 245 TPS II park road Vile Parle (East) Mumbai 400057

यशोधन
Maha RERA No. P51800045437
Refer website:http://maharera.mahaonline.gov.in
Project by UDAYRAJ DEVELOPERS



F.P. 245, TPS 2, Malviya Road, Vile Parle (East) Mumbai 400057

Call for bookings 1800 209 9887

VIJAYRAJ DEVELOPERS LLP

**Corporate office:** 102, Aditi, Shiv Sena Bhavan Path, Dadar, Mumbai 400028. T: 022 2436 8006 / 2438 4463 | **Sales office:** Shop No. 2, Govardhan CHS, Gujarat Society Road, Vile Parle (East), Mumbai 400057



याचा निदान अंदाज  आला आहे. तर आता हातात संहिता न घेता हा प्रसंग करा, वाक्य, हालचाली चुकल्या तरी थांबू नका, तुमच्या भावना काय असतील, ते उत्कटपणे द्यायचा प्रयत्न करा.. आणि आम्ही जेव्हा ते तसे केले तेव्हां.. शेवटी आम्ही तिघही एकमेकांना मिठी मारून आमची स्पंदनं जाणून घेत होतो, तिघांच्याही डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत होते. काहीतरी अद्भुत सापडल्याचा आनंद आमच्या स्पर्शातून आणि वाहणाऱ्या डोळ्यातून अनुभवत होतो. मग तालीम झाली नाही. दोन तासांनी पुनः गोवा हिन्दूच्या सर्व मंडळीसमोर आम्ही तसेच केले... सर्वचजण चकीत आणि अचंबित अवस्थेत होते. खरं तर या प्रसंगात ४ पात्र आहेत... मावशीबाई व राधाक्का... या दोघींना नंतर या प्रवेशात समाविष्ट केल... केवळ अविस्मरणीय...

दुसऱ्या अंकात ... 'Gloria is dead & gone' म्हणतांना बॅरिस्टर काय वेगळ सादर करणार याच आम्हालाही कुतुहल होतच. Gloria ला वेड लागलं हे सांगतांना उध्वस्त झालेला बॅरिस्टर, 'Gloria is dead & gone' हे सांगतांना अत्यंत निर्विकारपणे, अलिप्तपणे व सहजपणे सांगतो, आता भाऊराव हादरतात... असा अत्यंत वेगळ्या पद्धतीने विजयाबाईंनी हा प्रसंग बसवला. एकाच सहिंतेतले दोन कमालीचे दुःखी प्रसंग विजयाबाईंनी ज्या वेगवेगळ्या पद्धतीने हाताळले... तेच एक प्रकारचं शिक्षण होत आमच्यासाठी. दोन्ही प्रसंगातून खूप काही गवसण्याचा अनुभव होता तो.

यांत आणखी भर पडली ते.. चंद्रकान्त गोखले यांचा परकाया प्रवेश करणारा 'तात्या' पहाणं, अगदी तालमीपासूनच. ज्या पद्धतीने त्यांनी या परकाया प्रवेशाची नांदी दाखवली होती ती पाहून स्वतः विक्रमही भांबावला होता... हे पहायलाही भाग्य लागत. दोघेही बापलेक समोरासमोर उभे ठाकून जो काही आविष्कार प्रेक्षकांना घडवत, तो केवळ अविस्मरणीय . ज्यांनी ते पाहीलं ते सर्वच भाग्यवान.


विक्रमने जीव तोडून बॅरिस्टर उभा केला... (अक्षरशः) प्रेक्षकांनी, जाणकारांनी, टीकाकारांनी अक्षरशः डोक्यावर घेतला. ('बॅरिस्टर' या हिन्दी चित्रपटात तो का नव्हता, हे कोडच आहे... असो, ते कोडच राहू दे .) इथून पुढे त्याच्या कारकीर्दीने अतिशय वेगाने चांगले वळण घेतले. तो कायम प्रगती पथावरच राहीला.

एकूण बॅरिस्टरच्या तालमीपासून ते प्रत्येक प्रयोगानंतर आजच्या प्रयोगात काय झालं, काय चुकलं, काय सुधारलं, काय आणखी सुधारायला हवं यावर जेव्हां चर्चा होत.. आमच्या आमच्यातच... त्यांनी शिकव म्हटलं तरी शिकवता येणार नाही वा शिक म्हणायचं तरी शिकता येणार नाही अशा अविस्मरणीय होत्या. या नाटकानंतर क्वचितच असा अनुभव मिळाला नाही. अगदी दिग्गजांबरोबर काम करून सुद्धा... म्हणून तर विक्रम, मी आणि या नाटकाशी संबंधितांच्या आयुष्यातले 'मंतरलेले' दिवस होते ते.....


**प्रदीप वेलणकर**

४८ वर्षे चित्रपट, मालिका,
नाट्यरंगभूमीवर कार्यरत,
जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित
९८२०१ ४५५८२


MANGAL
MANGAL
MANGAL
New Project:
Royale
• Mangal Royal Jewels Pvt.Ltd.
• Mangal Gold Loan
• Mangal Buildhome Pvt.Ltd.
• Mangal Home Loan & All Finance
N.P. Thakkar Road, Vile Parle (E).
Shyam Kamal Rd, Agarwal Market, Vile Parle (E), Mumbai- 57
Contact No. 26140504 / 2618789



# मराठी चित्रपटसृष्टीचे महानायक अशोक सराफ



पूजा सामंत

जीवनातील अनेक अनुभवांनी मला समृद्ध केलं आहे ! अभिनेता अशोक सराफ

अभिनयात तब्बल ५ दशकांपेक्षा अधिक काळ समर्थपणे काढणे म्हणण्यापेक्षा अभिनयात इतका मोठा काळ सूर्यासारखे तेजस्वीपणे तळपत राहणं खचितच सोपं नाही .. बहुतेक बिनीच्या कलावंताच्या कारकिर्दीत एक काळ असा येतोच जेंव्हा मनाजोगत्या भूमिका मिळत नाहीत, ह्या पडत्या काळात कलाकारांच्या मनात असुरक्षितेतची भावना, बैचेनी निर्माण होणं स्वाभाविक असतं .. हल्ली आततायी शीर्षकं कमी झाली असली तरी 'फिनिश्ड' 'ओव्हर'अशी विशेषणं आपल्याबद्दल सामोरी यायला लागलीत की शिखरावरचे स्टार्स आपला आत्मविश्वास गमावतात ! पण गेली ५० वर्षे प्रसिद्धीच्या झोतात राहूनही अत्यंत साधेपणा, निगर्वी राहून आपल्या करियरमध्ये नेहमीच शिखरावर राहिलेला मराठीतला अभिनय सम्राट म्हणजे अशोक सराफ ! त्यांना 'मामा' नावाने ओळखले जाते, पण सिनेरसिकांसाठी ते अशोक सराफ आहेत .

अशोक सराफ ह्यांच्या करियरने ५० वर्षांचा टप्पा गाठला तर वयाचा अमृत महोत्सव नुकताच साजरा झाला ..

महाराष्ट्राच्या ह्या लाडक्या -लोकप्रिय स्टार अभिनेत्याशी त्याच्या लोखंडवाला संकुलातील घरी झालेल्या गप्पांचा काही भाग -

आयुष्याचा हिरक महोत्सव,आणि कारकिर्दीची ५० वर्षे कसं वाटतंय ह्या टप्प्यावर ?

- मी संतुष्ट आहे . माझ्या व्यक्तिगत जीवनात मी संतुष्ट आहे ह्याचं श्रेय माझी पत्नी निवेदिता सराफ आणि मुलगा अनिकेत सराफ ह्यांचं. दोघांनी मला आनंदाचे अगणित क्षण दिलेत .. मी माझ्या अभिनयात खूप व्यस्त होतो, पण माझ्याविषयी त्यांची तक्रार नव्हती, त्यांनी मला भरभरून प्रेम दिलं, कौटुंबिक जवाबदाऱ्या सगळ्याच निवेदिताने कुशलतेने सांभाळल्या. मुलगा अनिकेतने त्याचं स्वतःचं करियर स्वतः शोधलं . त्याला शेफ व्हायचं होतं . त्याने स्वतः युनिव्हर्सिटी शोधली आणि तो कॅनडाला गेला , त्याने त्यात डिग्री मिळवली , तो नामांकित शेफ बनला. ह्या सगळ्याचा मला आनंद -समाधान वाटतं. माझ्या सराफ कुटुंबाने मला तेंव्हापासून साथ दिली जेंव्हा मी अभिनयात जायचं ठरवलं. त्यांचं नैतिक पाठबळ नसतं तर मी अभिनयात येऊच शकलो नसतो.. माझा धाकटा भाऊ सुभाष सराफ


सुवर्ण अलंकारांमध्ये पारंपारिक व आधुनिक
कलाकृतीचे अलौकिक मिश्रण
SWARNA LAXMI
MONTHLY SAVING PLAN
11, Kamdar Shopping Centre, Next to Railway Station,
Vile Parle East. Tel: 93214 50954 | 93217 85632
Showroom Time: 11am to 8pm | Monday Closed
Janaki Jewellers
C. A. Pendurkar
& co.
VILE PARLE EAST

ह्याविषयी मी कृतज्ञता किती व्यक्त करणार, त्यापेक्षा मी त्याच्या ऋणात राहणं पसंत करेन.

माझ्या कारकिर्दीबद्दल मी संतुष्ट आहेच. माझ्यावर वेगवेगळे प्रयोग करणारे माझे निर्माते, दिग्दर्शक ह्यांनी माझ्यावर विश्वास टाकत मला अनेक महत्वपूर्ण भूमिका दिल्यात.. मी माझ्या मायबाप प्रेक्षकांचा तितकाच आभारी आहे. त्यांच्या प्रेमामुळे मी तब्बल ५० वर्षे अभिनयाच्या पीचवर टिकून राहू शकलो. त्यामुळे मी जीवनाच्या ह्या वळणावर धन्य आहे, संतुष्ट आहे, पण ह्यातील काहीही श्रेय माझे नाही ...!

**बँकेची नोकरी सांभाळून अभिनयाला वेळ देणे त्या काळात कसं जमवलंत ?**

– माझा मामा (नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार) त्या काळात रंगभूमीवर काम करायचा. तो दिग्दर्शकही होता. त्याच्यातील अभिनयाची प्रतिभा वारश्याने मला लाभली असावी. मामाला त्याच्या कारकिर्दीत अनेक चढ-उतार, टक्के-टोणपे सहन करावे लागले, त्यामुळे आपल्या भाच्याने ह्या क्षेत्रात शक्यतो येऊ नये असं मामाला वाटे. मला मात्र मामाच्या क्षेत्रात जाण्याचे वेध लागले होते. वडील म्हणत, 'पदवी घे आणि नोकरी कर म्हणजे भविष्याची योग्य तरतूद झाली असं मानायला हरकत नाही.' मामांसोबत मी जाऊन अभिनय करत असे. सुदैवाने बँकेत नोकरी लागली पण अभिनय आणि नोकरी ही तारेवरची कसरत व्हायची. माझे सहकारी देवासारखे धावून आलेत आणि माझ्या कामाचा भार ते सांभाळून घेत. जेंव्हा मामाच्या नाट्यकर्मींनी मामाला सांगितलं, तुमचा भाचा अशोक उत्तम काम करतोय, त्याला ह्या क्षेत्रात काम करायला पाहिजे, त्यावर मामांचाही विश्वास बसला आणि स्टेट बँकेची नोकरी १० वर्षांनंतर मी सोडली, माझ्या सुदैवाने मला रिटायरमेंट बेनिफिट्स मिळालेत. अभिनयातले माझे गुरु माझे मामा.. मामाची स्वतःची नाटक कंपनी होती. त्यांच्यामुळे मी खऱ्या अर्थाने अभिनयात आलो, अभिनय शिकलो ..माझा गुरु माझा मामा'



माझ्या आयुष्यातील फार मोठी खंत म्हणजे आपल्या भाच्याचे यश बघायला, किंबहुना भाच्याने ५० वर्षे अभिनय क्षेत्रात अहोरात्र झोकून देऊन काम केलं त्याचा उदय बघायला मामा-माझा गुरु हयात नाही ! माझा पहिला चित्रपट 'पांडू हवालदार' रिलीज होण्याआधी मामाने ह्या जगाचा निरोप घेतला !

**तुमचा डेब्यू (पहिला चित्रपट ) पांडू हवालदार होता, ह्या सिनेमाचे अभिनेता - निर्माता दिग्दर्शक दादा कोंडके तुमच्यापर्यंत पोहचलेत कसे ?'**

–१९६७ मध्ये मी अभिनयात प्रवेश केला. वि. स . खांडेकर लिखित 'ययाति आणि देवयानी' हे माझे पहिले नाटक. त्या काळात संगीत नाटकं आवडीने बघितली जायची. मला गाता गळा नाही हे माझ्या लक्षात आलं, त्यामुळे पद्य नाटकांपासून मी तसा दूर राहिलो. पण आवडीने, उत्साहाने मी गद्य नाटकं बरीच केलीत. 'डार्लिंग डार्लिंग' ह्या विनोदी नाटकाला खुप छान प्रतिसाद मिळाला. 'हमीदाबाईची कोठी' हे गंभीर नाटक देखील लोकप्रिय झालं. नाटकांमुळे माझी उरली सुरली भीड चेपली, असला नसलेला संकोच गळून पडला आणि नाटकांनीच माझा आत्मविश्वास वाढवला. माझा प्रवास ऑल राऊंडर अभिनेत्याच्या दिशेने सुरु झाला. नाटक ते सिनेमा हा पल्ला गाठायला मला ७ वर्षांचा काळ जावा लागला. 'पांडू हवालदार' पूर्वी एका सिनेमात मला लहानसा रोल मिळाला होता, मी स्वतः दादा कोंडके ह्यांचा चाहता होतो, त्यांचा 'इच्छा माझी पुरी करा' हे वग मी पाहिले होते, त्यांची अदाकारी, त्यांचे टायमिंग भन्नाट होते, दादांचा सहायक दिग्दर्शक होता अरुण कर्नाटकी. अरुण कर्नाटकी माझा मित्र होता, त्याची पत्नी लता अरुणसोबत मी स्टेजवर काम केलं होतं. अरुण कर्नाटकीने माझे नाव दादांकडे पांडू हवालदार साठी सुचवले, ह्या शिवाय दादांचे पब्लिसिस्ट नंदकिशोर कलगुटकर यांच्याही नाटकात मी काम केले होते, ह्या दोघांकडून माझे नाव दादांकडे गेले.

**पहिल्याच सिनेमात दादांसोबत काम करण्याचा तुमचा अनुभव कसा होता ? दडपण आलं होतं का ?**

नाही दडपण आलं. नाटकात मी कॉमेडी - पॉजिटीव्ह -नकारात्मक -चरित्र अशा सगळ्या भूमिका सातत्याने करत होतो. अनेक बिनीच्या कलावंतांसोबत सगळ्या भूमिका केल्यात त्याचा फायदा मला झाला. जसं मी म्हटलं, माझ्यात कमालीचा आत्मविश्वास आला, त्यामुळे दादा कोंडके यांच्यासमवेत काम करताना मला कसलेही दडपण आले नाही ..



'पांडू हवालदार'चे शूटिंग सुरु झाले, संपूर्ण पहिला -दुसरा दिवस मला काहीही काम नव्हते. बिना कामाचे माझे असे दिवस चालले होते. पण सकाळी ६ वाजल्यापासून थेट संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मी दादांना काम करताना पाहत होतो. मला सेट वर बोलावून माझे शूटिंग का-कसे सुरु केले नाही असं मी त्यांना चुकूनही विचारलं नाही. उलट दादांच्या काम करण्याची, संवादाची ढब कशी आहे हे निरीक्षण केले. त्यामुळे जेंव्हा माझे प्रत्यक्ष काम सुरु झाले मी अगदी सहजपणे शूटिंगला सुरुवात केली. दादांसोबत एकूण ३ चित्रपट केलेत . पांडू हवालदार, रामराम गंगाराम व तुमचं आमचं जमलं हे ते ३ चित्रपट , त्यांच्याशी चांगले सूर जुळले .

**दादांसमवेत तुम्ही ३ चित्रपट केलेत , त्यांच्या फिल्ममधील संवाद द्विअर्थी असत असा आरोप नेहमी होत असे , तुम्हांला काय वाटले ?**

-त्यांच्या फिल्ममधील संवाद द्विअर्थी होते असे मला कधी वाटले नाही, पण जगात एका नाण्याला नेहमी दोन बाजू असतात .. मला जे जाणवेल ते समोरच्याला जाणवेलच असं नाही न ! दादा आणि त्यांचे चित्रपट हे सेन्सॉरच्या कात्रीत अडकत मग दादा युक्तिवाद देत असत .'

**१९८३ मध्ये तुमचे १३ चित्रपट रिलीज झालेत, कधी एकाच वर्षी १६ रिलीज झालेत , इतक्या अफाट संख्येने चित्रपटांचे शूटिंग करणे म्हणजे फार तारांबळ उडत असेल तुमची ? हल्ली स्टार्सचे एकाच वर्षी ४ ते ५ चित्रपट जरी रिलीज झाले तरी फार मोठी चर्चेची बाब ठरतेय . !**

- माझ्या ५० वर्षांच्या कारकिर्दीत माझे असंख्य चित्रपट झालेत ह्याला काही कारणं आहेत. जसं मी आधी म्हटलं, आरंभीचा १० वर्षे अभिनय केला तो स्टेट बँकेची नोकरी सांभाळून, मग नोकरी सोडून पुरा वेळ मी अभिनयाला झोकून दिलं .. खरं म्हणजे मी तसा कलंदर माणूस! अभिनय हेच माझे पॅशन, हीच रोजीरोटी, हाच श्वास आणि हाच ध्यास असं साधं सोपं माझं गणित असल्याने मी काम करत सुटलो. करियर प्लॅन वगैरे प्रकार नव्हताच , ज्या भूमिका वाट्याला येत त्यातील भूमिकांवर मी नेहेमी हाच विचार करत असे की ह्यातील व्यक्तिरेखा मी कशी वेगळी दाखवू शकतो ? व्यक्तिरेखेला राग आलाय हे जरी दाखवायचे असल्यास रागाच्या भावना प्रदर्शित करण्यातल्या छटा किती विविध असू शकतात ? स्वतःच्या भूमिकांवर मी श्रम घेतले, माझं नातं सगळ्यांशी मधूर आहे पण माझे मित्र फार थोडे आहेत. मी बोलका नाही, माझे छंद नाहीत, खाण्या -पिण्याचे चोचले नाहीत, जे पानात असेल ते मी खातो..त्यामुळे फक्त अभिनय हेच माझे फोकस राहिले..आणि मी अभिनयात मनापासून रंगून गेलो, मी फार काही ग्रेट केलं अशी माझी भावना कधी नव्हती.. मी मराठी चित्रपटांचा हिरो आहे, फक्त हीरोच्याच भूमिका करेन असा माझा हेका कधीच नव्हता, त्यामुळेही असेल कदाचित माझ्या वाट्याला हिरो, सहायक हिरो, हिरोचा मित्र, नायिकेचा भाऊ, वडील, सकारात्मक - नकारात्मक, चरित्र भूमिका अशा अष्टपैलू भूमिका वाट्याला आल्यात ज्या मी स्वेच्छेने केल्यात त्यातील वेगळेपण हेरलं.. अर्थात भूमिका ज्या ज्या ऑफर झाल्यात त्या मी केल्यात पण कधीही माझ्या करियरचा प्रवास जाणीवपूर्वक नव्हता, आखीव रेखीव जगलो नाही मी. म्हणूनच मी स्वतःला कलंदर म्हटलं. २५० पेक्षा अधिक चित्रपट माझे झालेत. १९७८मध्ये मी १८ फिल्म्स केल्यात. त्या वर्षी एकूण २० मराठी चित्रपट रिलीज झाले होते त्यात १८ चित्रपट माझे होते. ह्या १८ सिनेमांमध्ये मला कुठे हिरो, कुठे चरित्र कलाकार, कुठे कॉमेडी अशा चौफेर भूमिका मिळत गेल्या. माझी स्ट्रॅटेजी नव्हतीच कधी हिरोच्या भूमिकेसाठी ..

**सध्या मराठी फिल्म्स करणं तुम्ही कमी केलंय, त्यामागे काही विशेष कारण ?**

- कारण असं की, मी स्वभावाने गंभीर प्रवृत्तीचा आहे, खेळकर नाही. हा माझ्या नियतीचा एक भाग आहे की माझ्या वाट्याला विनोदी भूमिका अधिक आल्यात ज्या मी कन्व्हिंग्सली करू शकलो. आता मराठी सिनेमांचा प्रवाह खूप वेगळा झाला आहे, सातत्याने नवे विषय -कधी ऐतिहासिक विषय विविधता दिसून येतेय. माझ्या वयाला शोभतील अशा भूमिका फार नाहीत. तरीही २०२१मध्ये मला 'प्रवास' हा एक वेगळा चित्रपट करण्याची संधी मिळाली. खूप काम केले आहे मी, अजूनही करेनच पण माझ्यातील अभिनेत्याला आव्हान देईल अशी व्यक्तिरेखा वाट्याला आली पाहिजे. खूप वर्षे सिनेमांमुळे नाटक बाजूला राहिलं होतं, जे मी आता (व्हॅक्यूम क्लिनर) करतोय. उत्तम प्रतिसाद आहे, ज्याचे एव्हाना ३२५ प्रयोगच होताहेत.




माझा एक नवा चित्रपट येतोय, लाईफ लाईन, ज्यात माझी डॉक्टरची भूमिका आहे. विषय अवयव दानाशी निगडित आहे .'

**तुमची हिंदी फिल्ममधली करियर देखील प्रदीर्घ आहे, काही भावना आहेत त्याबद्दल ?**

- हिंदीमधली करियर चांगलीच झाली पण त्यावेळेस मी मराठीत देखील व्यस्त होतो. हिंदीत काही उत्तम फिल्म्स मला मिळाल्या. 'दामाद' हा माझा आरंभीचा चित्रपट, कोयला, यस बॉस ह्या माझ्या फिल्म्स मला आवडल्यात. जे सिनेमे मी केलेत ते मला मानसिक समाधान देऊन गेलेत. पण खंत नाही, आपल्या जीवनातील अनेक अनुभव आपल्याला समृद्ध करतात. 'हम पांच' ह्या मालिकेने मला खूप लोकप्रियता दिली '.

**२५० पेक्षा अधिक सिनेमांचा तुमचा प्रवास, कुठली भूमिका सर्वाधिक भावली ? तुम्ही रिलेट झालात अशा कुठल्या भूमिका ?**

-हे सांगणे कठीण आहे ... सध्याच्या काळात उदंड पुरस्कार झालेत पण १९७०-७५-८० मध्ये कुठे फारसे पुरस्कार होते? सगळ्याच भूमिका समरसतेने केल्यात, पुरस्कार मिळेल असं कधी वाटलं नाही, ती भावना नव्हतीच. . अशी ही बनवाबनवी, आपली माणसं, खरा वारसदार भूमिका आवडल्यात.

**पडद्यावर मराठी -हिंदी सिनेमातील तुमच्या अनेक भूमिका गाजल्यात.. कधी विनोदी, कधी भोळा भाबडा, कधी इरसाल अशा मानवी मनाच्या अनेक छटा ऑन स्क्रीन गाजवणारे अशोक सराफ प्रत्यक्ष जीवनात कमी बोलतात हे तुम्ही सांगितलं ह्या खेरीज हा स्टार अशोक सराफ घरगुती आयुष्यात कसा आहे ?**

- मी मितभाषी आहे असं माझा भाऊ सुभाष सराफ ह्याचं स्पष्ट मत आहे, मी बोलका नाही, पण तरीही मी सगळ्यांशी जुळवून घेतो, मला माझ्या सान्निध्यातील व्यक्तींबद्दल सकारात्मक भावना कायम असतात, पण मी स्वभावाने सोशल नाही, मी मैत्री करू शकत नाही .. घडघड बोलता येत नाही. कधीही भाषण करता येत नाही. अविनाश खर्शीकर, लक्ष्मीकांत बेर्डे, सुधीर जोशी माझे जवळचे मित्र होते , हे कुणीही जगात राहिले नाहीत . कुणाशी गप्पा मारायच्या मी आता ? सचिन पिळगांवकर माझा जवळचा मित्र आहे, तो मला त्याचा भाऊच मानतो. त्याच्या वडिलांना मी 'पपा' म्हणत असे. आमचे जिव्हाळ्याचे कौटुंबिक संबंध आहेत. वाद -विवाद, कॉन्ट्रोव्हर्सीजमध्ये मी नसतो. फारच कुणी जवळच्या व्यक्तीने मला माझं मत विचारलं तरच मी बोलतो. खूपदा वाद-विवादांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पब्लिसिटी स्टंट म्हणूनही असू शकतो. अर्थात मी इगो देखील ठेवत नाही .

शूटिंग, नाटकाचा शो असल्याखेरीज मी घराबाहेर आताशा पडतच नाही .. विनाकारण बाहेर पडायचे कारण नसते. घरात असलो कि वाचन करतो, टीव्ही पाहतो, कधी नाटक पाहायला जातो, ओटीटी वर काही उत्तम कॉन्टेन्ट पाहतो .

खाण्या -पिण्याच्या बाबतीत मी फार चोखंदळ नाही, इतकंच काय पानात थंड अन्न असले तरी मी अन्न हे पूर्ण ब्रम्ह मानत जेवतो.

**सोशल मीडिया हल्ली जीवनाचा अविभाज्य भाग बनलं आहे, कलावंतासाठी तर सोशल मीडिया अत्यावश्यक ठरलंय ... तुमचा वावर**

लहान मुले/मुली आणि बाळांसाठी : बारसे, उष्टावण, जावळ, वाढदिवस, मुंज

# वास्तु विशेष



## वास्तुशांती

नविन घर किंवा Office घेतल्यावर केला जाणारा प्रथम व अतिशय शुभ विधी म्हणजे वास्तुशांती!
घरात किंवा Office मध्ये काही मोठा रचनाबदल केल्यानंतरही वास्तुशांती केली जाते.
तसेच दर १२ वर्षांनी वास्तुशांती पुन्हा करता येते.
वास्तुशांतीमुळे वास्तुशुद्धी होऊन घर अतिशय सुखी व समाधानी होते असे तज्ञांचे मत आहे.

## गृहप्रवेश

काही अपरिहार्य कारणामुळे जर वास्तुशांती विधी करून घेणे शक्य नसल्यास गृहप्रवेश विधी केला जातो.
गृहप्रवेश विधी करून नंतर नविन घरात रहायला सुरुवात केली जाते आणि नंतर योग्य मुहूर्तावर वास्तुशांती केली जाते.





## उदकशांती

वास्तुशुद्धीसाठी अतिशय महत्त्वाचा मानला गेलेला विधी म्हणजेच उदकशांती. उदकशांती ही ब्रह्मदेवाची उपासना आहे. घरातील कुटुंबाचे आरोग्य, शिक्षण तसेच व्यवसायात उत्तम यश प्राप्त करून घेण्यासाठी घरात व व्यवसायातील उत्तम प्रगतीसाठी Offices मध्ये उदकशांती करून घ्यावी असे तज्ञांचे मत आहे. तसेच घरातील प्रिय व्यक्तीच्या दु:खद निधनानंतर आणि नारायणबली/नागबली, त्रिपींडी श्राद्ध असे विधी केल्यानंतरही उदकशांती केली जाते.


OPANDIT®
SHUBHAM BHAVATU




+91-9167968204
mrudula.barve@oPandit.com
www.oPandit.com

Think of a Dharmic Vidhi, Think of oPandit !
संपूर्ण सामग्रीसहित


श्राद्ध विधी : हिरण्य श्राद्ध, सपिंडक श्राद्ध, अंत्येष्टि विधी

इतर पूजा आणि शांती : सत्यनारायण, उदकशांती, वास्तुशांती, सहस्त्रावर्तन, लघुरुद्र

वधू आणि वर यांसाठी : लग्न, साखरपुडा

ज्येष्ठ नागरिकांसाठी : साठीशांत, पंच्याहत्तरी, ऐंशी वर्षांची शांत

**मात्र सोशल मीडियावर दिसत नाही हे कसं काय ?**

- सोशल मीडिया सोडूनच द्या पण माझ्या फोनचा वापर फक्त फोन घेण्यासाठी आणि क्वचित फोन करण्यासाठी करतो. मी व्हाट्स अप देखील वापरत नाही. सोशल मीडियात मला रस नाही, त्याची आवश्यकता मला भासत नाही, माझं वैयक्तिक जीवन - माझी स्पेस, त्यातील खाजगीपण जपणं मला आवडतं.. मुद्दाम असं नाही पण माझ्या स्वभावाचा तो भाग आहे. सोशल मीडियामुळे अनेक जण स्टार बनतात म्हणे, काही बनतही नाहीत. सोशल मीडिया माझ्या काळात नव्हता पण तरीही कलाकार होतेच, उत्तम कलाकृती घडतच होत्या.. त्यामुळे मला आज सोशल मीडियाची गरज वाटत नाही. मला असे वाटत नाही की सोशल मीडियावर नसल्याने काळाच्या मागे आहे ! कधी संधी मिळाली तर तबला वाजवणं मला आवडतं .

**अभिनेत्री निवेदिता जोशी - सराफ ह्यांचे तुमच्याशी लग्न होऊन ३३ वर्षे झालीत, त्यांचे तुमच्या जीवनातील योगदान ?**

- निवेदिताचे माझ्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण ! मी सतत कामात व्यग्र, अगदी मुसाफिरासारखा.. त्यामुळे लग्नाबाबत मी फार गंभीर नव्हतो. निवेदितासोबत काही फिल्म्स एकत्र केल्याने तिचे माझ्यावर प्रेम बसणे तसे नॉर्मल होते.. तिनेच मला लग्नाचे प्रोपोजल दिले आणि कालांतराने मी होकार दिला. आमच्या लग्नानंतर माझ्या जीवनाला कमालीचे स्थैर्य लाभले. तिने माझ्या खाण्यापिण्याकडे लक्ष दिले, मला मानसिक बळ मिळालं. जीवनाची घडी खूप छान बसवली तिने. मला समजून घेतले. आमच्या लग्नानंतर आम्हांला मुलगा झाला. अनिकेतला अभिनयाची आवड नसल्याने तो शेफ झाला आणि गेली काही वर्षे तो अमेरिकेत शेफ आहे. त्याचा अभिमान आहे कारण त्याचा मार्ग, करियर त्याने स्वतः शोधून काढले. आमच्या लग्नानंतर काम करायचे नाही हा निर्णय तिचा तिने घेतला. १४ वर्षे ती अभिनया पासून जाणीवपूर्वक दूर राहिली, स्वतःचा संपूर्ण वेळ तिने अनिकेतला दिला. त्या नंतर तिने अभिनयात परतण्याचा निर्णय घेतला जेंव्हा अनिकेत मोठा झाला होतॉ. पत्नी, आई, गृहिणी ह्यात निवेदिताला मी पूर्ण गुण देईन. सराफ आणि जोशी ह्या दोन्ही कुटुंबाला निवेदिताने तिच्या मधुर व्यवहाराने जिंकून घेतलं आहे. तिने आर्थिक व्यवहार ही सांभाळलेत, मला काही पाहावं लागलं नाही .

**ज्येष्ठ अभिनेता म्हणून वाहवा होतेय, मग आता अभिनयात प्रदीर्घ अनुभव आल्यानंतर अभिनय क्लास सुरु करावेसे वाटत नाहीत का ? दिग्दर्शक व्हावेसे वाटत नाही का ?**

- पालवी ह्या संस्थेसाठी काम करणं मी सामाजिक कर्त्यव्य मानतो. तेथे राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांना मी, निवेदिता जमेल तितकी मदत करतो, पण ऍक्टिंग क्लास काढावेसे वाटत नाहीत. हल्लीच्या पिढीला अभिनय शिकवण्याची गरज आहे असं मला वाटत नाही .

मी ज्या दिवशी दिग्दर्शक बनेन त्या दिवसापासून अभिनय करणं मला जमेल असे वाटत नाही. शक्यतो एका वेळेला एकाच कामावर लक्ष्य एकाग्र करण्याची माझी सवय आहे .

**प्रख्यात क्रिकेटपटू सुनील गावस्कर ह्यांचे तुमच्याशी असलेले मैत्र कसे काय ?**

- आम्ही दोघंही गिरगावच्या चिखलवाडीत राहत होतो . आम्ही दोघांनी लहान असताना 'गुरुदक्षिणा' नावाच्या नाटकात अभिनय केला होता. सुनीलने कृष्णाची तर मी बलरामाची भूमिका केली होती. पुढे त्याला क्रिकेटची आवड निर्माण झाली आणि त्याने क्रिकेटचा सराव सुरु केला आणि मी अभिनयात आलो. आम्ही दोघंही गेली ५० वर्षे आपापल्या क्षेत्रात सक्रिय आहोत, आमची मैत्री आजही आहे

**पन्नास वर्षे मोठा कालखंड आहे , ह्या पन्नास वर्षांमध्ये इंडस्ट्रीमध्ये प्रामुख्याने कोणते बदल जाणवतात ?**

- तांत्रिक बदल खूप झालेत..हल्ली सिनेमा मेकिंग वेगळेच झाले आहे..आशय वेगळा होत चालला आहे, काळानुसार - पिढीनुसार बदल घडत आहेत ..

कलाकारांच्या नव्या पिढीची मतं वेगळी आहेत. त्यांच्या वर्तणुकीत देखील बदल आहे. कालाय तस्मै नमः

**अलीकडेच तुमचे पुस्तक 'मी बहुरूपी' प्रकाशित झाले ! काय सांगाल त्याबद्दल ?**

- मला माझ्या आयुष्याचा ताळेबंद मांडण्यात रस नव्हता. अलीकडेपर्यंत वेळ नसे. मी पुस्तक लिहून ते कोण वाचणार, असाही विचार मनात आला. मी अमूक भूमिका अशी केली किंवा तशी केली हा मोठेपणा सांगण्यात मला रस नव्हता. पुस्तक एकदा वाचले की ते कपाटात जाते पण निवेदिता माझ्या पुस्तकाबद्दल ठाम होती, आग्रही होती. ५० वर्षांचे करियर, अनेक चित्रपट ह्या चित्रपटांविषयी आठवणींचे डॉक्युमेंटेशन व्हायला हवे अशा तिच्या आग्रहामुळे हे पुस्तक निघाले. ५० वर्षातले चित्रपट आणि त्या संबंधीच्या आठवणी बऱ्याचशा धूसर झाल्या. दीर्घ प्रवासाचा तपशील कुठे आठवतो आपल्याला ? काही महत्वाचे -ठळक चित्रपट, त्यांच्याशी निगडित आठवणी ह्या पुस्तकात समाविष्ट केल्यात. असो, ग्रंथालीसारखी मात्तबर प्रकाशन संस्था पुढे आली आणि ह्या सगळ्यांच्या प्रयत्नामुळे हे पुस्तक आकारास आले. माझ्या मुख्य सिनेमांचे डॉक्युमेंटेशन व्हावे असं निवेदिताच्या मनात होते.. 'मी बहुरूपी' ह्या पुस्तकाचे मुख्य श्रेय मी निवेदितालाच देईन .

**स्वतःचा फिटनेस कसा सांभाळलात ?**

- हल्ली जिमला जाणं जीवन शैलीचा भाग बनला आहे. पण माझ्या व्यस्त जीवन शैलीमुळे मला जिमला जाणं कधी जमून आलं नाही. आता तर कंटाळा येतो. फिटनेस सांभाळणं मला इतकंच शक्य आहे -मी प्रमाणात आहार घेतो, त्यामुळे वजन मर्यादेत राहतं.. योगा करतो इतकंच .'

**जीवनातल्या अविस्मरणीय घटना कोणत्या ?**

- २९ मार्च १९७५ रोजी दादा कोंडके यांचा पांडू हवालदार सिनेमा दादरच्या कोहिनुर सिनेगृहात रिलीज झाला, हा सिनेमाचा प्रीमियर शो होता. इंटरव्हल झाला, मी आणि माझ्या

सोबत माझा भाऊ सुभाष होता .. आम्ही चहा घेण्यासाठी काऊंटरवर जाईपर्यंत निमंत्रित आणि प्रेक्षक सगळ्यांच्या कौतुकमिश्रित नजरा माझ्यावर खिळल्या होत्या ! माझ्या करियरमधील हा क्षण मी कधी विसरू शकणार नाही .. ह्या चित्रपटाने मला 'पहचान' दिली.. आणि पुढील दरवाजे आपोआप उघडले ..

१९८७ मध्ये मला एक जीवघेणा अपघात झाला, डॉक्टर नंदकिशोर लाड आणि डॉक्टर प्रेमानंद रामाणी ह्यांनी भगीरथ प्रयत्नांनी मला जीवनदान दिले. त्या अपघाताविषयी मी सविस्तर बोलणं टाळतो कारण त्या आठवणी देखील मला आजही बैचैन करतात! पण मी मानतो माझ्यावर प्रेम करणाऱ्या समस्त रसिकांच्या प्रेमामुळे आणि शुभेच्छांमुळे मी सुखरूप वाचलो आणि आज तुमच्यासमोर धडधाकट बसलोय!' असंख्य प्रेक्षक मला रुग्णालयात भेटून गेले आणि माझ्या भावाने त्यांना एकेकाला आतमध्ये माझ्या रूममध्ये सोडलं.. ह्या आठवणी, रसिकांच्या प्रेमाची पुंजी माझ्याकडे आहे.. म्हणून मी बचावलो.. डॉक्टरांचे उपकार आहेतच ..

**चौकट - अशोक सराफ आणि महालक्ष्मी ट्रेन**

एक काळ अशोक सराफ आणि त्यांचे मित्र - सहकलाकार लक्ष्मीकांत बेर्डे यांनी -त्यांच्या धमाल कॉमेडी सिनेमांनी गाजवला. मुलाखतीच्या ओघात लक्ष्मीकांत यांनी सहजगत्या सांगितलं -फार थोडे मित्र आहेत त्यांचे ज्यात लक्ष्मीकांत बेर्डे, अविनाश खर्शीकर आदींची नावं त्यांनी घेतली. अशोक सराफ भले ही मितभाषी असतील, सोनं जडजवाहीर ह्यात न गुंतलेला हा सराफ अभिनयात गुंतला, स्वतःत, अभिनयात रमला पण तरीही चित्रसृष्टीतील अनेकांना त्यांनी मदत केलीये. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर ह्यांना टॅक्सीत पिकअप करून ड्रॉप करणारे (अर्थात त्यांच्याकडून कधीही पैसे न घेणारे !) अशोक सराफ निर्विवाद सहृदय अभिनेते आहेत ..

त्यांच्याकडून समजलेला हा एक हृदय प्रसंग- मराठी सिनेमांची चित्रणं १९७०-८०-९० पर्यंत सर्रास कोल्हापूरला होत असत . मुळात अत्यंत साधं - निगर्वी व्यक्तिमत्व असलेल्या अशोक सराफकडे बडेजाव - मोठेपणा कधीही नव्हता ..त्यामुळे मराठी सिनेमाचा अनभिषिक्त सम्राट असलेल्या अशोक सराफ ह्यांनी स्वतःसाठी सेकंड एसी मुंबई-कोल्हापूर असं तिकिट देखील कधी आरक्षित केलं नाही. सहजपणे द्वितीय वर्गाचे तिकिट काढून कोल्हापूरला जायचं असा शिरस्ता..कारण महालक्ष्मी एक्स्प्रेस रात्री निघून सकाळी कोल्हापूरला पोचते. पण एका प्रवाशाने अशोक सराफ ह्यांना पाहून मानहानीकारक कमेंट केल्या. इतका मोठा स्टार पण सेकंड क्लासमध्ये कसा प्रवास करू शकतो ? ह्या प्रसंगानंतर अशोक सराफ ह्यांनी द्वितीय वर्गाचे तिकीट कधीही काढले नाही आणि प्रथम वर्गातूनच प्रवास केला ..

स्वतःच्या स्टारडमविषयी देखील अशोक सराफ आग्रही नव्हते! पण एका सहप्रवाशाने मारलेल्या रिमार्कनंतर अशोक सराफ ह्यांनी ट्रेनच्या द्वितीय वर्गाला कायमचा रामराम ठोकला !


**पूजा सामंत**

पत्रकारितेत फॅशन, लाईफस्टाईल, फूड, फिल्म यात अनुभव.
९८७०५ ९१४७७


# हरपले भान

पाण्याला भरते आले
क्षितिजाच्या काठावरती
कुणी रिंगण घालीत होते
तुझ्या मनाच्या भवती

हसणारी खणू नवी
जोडनू गेली नाती
असलेल्या नसलेल्या
मनात फुलल्या वाती

भिजलेल्या वाटेवरती
हातात गुंतले हात
त्या अमीट क्षणातून आले
तुझ्या मनातले गीत

पाण्याला काळोख किनार
समुद्राला अनोखी गाज
कोमेजनू जाता काठ
दरू चमकली वीज

पसरल्या चांद पाण्यात
कसे हरपले भान
तू पुंकर घालताना
हळुवार झाले प्राण


**अशोक बेंडखळे**
९८६९२ ५८५८५

# गुरुकुल




गुरुकुलचा अभ्यासक्रम ठरवताना प्रामुख्याने तीन विषय विचारात घेतले गेले. भारतीय संस्कृतीची ओळख, मुलांच्या मातृभाषेतून संवाद आणि मातृभाषा (लिहिणे, वाचणे ) शिक्षण या तीन मुख्य विषयांवर भर दिला गेला.



**अरुंधती भेडसगावकर**

"इतक्या वर्षांनी अमेरिकेला लेकाकडे जायला मिळाल म्हणून आनंद आणि खेद अशा संमिश्र भावना आहेत." माझ्या मैत्रिणीच्या काकू त्यांच्या अमेरिकेतल्या वास्तव्याबद्दल सांगत होत्या. मी कुतूहलाने त्यांना कारण विचारलं. "अगं, दोन्ही नातवंडांशी गप्पाच मारता आल्या नाहीत. त्यांचं इंग्रजी अमेरिकन ढंगाचं. त्यांना मराठी येत नाही त्यामुळे मी काय बोलते ते त्यांना कळत नाही आणि मला त्यांची भाषा कळत नाही. मी काही खायला करून घालीन म्हटलं तर त्यांना अमेरिकन पदार्थ खाण्याची सवय!". हे ऐकून मी विचारात पडले. अमेरिकेत राहणारी भारतीयांची मुलं आपल्या संस्कृतीपासून दूर चालली आहेत का? अर्थात, यात त्यांची काहीच चूक नाही. अमेरिकेत स्थायिक झालेल्या बहुतांशी भारतीयांच्या मुलांची भारतीय संस्कृतीशी फारकत झाली तर नवल नाही कारण अमेरिकन वातावरणात लहानाचं मोठं झाल्यामुळे भारतीय सण ,खाद्यसंस्कृती, आपली मातृभाषा या सर्वांची ओळख करून दिल्याशिवाय त्यांना ती कळणार नाही आणि त्याविषयी आपुलकी देखील वाटणार नाही. अशी भावनिक जवळीक निर्माण करण्यासाठी गेली २५ वर्षं कार्यरत असलेली एक संस्था अमेरिकेत सिएॅटल (Seatle) मध्ये आहे असं अलीकडेच कळलं . माझे वर्गमित्र शेखर जोशी नुकतेच आमच्या शाळेच्या reunion ला आले होते. या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर असल्यामुळे त्यांच्याकडून संस्थेच्या कामाबद्दल सविस्तर माहिती कळली. संस्थेची वाटचाल 'गुरुकुल' ची सुरुवात एका घरात ७ मुलांच्या वर्गाने १९९८ साली झाली. आता २५ वर्षांनंतर, १५२० विद्यार्थी आणि ४४० स्वयंसेवक असा संस्थेचा मोठ्ठा पसारा आपल्याला संस्थेच्या यशाबद्दल बरंच काही सांगून जातो.

अर्थात हा प्रवास सहज,सुकर असा नव्हता. 'पीट्सबर्ग मधून सिएॅटलला स्थलांतर झाल्यावर मुलींसाठी मराठी शाळा शोधताना 'गुरुकुल' चा शोध लागला आणि तेंव्हापासून गुरुकुलशी कायमचं नातं जोडलं गेलं' असं शेखर जोशी सांगत होते. सुरुवातीची ५ वर्षं, इतर ठिकाणी या प्रकारचं काम चालू आहे का आणि असल्यास कशा प्रकारे चाललंय - हा शोध घेण्यात गेली. त्यानंतरची ५ वर्षं , मुलांना नक्की काय शिकवायचं हा विचार पक्का करून त्याप्रमाणे ५ व्या वर्षांपासून ते हायस्कूल


भारतीय जनता पार्टी
विलेपार्ले विधानसभा
सरत्या वर्षाला निरोप देत नवी स्वप्न,
नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत
नवीन वर्षाच स्वागत करु..
आपली सर्व स्वप्न, आशा, आकांक्षा पूर्ण होवोत
या प्रार्थनेसह, नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..!
नूतनवर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
स्वागत
२०२३
-: शुभेच्छुक :-
पराग म. अळवणी
(आमदार - विलेपार्ले विधानसभा)
विलेपार्ले विधानसभेतील
सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते




सुरु व्हायच्या आत , एकूण ६ वर्षांत शिक्षण पूर्ण होईल असा अभ्यासक्रम आखण्यात गेली. पहिल्या दहा वर्षांत शिक्षक तयार करण्याचंही काम झालं. पालकातल्याच काही स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिलं. हे करत असताना गुरुकुलला येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३०० ची ५०० आणि ५०० ची १००० अशी वाढत होती. गुरुकुलचा अभ्यासक्रम ठरवताना प्रामुख्याने तीन विषय विचारात घेतले गेले. भारतीय संस्कृतीची ओळख, मुलांच्या मातृभाषेतून संवाद आणि मातृभाषा (लिहिणे, वाचणे) शिक्षण या तीन मुख्य विषयांवर भर दिला गेला. सुरुवातीला भारतातली भाषेची पुस्तकं मागवली आणि त्याप्रमाणे शिकवायला सुरुवात केली. पण मुलांना पुस्तकं जशीच्या तशी वापरणं कठीण वाटत होतं. त्यामुळे मुलांना अगदी सोप्या पद्धतीने शिकता येईल अशी पुस्तकं पालकांतल्याच काही जणांनी लिहिली. भारतातला एक वर्षाचा भाषेचा अभ्यास दोन-अडीच वर्षांत शिकता येईल असा अभ्यासक्रम तयार केला. आता एका वर्गात २०-२२ मुलं असतात. संस्कृती, संवाद आणि भाषा या तीन विषयांसाठी ३ शिक्षक एका वर्गासाठी असतात. प्रत्येक विषयासाठी ४५ मिनिटांचा वर्ग असतो. पहिली दोन वर्षं, मुलांना आपल्या भाषेची ओळख करून देण्यात येते. पुढची दोन वर्षं साधी सोपी वाक्यरचना करायला शिकवलं जातं. शेवटची दोन वर्षं मुलांना व्याकरण, कविता शिकवल्या जातात. यामुळे मुलांचा भाषेविषयीचा आत्मविश्वास वाढतो. यातून मुलांना १० टक्केच शिक्षण मिळतं , बाकीचा ९० टक्के भाग त्यांनी स्वतः शिकायचा असतो. यासाठी पालकांनी आपल्या मुलांशी मातृभाषेत बोलावं असा गुरुकुलचा आग्रह असतो. गुरुकुलची सुरुवात हिंदी भाषा शिकवून झाली पण आता गुरुकुलमध्ये हिंदी, गुजराथी, मराठी आणि कन्नड अशा चार भाषा शिकवल्या जातात. अर्थात प्रत्येक मुलाने आपल्या मातृभाषेत शिकावं हा उद्देश असतो. पालकांचा सहभाग गुरुकुलमध्ये शिकवणारे सगळे पालकंच आहेत. कोणतंही मानधन नं घेता ते शिकवतात. फक्त शिकवण्याचा अनुभव नसलेल्यांना काय आणि कसं शिकवायचं याबद्दल शंका असतात. शेखर जोशी आणि कार्यकारी मंडळातले इतर पदाधिकारी प्रत्यक्ष शिकवत नसले तरी पालकांच्या शंका दूर करणे, त्यांना कोणत्या विषयाची आवड आहे, त्यांना किती वेळ आहे हे जाणून घेऊन त्यांना शिकवण्यासाठी सोयीची वेळ देणे, पालकांच्या मनातली भीतीची भावना घालवणे ही पदाधिकाऱ्यांची जबाबदारी असते. संस्कृतीची ओळख, संवादातून शिक्षण आणि भाषा शिक्षण या तीन मुख्य विषयांपैकी 'संस्कृती पाठ' देणं सोपं असतं. त्यामुळे संस्कृती पाठाचा आराखडा बनवून दिला जातो. यामध्ये, आपले सण, रितीरिवाज याबद्दल माहिती देणं, त्यासाठी मुलांना काही ॲक्टिव्हिटी देणं हे अपेक्षित असतं. उदाहरणार्थ, गणेश चतुर्थीला लहान गटाला छोटे गणपती रंगवायला दिले जातात. मोठ्या गटाला गणपतीची मूर्ती बनवायला देतात. दिवाळीत कंदील बनवायला शिकवलं जातं . हे करत असताना नवीन शब्द, वाक्यरचना यांची विनासायास ओळख होते. संवादाचे पाठ घेताना, रोजच्या जीवनातले, मुलांच्या आवडीचे विषय घेऊन दोन-तीन मुलांना घेऊन संवाद करणे, हे करताना एखादा शब्द अडला तर त्याची ओळख करून देणे, अर्थ समजावणे – हे पालकांकडून अपेक्षित असतं . त्यातल्या त्यात कठीण विषय म्हणजे 'भाषा शिकवणे'. याकरता पालकांना थोडी तयारी करावी लागते. मुलांशी 'इमोशनल बॉण्डिंग' चे प्रयत्न. गुरुकुलमध्ये आल्यावर मुलांना इथे येण्याची गोडी लागावी यासाठी काही विशेष प्रयत्न केले जातात. मुलांचे वर्ग रविवारी असतात. वर्ग सुरु होण्याआधी सर्व विद्यार्थ्यांना प्रार्थनेसाठी एकत्र आणलं जातं एकत्रितपणे प्रार्थना गायल्यामुळे मुलांमध्ये आपापसात एक भावनिक जवळीक व्हायला मदत होते. वर्षभरात चार मुख्य कार्यक्रम (events) असतात. ४-५ तासांचा दिवाळीचा कार्यक्रम असतो, २६ जानेवारीच्या आसपास 'बाजार' असतो. उन्हाळ्यात एक पिकनिक असते. वार्षिक दिनाच्या निमित्ताने मुलं काही गाणी, छोटी नाटिका असे विविध करमणुकीचे कार्यक्रम बसवून सादर करतात. आपल्याकडच्या विविध सणांच्या निमित्ताने विविध भाषिकांचे वेष घालून मुलांसाठी सांस्कृतिक प्रात्यक्षिकं (Cultural demos) सादर केली जातात. यामुळे आणि नवीन मित्र मैत्रिणी जोडण्याच्या ओढीने मुलं उड्या मारत गुरुकुलमध्ये येतात.

नवीन भाषा शिकण्याचे फायदे. अमेरिकन शिक्षण पद्धतीत मुलं एक फॉरेन लँग्वेज शिकतातच. शिवाय, गुरुकुलमध्ये शिकलेल्या भाषेची परीक्षा देऊन मुलं कॉलेजसाठी क्रेडिट्स मिळवू शकतात. हा फायदा दिसल्याने मुलं आणखी एक नवीन भाषा शिकण्यासाठी प्रवृत्त होतात. युथ बोर्ड (youth board) गुरुकुल मधून ग्रॅज्युएट झालेले विद्यार्थी पुढे गुरुकुलच्या कामात सहभागी व्हावेत यासाठी 'युथ बोर्ड' ची स्थापना केली. हायस्कुलमध्ये विद्यार्थ्यांना कम्युनिटी सर्व्हिस करायला लागते. त्यासाठी मुलं लायब्ररी,हॉस्पिटलमध्ये काम करतात. ह्याऐवजी त्यांनी गुरुकुल या इंडियन कम्युनिटीसाठी काम केलं तर ती कम्युनिटी



सर्व्हिस समजली जाते. त्यामुळे गुरुकुल ग्रॅज्युएट्सना यासाठी प्रोत्साहन देतात. शेखर जोशींच्या दोघी मुलींनी 'शिक्षक सहाय्यक' म्हणून काम केलं होतं. गुरुकुलमधल्या एखाद्या कार्यक्रमाचं पूर्ण आयोजन करायला या ग्रॅज्युएट्सना सांगितलं जातं. यातून मुलांना संघटनात्मक कौशल्य, नियोजन कौशल्य मिळवायला मदत होते. आर्थिक मदत होते. गुरुकुलचे शिक्षक म्हणजे पालक काही मानधन घेत नसले तरी मुलांसाठी पुस्तकं छापून घेणं, त्यांना त्यांच्या अभ्यासासाठी लागणारं साहित्य पुरवणं, चार मुख्य इव्हेंट्सच्या वेळी चहा-पाणी, जेवण इत्यादीचा खर्च - हे सर्व गुरुकुलच्या पैशातून होतं . विद्यार्थ्यांकडून वर्षाचे ३०० डॉलर एवढी फी घेतली जाते. याशिवाय, सिऍटलमधल्या मायक्रोसॉफ्ट, गूगल, फेसबुक सारख्या कंपन्या, त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या स्वयंसेवेच्या बदल्यात दर तासामागे ठराविक पैसे देणगी स्वरूपात गुरुकुलला देतात. यामुळे कोणत्याही, कर्जाशिवाय गुरुकुलचा आर्थिक गाडा व्यवस्थित चालतो.

गुरुकुलचे फायदे ५ व्या वर्षापासूनच भाषा शिकवल्यामुळे मुलं स्पंजप्रमाणे टिपून घेतात आणि त्यांना भाषा लवकर आत्मसात करता येते. आपण शिक्षण घेतोय ही भावना त्यांच्या मनात नं येता गप्पा गोष्टींतून, मजेत मुलं भाषा शिकतात. शिवाय, नवीन मित्र मैत्रिणी जोडल्या जातात. 'गुरुकुलमध्ये शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये गेल्यावर भारतीय संगीताची आवड निर्माण होते. भारतीय सिनेमे बघायला त्यांना आवडायला लागतं . काही मुलं कॉलेजमध्ये इंडियन क्लबचे प्रेसिडेंट होतात. मुलांना आपली मातृभाषा लिहिता वाचता यायला लागली कि त्यांना नवीन दारं उघडतात. उदाहरणार्थ, आपल्याकडल्या होळी या सणाची माहिती ते आपल्या मित्रांना सांगतात त्यावेळी समाधान वाटतं.' असं शेखर जोशी सांगत होते. गुरुकुल संस्थेमध्ये काम करणाऱ्यांना त्यांच्या कामाची खरी पावती मुलांच्या आज्जी आजोबांकडून मिळते. शेखर जोशी यांना कितीतरी आजी आजोबानी भेटून सांगितलं की आमचा नातू / नात तुमच्या प्रयत्नांमुळे आमच्याशी आमच्या भाषेत बोलतो ! गुरुकुल मधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात सुरुवातीला असलेला गोंधळ कमी होतो. आपल्यासारखीच इतर मुलं इथे येतात आणि त्यांच्याशी संपर्क वाढवून आपण आपलं एक नेटवर्क बनवू शकतो ही भावना बळावते. शेखर जोशी म्हणतात 'हे सर्व अनुभवलं की एक वेगळंच समाधान मिळतं आणि दर रविवारी तीन तास चांगल्या रीतीने घालवल्याचा आनंद मिळतो.'

गुरुकुलबद्दल आणखी माहिती हवी असल्यास खालील लिंकचा वापर करता येईल.

https://gurukulwb.azurewebsites.net/

# वाहत्या नदीच्या काठी

बागडत जाणाऱ्या नदीशी
हृदयस्पर्शी हितगुज करणं
प्रत्येकाला जमेलच असं नाही

तिच्या अवखळ पात्रात
मारली असेल ज्यांनी उडी
जीवावर उदार होऊन
आणि घेतलाही असेल ठाव
तिच्या खोल तळाचा
त्यांनाच कळेल तिचं मन

नाही म्हटलं तरी
दिसेल तुम्हाला एखादा चुकार कवी
वाहत्या नदीच्या काठी बसून
नदीच्या लहरींशी हितगुज करणारा

जो लिहीत बसला असेल
नदीची रसधार गाथा
तिच्याच वाहत्या जलधारेवर
आपल्या मनस्वी शब्दांना रेखाटत

**रमेश नागेश सावंत**
९८२१२ ६२७६७


**अरुंधती भेडसगावकर**

शास्त्रीय संगीत अभ्यासक. पर्यावरण विषयक आणि व्यक्तीचित्रणात्मक लेखनाची आवड

arundhati.bhedasgaonkar@gmail.com
९८८१४ ७३२०८



# कर्म धर्म अधिकारी ...
# अविनाश धर्माधिकारी
## (पोलीस उपअधिक्षक - Dy SP)



अमरेंद्र करंदीकर

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने, लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने! जे दिव्य दाहक म्हणुनी असावयाचे! बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतीचे!! इति स्वातंत्र्यवीर सावरकर... प्रयोगशील पालकत्व ध्यासाची चैतन्यमूर्ती म्हणजे स्वातंत्र्यवीर.. प्रसंगी निखाऱ्यावरूनही चालत जावं लागलं तरी बेहत्तर अशी त्यांची मनोवृत्ती..

आपण सगळेच सावरकर होऊ शकत नाही. पण काहीजण तो वसा घेतल्याप्रमाणेच, परिणामांची फिकीर न करता स्थितप्रज्ञ राहून आपल्या कार्यक्षेत्रात ठसा उमटवू शकतात. कर्म हेच धर्म मानणारे व महाराष्ट्र पोलीस दलाला भूषणावह उपअधीक्षक श्री अविनाश धर्माधिकारी निश्चितच अशा व्यक्तींच्या मांदियाळीत चपखल बसतात.

नाशिकहून प्रशिक्षण घेऊन नोकरीच्या सुरुवातीच्या दिवसातच आपल्या कर्तव्यदक्षतेची चुणूक त्यांनी दाखवली. त्या दरम्यान मंगळसूत्र, सोनसाखळ्या खेचून चोरून नेण्याचे बरेच गुन्हे दाखल व्हायचे. काहींची उकल व्हायची. बरेचसे रेंगाळायचे. मुद्देमाल मिळायलाही बराच अवधी जायचा. त्या चोरांनी नेलेले सोने दागिने, ठराविक सराफाकडे विकून ते वितळवलेही जायचे. पण अवघ्या चोवीस तासात शिताफीने गुन्हेगारांना मुद्देमालासह पकडून, ते दागिने तक्रारदारांना परत करण्याची कामगिरी पोलीस उपनिरीक्षक अविनाश धर्माधिकारी यांनी केली. हस्तगत केलेले दागिने मूकबधिर असलेल्या गृहिणीला परत केल्यावर, तिच्या चेहऱ्यावरचे समाधान व कृतज्ञतेची भावना, धर्माधिकारी यांना पोचपावती होती. या कामगिरीबद्दल एका समारंभात पोलीस आयुक्तांच्या पत्नीकडून धर्माधिकारींचा यथोचित गौरव करण्यात आला.

अशीच रात्रपाळीची ड्युटी होती. फोन खणखणल्यावर एका अपघाताबद्दल माहिती मिळाली. एका भरधाव ट्रकने एका माणसाला उडवलं होतं. लगेच अपघातस्थळी धाव घेऊन झालेली दुर्घटना पाहिली.. त्या माणसाचा छिन्नविछिन्न देह.. पण मनावर काबू ठेवून इतर सहकाऱ्यांच्या मदतीने ते अवशेष गोळा करून त्यांचा अंत्यविधी उरकला. ट्रक ड्रायव्हरलाही काही तासात अटक झाली.

२०१७-१८ चा सुमार.. मुंबई महापालिकेच्या निवडणुका जाहीर झालेल्या होत्या. साकीनाका पोलिस स्टेशन एकेकाळी



भाजपा
वॉर्ड क्र.८४



अटल सेवा केंद्र
आयोजित

# भव्य रोजगार मेळावा (वर्ष सातवे)

## शनिवार दिनांक 24 डिसेंबर 2022 , सकाळी 9 ते दुपारी 2

स्थळ : नित्यानंद म्युन्सीपल शाळा,गरवारे कंपनी समोर, सहार रोड, कोलडोंगरी, अंधेरी पूर्व

-: सहभागी संस्था :-

महाराष्ट्र शासन **कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यतम विभाग, महाराष्ट्र**

**Equitas Development initiative Trust & Rotary club of Mumbai Parleshwar**

## 2000 हुन अधिक नोकऱ्या उपलब्ध

-: खालील शैक्षणिक पात्रता असणाऱ्यांना संधी :-

**10वी, 12वी, ITI, SSC, HSC, BSC, BCA, BCOM, MCOM ,BSC IT, BE ,BTECH,MBA.**

**काही संस्था 3 महिन्याचे प्रशिक्षण विनामूल्य देणार व निश्चित नोकऱ्या देणार**

**ह्या शिबिरात स्वत:चा धंदा व्यवसाय करणाऱ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदीजी सरकार द्वारा मुद्रा लोन योजनेतून**

प्रधानमंत्री mudra योजना **10 लाख पर्यंतचे कर्ज**


**(without security or guarantee)**

सरकारी बँकेतून 2 दिवसात मंजूर करण्यात येईल.

-: आवश्यक कागदपत्रे :-

आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, 3 वर्षांचे income tax returns, 2 फोटो

**व्याज दर : 8.70% पासून**



-: ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्मसाठी :-

**Whatsapp - 8169727502**

ईमेल :- atalemployment@gmail.com

विभागातील पदाधिकारी व कार्यकर्ते



प्रमुख आयोजक :- **अभिजित सामंत**

माजी नगरसेवक - वॉर्ड क्र. ८४, संचालक - अटल सेवा केंद्र

विशेष सहाय्य :- **हेमांग जांगला**



बलात्कार व विविध गुन्ह्यांसाठी बदनाम झालं होतं. पोलीस दलाची प्रतिष्ठा पणाला लागली होती. धर्माधिकारीनी त्याचा चार्ज घेतल्यावर गुन्ह्यांवर असलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. बरीच मिश्र वस्ती असलेला साकीनाका परिसर ज्यात महापालिकेच्या तब्बल नऊ प्रभागांचा अंतर्भाव आहे. वस्तीनुरूप त्या त्या राजकीय पक्षांचे प्राबल्य, आपापसातील स्पर्धा, हेवेदावे; त्यामुळे सामाजिक शांतता अबाधित ठेवणं हे महा जिकिरीचं. पण अशा अस्थिर, संवेदनशील वातावरणात धर्माधिकारींची स्थितप्रज्ञता, सहज संवाद साधण्याची कला उपयुक्त ठरली. सर्व थरातल्या मंडळींच्या सभा, बैठका घेण्याचा त्यांनी सपाटा लावला. महिलांसाठी मोफत शिर्डी यात्रा, युवकांसाठी शांततेसाठी क्रिकेट असे उपक्रम राबवत सर्वांना आपलंसं करण्याचा प्रयत्न त्यांनी केला त्यामुळे पोलीसदलाची विश्वासार्हता तर वाढलीच, पण गुन्ह्यांचे प्रमाणही बऱ्याच अंशी कमी झालं. गुन्हे झालेच तर लोक आपणहून पुढे येऊन त्याची माहिती देऊ लागले. नऊ प्रभागात सुमारे शंभरच्या वर उमेदवार रिंगणात होते. त्यांच्यातली अहमहमिका शिगेला पोहोचण्याआधीच, धर्माधिकारीनी सर्वांसाठी भोजनाचा बेत आखला. सर्वांना त्यांच्या पती-पत्नीला घेऊन येण्याचे निमंत्रणही धाडलं. इथे कार्यकर्त्यांना मात्र मज्जाव होता. अट एकच होती की सर्वांनी पक्षवार न बसता एकमेकांत मिळून-मिसळून बसायचं. छान मनमोकळ्या गप्पाटप्पा व स्वादिष्ट भोजन, यामुळे उद्दिष्ट साध्य झालं. निवडणुका व मतमोजणीही बिनबोभाट पार पडली. मतमोजणी केंद्रावरच केंद्र अधिकारी व धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवारांचा सत्कार झाला. महापालिकेच्या इतिहासात असा प्रसंग विरळाच..

अशा अनेक साधक बाधक घटनांचा पट अविनाशभाऊ अलगद उलगडत होते. बरं हे कथन करताना चेहऱ्यावर कोणताही अभिनिवेश नाही. या क्षणी मला कविवर्य कुसुमाग्रजांच्या 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेतल्या काही ओळी आठवल्या ..'कोट्यावधी जगतात जीवाणू, जगती अन् मरती! जशी ती गवताची पाती!! नाविक आम्ही, परंतु फिरतो सात नभांखाली! निर्मितो नव क्षितिजे पुढती!!

सोलापूर जिल्ह्यातल्या सांगोला गावी पेशाने स्टेशन मास्तर असलेले वडील व आई गृहिणी अशा धर्माधिकारींच्या गृही, अविनाश यांचा १९६५ साली जन्म झाला. जणू थोरामोठ्यांचे पूर्वीचे आशीर्वाद फळल्याप्रमाणे, चार भाऊ चार बहिणी अशी आठ अपत्ये. आई वडिलांनी आर्थिक परिस्थितीची झळ यातल्या कोणालाही न लागू देता, शिक्षणाने व मनाने सर्वांना सधन केले. पाचवीपर्यंत बार्शीत शालेय शिक्षण घेतल्यावर, अविनाश गिरगावातल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत दाखल झाले. तदनंतर आठवी ते दहावी अंधेरीच्या परांजपे विद्यालयात.. अकरावी ते बीएससी केमिस्ट्री हे शिक्षण तेव्हाच्या पार्ले कॉलेजमध्ये पूर्ण केले. आता इथे अविनाशभाऊंच्या आयुष्याला कलाटणी देणारी विलक्षण घटना घडली. १९८७ जुलैमध्ये बी एस सी चा निकाल जाहीर होण्याआधी, वर्तमानपत्रात पोलीस दलाची अधिकारी भरतीची एक जाहिरात आली होती. त्यांच्या जवळच्या एका मित्राने त्यांना भरीस घालून अर्ज पाठवायला सांगितले. यथावकाश लेखी परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन, नंतर शारीरिक चाचण्या व मुलाखती पार पाडल्यावर; त्यांना पोलिस दलातर्फे नाशिकला प्रशिक्षण केंद्रात रुजू होण्याचे पत्र मिळाले. यात जिव्हारी लागणारी एक गोष्ट म्हणजे, ज्या मित्राच्या सांगण्यावरून पोलीस सेवेसाठी अर्ज केला; त्याची मात्र निवड होऊ शकली नाही.

नाशिकला अकरा महिन्याचे संपूर्ण प्रशिक्षण घेणाऱ्या धर्माधिकारींच्या बॅचमध्ये सुमारे पाचशे तीस उमेदवार होते. पण उत्तम गुणांकन झाल्याने, त्यांचं पहिलं पोस्टींग मुंबईतच झालं तेही दहिसर पोलीस ठाण्यात.. एकूण वीस अधिकारी असलेल्या ठाण्यात अविनाश व त्यांचे चार सहप्रशिक्षार्थी कनिष्ठ व अननुभवी अधिकारी म्हणून रुजू झाले होते.. पण याचे दडपण न आणता धर्माधिकारींनी प्रत्येक केस व तक्रारीचा सांगोपांग अभ्यास करून, त्याची कमीत कमी वेळात उकल करण्याचा चंग बांधला. सोनसाखळी चोऱ्या, निर्घृण हत्या, महिलांना पळवून नेणे, जाळणे असे अनेक दखलपात्र गुन्हे तर पाचवीलाच पुजले होते. पण त्या काळी संघटित गुन्हेगारी व टोळी युद्धे सायबर गुन्हे अशी नवी आव्हाने पोलिस

दलासमोर उभी ठाकली होती. त्यातच साखळी बॉम्ब अतिरेकी हल्ले यांची भर पडली. त्यामुळे संपूर्ण मुंबई ढवळून निघाली होती. पोलीस दलाची प्रतिष्ठा जणू धुळीस मिळवायची असा या सर्व मंडळीचा बेत असावा. राजकीय वरदहस्त हस्तक्षेप व अंतर्गत साठमारी यामुळे अशा भयंकर अमानवी गुन्हेगारांना जेरबंद करणे खूप कठीण झालं होतं. पण विविध पोलिस ठाण्यात बदल्या, गुन्हे शाखा (क्राइम ब्रांच), नवी मुंबई पोस्टींग ह्या सर्व आव्हानांवर मात करत धर्माधिकारी खरे उतरले.

गुन्हेगाराला कडक शिक्षा व्हावी अशी जनमानसाची धारणा असते. पण अशा गुन्ह्यांचे वर्गीकरण करून विशिष्ट मानसिक अवस्थेतून व आर्थिक अडचणीतून झालेले गुन्हेगार सराईत नसतात. केलेल्या अपराधाबद्दल योग्य शिक्षा होणं स्वाभाविक. पण त्यांचे योग्य समुपदेशन करून असे गुन्हे त्यांच्याकडून परत होणार नाही याची खात्री करून, त्यांचे समाजात पुनरुत्थान करणं हे एका संवेदनशील पोलीस अधिका-याचं कर्तव्य. अविनाशभाऊ यात शंभर टक्के खरे ठरले. पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून दंडेली करण्यापेक्षा, जर उत्तम संवादातून अशा समाजघटकांना 'ये हृदयीचे ते हृदयी' करता आलं तर अधिक उत्तम. धर्माधिकारींनी नेमकं हेच अंगी बाणलं व प्रत्यक्षात आणलंही.

या कामाच्या धबडग्यात त्यांनी दोन वर्षात कायद्याची LLB ही पदवी संपादन केली. याचा एकच उद्देश की भारतीय राज्यघटना व दंड संविधानातील कायद्याच्या तरतुदींचा समग्र अभ्यास व्हावा. याद्वारे इंग्रजीतून सफाईने वरिष्ठांसमोर वा न्यायालयात आपली बाजू मांडता यावी याकडे अविनाशभाऊंचा कटाक्ष असे. बरेचदा अशी वेळीअवेळी करावी लागणारी, एकही तास घरी न जाता व समाधानाची निद्रा न घेता करावी लागणारी नोकरी तापदायक ठरते. त्यामुळे व्यसनाधीनता, स्वभावात चिडचिडेपणा, प्रकृतीची हेळसांड यामुळे वैयक्तिक तसेच कौटुंबिक स्वास्थ्य पणाला लागतं. पण धर्माधिकारी याला खचितच अपवाद आहेत. उत्तम चारित्र्य, या वाटचालीत येणारे सर्व



मोहाचे क्षण, चांगल्या व्यक्तींचा व विचारांचा पगडा, सतत संपर्क, दांडगे वाचन व संगीत श्रवण; यामुळे धर्माधिकारी कायमच तनमनाने निरोगी निकोप राहिले आहेत. अशा क्षणोक्षणी आव्हान देणाऱ्या राजकीय व सामाजिक उलथापालथ करणाऱ्या घटना, वरिष्ठांचा विश्वास, समाजभान या मानसिक दोलायमानातल्या वादळात पाय घट्ट रोवून उभे राहणार हे काम नोहे येरागबाळ्याचं..कैकदा केलेल्या कामगिरीचं वेळेवर व योग्य फळ न मिळणं हे क्लेशकारक होऊ शकतं. अविनाशभाऊही याला अपवाद नाहीत. २०१८ साली पोलीस उपअधीक्षक अशा पदोन्नतीद्वारे ते डोंगरी पोलीस ठाण्यात रुजू झाले. तिथेही त्यांच्या संपर्क व संवाद कौशल्याने केवळ पावणेतीन वर्षांत त्यांनी सर्वांना आपलेसे केले. पारल्यासारख्या मुंबईच्या सुसंस्कृत पुण्यनगरीत ते पार्ले पोलीस ठाण्यात स्थिरावून व चांगले उपक्रम राबवून, ते फळास येण्याआधीच त्यांची राजकीय हेतूने नाशिकच्या प्रशिक्षण केंद्रात बदली झाली. पण अशा घटना या नोकरीत अपरिहार्य आहेत हे गृहीत धरल्याने अविनाशभाऊंची मानसिकता जराही डगमगली नाही. 'देर आये दुरुस्त आये' याला साजेसं म्हणून २०१९ साली राष्ट्रपती पदकाद्वारे, त्यांच्या सेवेचा बहुमान करण्यात आला. ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची बाब आहे. इथे परत कविवर्य ना.धोंच्या कवितेतल्या काही ओळी स्मरतात.. 'या नभाने या भुईला दान द्यावे आणि या मातीतून चैतन्य गावे! कोणती पुण्ये अशी येती फळाला! जोंधळ्याला चांदणे लगडून जावे!!"

थोडसं त्यांच्या कुटुंबाविषयी.. अविनाश भाऊंची गृहमंत्री असलेल्या सुविद्य पत्नी अनुजा बीई इलेक्ट्रिकल इंजिनियर असून एम.एस.सी.टी.सी.एल (पूर्वीची एमएससीबी) या सरकारी प्राधिकृत कंपनीमध्ये डेप्युटी एक्झिक्युटिव इंजिनियर पदावर कार्यरत आहेत. पतीची सतत आव्हाने देणारी पोलीसदलातील नोकरी, स्वतःची जबाबदारीची नोकरी, घर, संसार ही तारेवरची कसरत अनुजाताई शिताफीने सांभाळत आहेत. मुलगा अनिरुध्द बी.ई कॉम्पुटर ही पदवी प्राप्त करून एका खाजगी कंपनीत नोकरी करतोय...

धर्माधिकारी इकडेतिकडे बदल्या होऊनही पक्के पार्लेकर झाले आहेत. पारल्यातल्या अनेक धीमंतांत त्यांची वर्णी लागावी असे कर्तृत्व.. संवादाचे अनेक क्षण हेरून, त्याला सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरूप द्यायचं हे अविनाश भाऊंचं नित्याचं झालंय. युवकांसाठी क्रिकेट मॅचेस, समूहासाठी सहली, संपर्कात असलेल्यांचेच नाही तर तक्रार नोंदवताना लक्षात आलं तर त्याच दिवसाचे औचित्य साधून केक कापून ते वाढदिवस साजरे कसे



करावे हे धर्माधिकारीकडून शिकावं. अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे समुपदेशन करतानाच, ते बेकायदेशीर विकणाऱ्या समाजकंटकांचा निःपात, दीनानाथ नाट्यगृहामध्ये संपूर्ण वंदे मातरम या राष्ट्रगीताच्या निरूपण व गायनाचा कार्यक्रम आयोजित करणे व हाच कार्यक्रम चक्क काश्मीरमध्ये अतिसंवेदनशील ठिकाणी जाऊन करण्याचा मानस असणे, पालघर मधील आदिवासी पाड्यातील शौचालय, समाज थरात विकासकामे करणे, बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करणे.. हे सर्व धकाधकीची व शारीरिक मानसिक सामर्थ्याचा कस लावणारी नोकरी करताना साध्य करणं याला विलक्षण मनोधैर्य व उत्कट उत्तुंग विचारसरणी पोषक ठरते. अविनाशभाऊंशी दीड-दोन तास संवाद साधताना याचा पदोपदी प्रत्यय येत होता. अशा कर्म व सेवा धर्मासाठी कटिबद्ध असलेल्या व्यक्तींसाठी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ओवीतील ओळी अगदी चपखल सार्थ ठरतात.. माउली म्हणतात 'येणे मार्गे जया ठाया जाईजे ! तो गाव आपणच होईजे ! हे सांगो काय सहजे ! जाणसी तू !!'... तात्पर्य एखाद्या विशिष्ट गावाच्या म्हणजे ध्येयाच्या दिशेने स्थिर चित्ताने वाटचाल करणारी माणसं एक दिवस आपणच असे गाव/ ध्येय बनून जातात. मला वाटतं 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याला जागलेल्या अविनाश धर्माधिकारी सारख्या पोलीस अधिकाऱ्याच्या आयुष्याचं हेच सार असावं..

संपर्कासाठी ...

श्री अविनाश धर्माधिकारी -

पोलीस उपअधीक्षक

इमेल

dharmadhikari_avinash@yahoo.com


**अमरेंद्र करंदीकर**

शिक्षण ..MSC, MMM

नोकरी ३२ वर्षे

गेली १० वर्षे केमिकल्स कंसल्टंसी

शास्त्रीय संगिताची भटकंतीची आवड..

लेखन करतो..

९८२०० ९६२९९

amarkarandikar@hotmeail.com

साजिरी

SAREES

*Handpicked Handloom Sarees*



**PAITHANI | KHAN SAREES | NARAYAN PETH**
**LINEN | MAHESHWARI | GADHWAL | SOFT SILK**

98670 88877 | 98922 40800 | 91364 05267


Sajiree Sarees : Shop no A-01 Suvas Apartment, Hanuman Road,
Opp McDonald's Vileparle (E) Mum: - 400057

Sajiree Sarees : A-5 Kadamgiri Chs Near Macdonald Hanuman Road,
Vile Parle East Mumbai 400057

Tuesday to Sunday 10.30 am to 8 pm, Monday Closed



# ध्यास माझा आगळा



अनुश्री क्षीरसागर

नावापासूनच संपूर्ण व्यक्तिमत्त्वात वेगळेपणा असणाऱ्या जागतिक कीर्तीच्या सुप्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना झेलम ताई परांजपे. आई सौ. सुधा वर्दे, वडील प्रोफेसर सदानंद वर्दे तसेच कविवर्य वसंत बापट, त्यांच्या पत्नी नलूताई बापट, श्री. लीलाधर हेगडे हे सगळे राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकातील कार्यकर्ते. या सर्वांनी मिळून सेवादलात राहून त्याच विचारांची संस्था स्थापन केली, साने गुरुजी विद्यामंदिर. साने गुरुजींनी पंढरपूरचं विठ्ठल मंदिर सर्वांसाठी खुलं व्हावं यासाठी उपोषण केलं, त्याआधी महाराष्ट्रभर दौरा केला. दौरा करताना त्यांच्या बरोबर वसंत बापट आणि लीलाधर हेगडे होते. ते दोघे लोकांचं मनोरंजन आणि समुपदेशन यासाठी गुरुजी आणि वसंत बापट यांनी रचलेली गाणी, पोवाडे सादर करत असत. सेवा दलाच्या कलापथकाची अशी सुरुवात झाली. कलापथकात झेलम ताईंचे वडील, सदानंद वर्दे होनाजींची लावणी गात आणि आई सुधाताई त्यावर नृत्य सादर करत. महाराष्ट्रभर त्यांचे दौरे होत. त्यामुळे अगदी लहान वयापासून त्यांनी नृत्य नाटिकांमधून कामं केली. त्यांना सेवादलाचे तसंच नृत्य संस्कार मिळाले. विशेषतः लोकनृत्याचे.

झेलमताईंना त्यांचं नाव कसं मिळालं याची कथा आहे. फाळणीनंतर वसंत बापटांनी एक सांगीतिका लिहिली, झेलमचे अश्रू. झेलमचा जन्म पाकिस्तानातील. फाळणीनंतर ती अर्धी तिथेच राहिली, अर्धी भारतात आली. तिला किती दुःख झालं असेल! यावर सेवा दलाने नृत्य नाटिका बसवली आणि सुधाताईंना झेलम चा रोल दिला. त्यानंतर त्यांना मुलगी झाली, तिचंही नाव झेलम ठेवलं गेलं. झेलमताईंच्या अगदी लहानपणापासून उन्हाळ्याची सुट्टी, नाताळची सुट्टी अशा काळात सगळे कलापथकाचे कार्यक्रम करत फिरत असत. ज्या ठिकाणी दौरा असेल, तिथे कलेसंदर्भात काही चांगलं पाहण्यासारखं, ऐकण्यासारखं असेल तिथे वसंत काका नेऊन दाखवत. त्यांनी एकदा कुमारांच्या घरी नेऊन त्यांची मैफिल ऐकवली होती. ओरिसात असताना गुरुजी, पद्मविभूषण केळुचरण महापात्र नृत्य शिकवताना, त्यांची शैली.. ओडिसी..वेगळी आहे, ती पहावी असं सांगितलं. झेलम ताईंना ही वेगळी शैली अतिशय आवडली. त्या त्यावेळी SSC ला होत्या. पण तेव्हा मुंबईत



ओडिसी शिकवणारं कोणी नव्हतं आणि ओरिसाला जायचं तर खर्च खूप होता. आपण पुढे खरोखरच ह्या क्षेत्रात काही करणार आहोत का, हे अजुन निश्चित नव्हतं. त्यामुळे एवढा खर्च करायचा नाही यावर त्या ठाम होत्या. एकीकडे शिक्षण सुरु होतं. स्टॅटिस्टिक्स घेऊन एमएस्सी केलं. पुढे शंकर बेहरा यांच्याकडून ओडिसी नृत्य शिकायला सुरुवात केली. त्यांना मास्टरजी म्हणत. झेलमताईंची अगदी जवळची मैत्रीण स्मिता पाटीलही त्यांच्या बरोबर शिकत होती. मास्टरजींनी झेलमताईंना सांगितलं की तुझी शरीरयष्टी ओडिसी शिकण्यासाठी योग्य आहे. तू माझे गुरु केळुचरण महापात्र यांच्याकडून शिकलं पाहिजेस. झेलमताईंना त्या वेळी तरी ओरिसाला जाणं जमणार नव्हतं आणि गुरुजी तेव्हा मुंबईत येत नव्हते. त्यानंतर काही महिन्यांत स्मिता पाटील यांना पहिला चित्रपट मिळाला आणि त्या नृत्य सोडून चित्रपट क्षेत्राकडे वळल्या. ज्येष्ठ नृत्यांगना कै. प्रतिमा बेदी यांनी गुरुजी पद्मविभूषण केळुचरण महापात्र यांचं एक महिन्याचं वर्कशॉप मुंबईत आयोजित केलं होतं. झेलमताई आणि स्मिताताई ऑडिशनसाठी गेल्या. मिश्किल हसत झेलमताई म्हणतात, 'प्रतिमा म्हणाली you are not bad, come tomorrow. त्यावर स्मिता वैतागून म्हणाली, 'you are not bad काय ? दाखवून दे तिला, you are the best.' हे अर्थातच पुढे झेलमताईंनी सिद्ध करून दाखवलं. परंतु ते पाहायला मैत्रीण स्मिता या जगात नव्हती. अर्थातच गुरुजींनी झेलमताईंना शिबिरात दाखल करून घेतलं. मास्टरजी छानच शिकवायचे. पण झेलमताई म्हणतात, "गुरुजींचा मिडास टच होता. काहीतरी दैवी होतं त्यात". मुलाच्या जन्मामुळे त्या लगेचच जाऊ शकल्या नाहीत. पण तो थोडा मोठा झाल्यावर घरातल्यांच्या सहकार्याने दर वर्षी महिना दीड महिना गुरुजींच्या घरी शिकण्यासाठी जात राहिल्या.

रीतसर नृत्य शिकायला थोडी उशीरा सुरुवात झाली. पण त्यांची देहयष्टी या नृत्यशैलीला अनुकूल असल्याने त्या शिकवलेलं सारं झरझर आत्मसात करत गेल्या. यातून अपरिमित आनंद मिळत गेला. त्यांनी नृत्याची कोणतीही परीक्षा दिली नाही. गुरु-शिष्य परंपरेने शिकत गेल्या. गुरुजींकडे त्यांच्या मृत्यूपर्यन्त शिकणं चालू होतं. गुरुजींबरोबर स्टेजवर पहिला कार्यक्रम कधी केला ? असं विचारल्यावर त्या म्हणतात, तुलसीरामायण केलं होतं. त्या सूत्रधार आणि गुरुजी केवट, नावाडी. एका डॉक्टर्स कॉन्फरन्ससाठी तो बॅले बसवला होता. झेलम ताई इतक्या चांगल्या परफॉर्मर होत्या की शिकायला लागल्यापासून दोन वर्षांत गुरुजींनी त्यांच्याबरोबर काम करायला मुंबईहून बोलावून घेतलं. त्यांच्यासाठी ही मोठीच मानाची गोष्ट होती. कार्यक्रमानंतर गुरुजींनी हातात हजार रुपये ठेवले, तेव्हा त्या रडायलाच लागल्या. मोठा बहुमान होता तो.

नृत्यशालेची निर्मिती कधी झाली असं विचारल्यावर त्या म्हणतात, ती अक्षरशः अपघाताने झाली आहे. १९८८ साली अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना अचानक स्लिप डिस्कचा त्रास झाला. पाच कार्यक्रम रद्द करून परत यावं लागलं. महिनाभर सक्त विश्रांती. त्या काळात सतत आत्मचिंतन चालू होतं. नृत्य आपल्याला एवढं आवडतं. आपण आता नृत्य करू शकलो नाही तर काय करायचं ? पाठीचा त्रास असाच राहिला तर? आपण कितपत पाठीला ताण देऊ शकू ? मग आपण प्रोफेशनली शिकवायला सुरुवात केली तर..? नृत्यशालेला नाव काय द्यायचं ? असे पडल्या पडल्या विचार चालू असत. जवळची सखी स्मिताचं नुकतंच दु:खद निधन झालं होतं. वसंत काका (बापट) म्हणाले, 'स्मितलय' नाव ठेव. आपण जसं म्हणतो, की विद्यालय म्हणजे विद्येचं आलय, घर. तसंच स्मिताचं घर म्हणजे जिथे स्मिताची आठवण कायम राहील. १९८९ साली 'स्मितलय' ची स्थापना झाली. हळुहळु झेलमताई या सर्वातून बाहेर पडल्या आणि पुन्हा पहिल्या जोमाने नृत्य सुरु झालं. तेव्हापासून स्मितलय स्मिताची आठवण ठेऊन तर आहेच... पण आता स्मितलय म्हणजे स्मित + ताल + लय असे झाले आहे. प्रत्येकाच्या मुखावर स्मित आणि शरीरात, पायात ताल आणि लय कायम असतं.

साने गुरुजी आरोग्य मंदिर ही संस्था. हिच्या आजूबाजूला निम्न आर्थिक स्तरातली वस्ती. आई, वडील आणि बापट काका यांनी इथेच तू आपली संस्था चालू कर असं सांगितलं. शाळेतील मुलं सगळी आजूबाजूच्या वस्तीतील. इथे पुन्हा सेवादलाचे संस्कार कामी आले. झेलमताईंनी विचार केला, चांगल्या आर्थिक स्थितीतील मुलं शिकण्यासाठी कुठेही जाऊ शकतात. पण या मुलांनाही इतर शिक्षणासोबत नृत्य शिकण्याचा आनंद मिळू दे. त्यांनी ठरवलं, फुकट शिकवायचं. पण लीलाधर हेगडे म्हणाले, कुठलीही गोष्ट फुकट करायची नाही. त्याची किंमत राहात नाही. पाच रुपये फी घे. तेव्हा पाच रुपये फी ने ओडिसी क्लास सुरु झाला. अजुनही शाळेतल्या मुलांना नाममात्र फी आहे. बाहेरच्याही मुलांना जर आर्थिक दृष्ट्या शक्य नसेल तर फी मध्ये सवलत मिळते. शिक्षण तेच.

झेलमताई म्हणतात, 'आई वडील समाजकार्य करणारे त्यामुळे समाजाची ओळख होतीच. पण शाळेमुळे या मुलांची आयुष्यं जवळून पाहता आली. समाजाच्या एका स्तराची ओळख झाली.' स्मितलयचे कार्यक्रम खूप वेगवेगळ्या ठिकाणी होत असतात. एकदा चक्क एका भंगीवाड्यासाठी कार्यक्रम केला पैशाचा विचार न करता. यामागे विचार हाच की या लोकांना असा कार्यक्रम कधी बघायला




मिळणार ! आपल्यासारखी ती देखील माणसं असतात हा विचार त्या करतात. यामुळे आपली कला खूप लोकांपर्यंत पोचते. हे खूप वेगळं समाधान असतं. सलाम आहे असा वेगळा विचार करणाऱ्या झेलम ताईंना.

बाहेर मिळणाऱ्या मोठमोठ्या अगदी फाईव्ह स्टार हॉटेल्स मधील कार्यक्रमांना देखील त्या आपल्या शाळेतल्या मुलींना घेऊन जातात आणि त्यांना बाहेरच्या जगाची ओळख करून देतात. अगदी टॉयलेट्स कशी वापरायची इथपासून. खूप मोठं वेगळेपण आहे हे झेलम ताईंचं. स्मितलयचा लोकांना परिचय व्हावा यासाठी त्यांना एकल कार्यक्रमासाठी आमंत्रण येई, तेव्हा त्या आयोजकांना ठणकावून सांगत की एक दोन परफॉर्मन्सेस मी ग्रुपचे ही ठेवीन. म्हणजे इकडच्या मुलींनाही वाव मिळतो. त्यांनी ओरिसामधून फक्त साड्यांचे काठ आणून इथे साध्या कापडांना जोडून मुलींसाठी कॉस्च्युम शिवून घेतले. कॉस्च्युम, दागिने, घुंगूर, या गोष्टींसाठी खूप मोठा खर्च होतो. म्हणून ही कला वरच्या स्तरात राहिली आहे. हे झेलम ताईंना मोडून काढायचं होतं. सुरुवातीला बुजणाऱ्या या मुली आता फुलायला लागल्या आहेत. काहीजणी याच शाळेतील शिक्षिका म्हणून रुजू झाल्या आहेत.

त्या म्हणतात, "एकदा मुलं हातात आल्यावर वेगवेगळ्या कल्पना सुचायला लागल्या". सामाजिक भान होतंच. दरवर्षी स्मितलय तर्फे आठ मार्चला आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करतो. त्यासाठी सावित्रीबाई फुलेंच्या कवितांवर 'सावित्री वदते', जनाबाईंच्या अभंगांवर 'जनी म्हणे', नर्मदा प्रश्नावर 'नर्मदा' अशी नृत्य नाट्यं बसवली. शिवाय हुंडा बळी, स्त्री भ्रूण हत्या हे विषय होतेच. अशा पद्धतीने नृत्यातून महिला दिन साजरा करणारी स्मितलय ही पहिली संस्था आहे. याशिवाय महाद्वार या अरुणा ढेरे यांच्या कादंबरी वरून अस्वस्थ होऊन चोखामेळा यांच्या अभंगांवर एक कार्यक्रम केला. तो अलीकडे जपान दौऱ्यावरही सादर केला. लीलावती हे त्यांचं अतिशय गाजलेलं अपत्य. गणित आवडता विषय. त्यामुळे भास्कराचार्यांच्या लीलावती या गणिती ग्रंथातील पायथागोरस वगैरे वेगवेगळ्या गणितांवरील वेगवेगळ्या वृत्तांतील श्लोक निवडले. भास्कराचार्यांनी कितीतरी पक्षी, प्राणी, फूल, नदी असं घेऊन श्लोकांतून गणितं मांडली आहेत. त्यांना संगीतकार आनंद मोडक यांनी संगीत दिलं. त्यावर नृत्य बसवलं.

स्मितलय तर्फे १५ ते २५ या वयोगटासाठी युवा महोत्सव साजरा होतो. सुप्रसिद्ध नृत्यांगना कै. संजुक्ता पाणिग्रही यांच्या स्मरणार्थ. कारण त्या युवकांना खूप प्रोत्साहन देत. सुरुवातीला फक्त मुंबईतील कलाकार प्रवासाचा खर्च देऊन बोलावले जात कारण मानधन द्यायला फारशी पुंजी नव्हती. हळुहळु प्रवास आणि राहण्याचा खर्च. आता बिदागीही दिली जाते. मधे पाच वर्षं स्मितलयकडे पैसे नव्हते तर महोत्सव केला नाही. हे सांगून त्या या क्षेत्रातील नवीन आलेल्या दुष्प्रवृत्तीवर बोट ठेवतात. पूर्वी पैसे देऊन कलाकार बोलावले जात. आजकाल आयोजक पैसे घेऊन कलाकार बोलावतात. पैसे घेऊन पुरस्कार दिले जातात. स्वतः झेलमताई देखील स्वतः बरोबर सहकलाकारांच्या प्रवास, राहण्याच्या खर्चाचे पैसे मिळणार असतील तरच कार्यक्रम स्वीकारतात. यातूनच कला आणि कलाकार दोघांचा मान सांभाळला जातो.

ओडिसी मध्ये सुरुवातीला ओडिसी आणि संस्कृत या दोनच भाषांतील गीतांवर नृत्य बसवली जात. झेलमताईंनी त्यात मराठी गाणी, भावगीतं आणली. जपानच्या दौऱ्यात तर जपानी कोळीगीतावर नृत्य बसवलं. अगदी त्यात समुद्राच्या लाटांचा आवाज वगैरे घालून. गेली दोन वर्षं कोरोना साथीमुळे थोडा खंड पडला होता. अनेक मुली आणि शिक्षिका गावी निघून गेल्या. पण आता हळुहळु गोष्टी स्थिरस्थावर होत आहेत. ऑनलाईन क्लासची सोय झाल्याने लग्न वगैरे कारणांनी परदेशी गेलेल्या मुली पुन्हा जॉईन झाल्या आहेत. त्यामुळे क्लास ग्लोबल झाला आहे. आपली कर्तव्य बजावताना नृत्याची हौस मनात





Rejuvenating the
art of tailoring !

M.N.RAO
Since 1965
Truly Bespoke

www.mnrao.com
Vile Parle • Kemps Corner
Follow Us:





**21/C, SHYAM KAMAL, AGARWAL MARKET, VILE PARLE (E), MUMBAI 400057**
**T: 26141928 / 26176352, M: 9322253508 E: mnrdspl@gmail.com**

**www.mnrao.com**

**Also at: 13 - A, Om Chambers, Kemps Corner, Mumbai - 400036.**
**T: 23681638. E: vinayak@mnrao.com**



राहून गेलेल्या स्त्रियाही जॉईन होत आहेत.

सहजीवनाबद्दल विचारताना त्या मिश्किल हसतात. आमचं प्रेम डोंगरातलं. माझा चेहरा प्रश्नार्थक. अहो, आमची हायकिंग मधली मैत्री. 'श्री. अविनाश परांजपे यांच्याशी लग्न करायचं नक्की केलं तेव्हा जात वगैरे काही असते हे ठाऊक नव्हतं. सासूबाई थोड्या जुन्या विचारांच्या होत्या. परंतु त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टी झेलमताईंनी मानल्या त्यामुळे दोघींचं व्यवस्थित जुळलं. पुढे दौरे वगैरे करताना सासूबाई, यजमान, आई, सर्वांनी मुलाला सांभाळून भक्कम पाठिंबा दिला. अविनाश यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी केली. आता रिटायर्ड. त्यांचा अजुनही भरपूर सपोर्ट असतो. मुलगा 'बंकिम' संगीत क्षेत्रात कार्यरत आहे. साने गुरुजी आरोग्य मंदिराच्या इंग्रजी माध्यमात संगीत शिक्षक आहे. स्वतः संगीतकार आणि लेखक ही आहे.

आलेला एखादा वेगळा अनुभव विचारल्यावर झेलमताई सांगतात, गोव्याच्या एका ख्रिश्चन संस्थेने संपूर्ण पाश्चात्त्य ग्रुप साठी चोख्याचं नृत्यनाट्य घेऊन बोलावलं होतं. चर्च समोरच स्टेज बांधलं होतं. स्टेजवरून सरळ समोर येशू दिसत होता. त्या म्हणतात की सगळे हसतात मला देवावर विश्वास ठेवत नाही म्हणून. पण शेवट असा होता की शेवटी विठूच चोख्याला हाक मारतो. त्याच्यासाठी दार उघडतो आणि त्याच्या पायावर चोखा कोसळतो. हे करत असताना जाणवलं की येशूचे डोळे माझ्याकडे बघत आहेत आणि एक काहीतरी वेगळाच शब्दातीत अनुभव आला. आजही त्या आठवणीने अंगावर शहारे उठतात.

झेलमताईंनी आजवर खजूराहो महोत्सव, कोणार्क महोत्सव सारख्या भारतातीलच नव्हे तर जगभरातील नामांकित महोत्सवांमधून आपली कला सादर केली आहे. अनेकानेक पुरस्कार मिळवले आहेत. त्यापैकी दोन महत्वाचे. एक महाराष्ट्र सरकारचा सांस्कृतिक पुरस्कार आणि दुसरा महारी पुरस्कार. तो ओरिसा मधून मिळालाय. महारी म्हणजे जगन्नाथाला वाहिलेल्या नृत्यांगना. हा पुरस्कार फक्त ओडिसा मधील नृत्यांगनांना मिळतो. ओडिसीच्या प्रसारासाठी धडपड करणाऱ्या झेलमताई या पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या नॉन उडिया व्यक्ती आहेत.

झेलम परांजपे हे नाव अनेक वर्षं ऐकून होते. जागतिक कीर्तीच्या या व्यक्तीबद्दलचे लेख, त्यांचे परफॉर्मन्सेस पाहिल्यावर त्यांच्या नावाचा एक दबदबा वाटत होता. कशा असतील कशा बोलतील, एक दडपण आलं होतं. पण प्रत्यक्षात त्या अगदी साध्या आहेत. खूप मोकळ्या. त्या दूरदर्शनच्या प्रथम श्रेणी कलाकार आहेत आणि त्यांनी अनेक स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून काम केलं आहे. झेलम परांजपे या नावाने त्यांचं स्वतःचं यूट्यूब चॅनल आहे. मिताली कामत आणि गौरी जोगळेकर या त्यांच्या पहिल्या शिष्या. नुकताच मितालीच्या मुलींचा मंच प्रवेश समारंभ झाला. त्यात झेलमताईंचा हृद्य सत्कार झाला. त्यांच्या नावाप्रमाणे त्यांची कला पुढील पिढ्यांकडे खळाळत वाहात आहे. झेलमताई कृतकृत्य आहेत.


**अनुश्री क्षीरसागर**

व्यावसायिक गायिका, निवेदिका,
लेखिका
९८२०५ ०९७६२

anu29467@gmail.com




# साहित्यसम्मेलन आणि पार्लेकर

श्रीनिवास प्रभुदेसाई




इडी छाप्यात ह्या साहित्यिक संमेलनाध्यक्षांकडे ही १७५० पुस्तके आणि संमेलनाच्या राजकीय आयोजकांची २५कोटी रुपये कॅश सांपडली...
कॅश


अहो, विनोदी साहित्य संमेलनाचे तुम्ही अध्यक्ष झालात म्हणून हा ड्रेस हौशीने शिवलाय मी!


सम्मेलन जेवणावळी साठी गाजलं पाहिजे म्हणून देश-विदेशातले लोक मागवलेत!
साहित्य सम्मेलन आयोजक समिती


ह्यांना अध्यक्षपद? आपल्यात घराणेशाही नाही चालणार! भले, तुमचे आजोबा-वडिल, मामा-काका सम्मेलनाध्यक्ष झाले असले तरी! सॉरी..!


सम्मेलनाध्यक्ष निवडीत मतं फुटायला
नको असतील तर आम्हाला फाईव्ह स्टार
किंवा थ्री स्टार हॉटेलमध्ये डांबून ठेवा
म्हणावं..!



शाईफेक करण्यायोग्य साहित्यिक,
पत्रकार, संपादकांची ही यादी!
ओके करा साहेब...
2021

९८३३७ ६७०३५



# आपला सख्य नसलेला शेजारी - चीन!

हुकुमशाही देश असल्याचा असाही एक फायदा चीनला सततच झाला. ह्या आणि अशाच इतर धोरणांमुळे चीनची अर्थव्यवस्था वरकरणी तरी फार सुदृढ झाली, इतकी की ती आता अमेरिकेच्या खालोखाल जगातील दुसऱ्या नंबरची अर्थव्यवस्था होऊन गेली. त्याच बरोबर चीन सातत्याने आपली सामरिक शक्ती वाढवत होता. आता जागतिक महासत्तेच्या शिखरपदी बसून तेथून अमेरिकेला खाली ढकलण्याची तयारी त्या देशाने सुरू केली.



**चंद्रशेखर नेने**

आपल्या उत्तरेकडे आणि ईशान्येकडे पसरलेला आपला हिमालयाच्या पलिकडील महाकाय देश म्हणजेच चीन! हे नाव उच्चारताच आपल्यापैकी अनेकांना १९६२ सालचे युद्ध आणि त्यात झालेला भारताचा अपमानास्पद पराभव आठवेल. त्याआधी व त्यानंतरसुद्धा चीनमध्ये प्रचंड राजकीय उलथापालथी झाल्या, त्यांचे सर्वोच्च नेते माओ झे डोंग ह्यांनी आपला हुकुमशाही वरवंटा समस्त चिनी प्रजेवर फिरवून तिथल्या बेशिस्त जनतेला करड्या शिस्तीत आणले. अगोदर १९५८ ते १९६२ दरम्यान माओ यांच्या चुकीच्या शेतकी धोरणांमुळे चीनमध्ये भयानक दुष्काळ पडले आणि त्यात सुमारे ३ ते ५ कोटी लोकांना आपले जीव गमवावे लागले होते! कदाचित लोकांचे लक्ष आपल्या ह्या अपयशाकडून वळविण्यासाठीच चीनी राज्यकर्त्यांनी भारताशी युद्ध घडवून आणले असावे असा देखील काही तज्ज्ञांचा कयास आहे! त्यानंतर १९६६ साली सुरू झालेल्या 'सांस्कृतिक क्रांति' ह्या गोंडस नावाखाली तिथे माओच्या सर्व विरोधकांना पद्धतशीरपणे संपविण्यात आले. असे म्हणतात त्या क्रांतीच्या होरपळीत चिनी प्रजेपैकी लक्षावधी स्त्री पुरुषांना प्राणास मुकावे लागले. हा भयानक हिंसाचार माओ ह्यांच्या मृत्यूपर्यन्त १९७३ पर्यन्त सुरूच होता! त्यानंतर मात्र काही काळानंतर चीनची सर्व सूत्रे डेंग जियाओ पिंग ह्या तुलनेने मवाळ नेत्याकडे आली. ह्याने मात्र साम्यवादी तत्वज्ञान गुंडाळून ठेवले आणि वरकरणी साम्यवादी पण आतून भांडवलशाही पद्धतीने आपल्या देशात त्याने आर्थिक आणि सामाजिक क्रांतीच केली. हयाबद्दल एकदा पाश्चिमात्य पत्रकाराने त्यांना छेडले असता त्यांनी मोठे मासलेवाईक उत्तर दिले की, "मांजर काळे आहे की लाल (म्हणजेच कम्युनिस्ट!) हे महत्वाचे नाही. ते उंदीर मारते की नाही हे महत्वाचे आहे!" डेंग ह्यांच्या हाती एक प्रचंड भूभाग असलेला, जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आला होता. तेथील प्रजा ही सातत्याने अत्याचार झाल्याने, निमूटपणे सांगितलेले ऐकणारी अशी बनलेली होती. त्या लोकांच्या पैकी अनेकांना सरकारी दडपशाहीचा जीवघेणा अनुभव आलेला होता. त्यामुळे ह्या प्रजेने सरकारचे ऐकून त्याप्रमाणे बिन बोभाट वागणे सुरू केले! अशी गुलामी वृत्तीची प्रजा म्हणजेच एक प्रचंड मोठा कामगार वर्ग! असा हा वर्ग भांडवलशाहीला फारच आवडत असतो! चीनच्या आर्थिक पुनरुत्थानाचे मर्म ह्या वर्गाच्या प्रचंड संख्येत

आणि सरकारी हुकूमशाहीत दडलेले आहे.

त्यादरम्यान अनेक पाश्चात्य भांडवलदारांनी, विशेषतः अमेरिकन उद्योजकांनी चीनमध्ये अजस्त्र कारखाने उभारण्यास सुरुवात केली. त्यासाठी चिनी सरकारने प्रचंड मोठी औद्योगिक शहरे उभारून, अनेक कर सवलती देऊ केल्या, तसेच कोठल्याही कामगार कायद्यांचे, अथवा पर्यावरण नियम आदींचे अडथळे ह्या उद्योजकांच्या वाटेत येणार नाहीत ह्या कडे जातीने लक्ष दिले. शिवाय चिनी कर्मचारी अमेरिकेच्या दशांश वेतनात कमाल उपलब्ध केले गेले. ह्यामुळे पाश्चात्य भांडवलदारांना अमाप फायदा होऊ लागला आणि त्यांनी नवनवीन आधुनिक तंत्रज्ञान ह्या चिनी कारखान्यात आणले! अशा तऱ्हेने चीन हा देश पुढील वीस पंचवीस वर्षात सर्व जगाचा माल उत्पादक देश झाला. ह्याच काळात भारतासारख्या देशात मात्र चीनने आपल्या हस्तकांकरवी येथील 'डावी' चळवळ स्वतःच्या ताब्यात ठेवली आणि ते हस्तक इथे कायम संप, हरताळ आणि हिंसक आंदोलने घडवत राहिले, ज्यामुळे भारतात उद्योग सुरू करण्यासाठी पोषक वातावरण तयार होऊच दिले नाही. त्यांच्या भरीला पर्यावरणवादी चळवळींना हाताशी धरून भारताच्या प्रगतीला खीळ घालण्याचे काम, चिनी आणि एकूणच जागतिक डाव्या चळवळींनी अतिशय निष्ठेने चालविले. अथवा मेधा पाटकर ह्यांच्या नर्मदा धरणास असलेला विरोध! ह्या चळवळी बाईने हा प्रकल्प वीस वर्षाहूनही अधिक काळ रोखून धरला. त्यामुळे प्रकल्पाची किंमत प्रचंड वाढली आणि प्रकल्पापासून मिळणारे लाभ तितकी वर्षे पुढे गेले. येथल्या पुरोगामी चळवळी चीनच्या तालावर नाचून आपल्याच देशाला कायम विरोध करून मागे ठेवण्यात भूषण मानीत होत्या! अनेक उदाहरणे आहेत ह्याची, तमिळनाडूतील तुतिकुडी तांबे निर्माण करण्याचा प्रकल्प ह्या भोंदू पर्यावरणवाद्यांनी बंद पाडला. त्यामुळे आपल्याला गरजेचे तांबे चीनमधूनच आयात करण्याची सक्ती झाली! इकडे चीन मात्र 'थ्री गोर्जेस' धरणासारखे महाकाय प्रकल्प पर्यावरणाची जराही तमा न बाळगता बिनदिक्कतपणे रेटत होता! हुकुमशाही देश असल्याचा असाही एक फायदा चीनला सततच झाला. ह्या आणि अशाच इतर धोरणांमुळे चीनची अर्थव्यवस्था वरकरणी तरी फार सुदृढ झाली, इतकी की ती आता अमेरिकेच्या खालोखाल जगातील दुसऱ्या नंबरची अर्थव्यवस्था होऊन गेली. त्याच बरोबर चीन सातत्याने आपली सामरिक शक्ती वाढवत होता. आता जागतिक महासत्तेच्या शिखरपदी बसून तेथून अमेरिकेला खाली ढकलण्याची तयारी त्या देशाने सुरू केली.



आता मात्र अमेरिका देखील सावध झालेला आहे! इतके दिवस रशियाला नामोहरम करण्यात गुंतलेल्या अमेरिकेचे लक्ष आता चीनकडे वळले आहे. पण आता मात्र एक विलक्षण घटना घडत आहे. त्याकडे आपण सावध नजरेने बघितले तर जागतिक पटावरील सत्तेची मांडणी कशी बदलत चालली आहे ते आपल्या लक्षात येईल. एक म्हणजे भारतात २०१४ साली अनेक वर्षानंतर प्रथमच एक स्पष्ट बहुमताचे आणि म्हणूनच स्थिर सरकार, भाजपाच्या नरेंद्र मोदी ह्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. ह्या सरकारला आता कुठल्याही कारणाने डाव्यांच्या दबावाखाली निर्णय घ्यायची गरज उरली नाही. शिवाय मोदी हे प्रखर राष्ट्रवादी आहेत आणि त्यांनी चीनचा धोका पूर्णपणे ओळखलेला आहे. त्यामुळे ते आता अशी धोरणे राबवित आहेत की ज्यामुळे चीनचे जागतिक उत्पादक देश म्हणून असलेले स्थान आता भारताकडे येऊ शकेल. हे सर्व होत असतानाच खुद्द चीन मध्ये अनेक मूलभूत स्वरूपाचे बदल घडत आहेत. त्या बदलांचा आता आपण परामर्श घेणार आहोत. चीन हा एक प्रचंड लोकसंख्येचा देश आहे हे आपल्याला माहीतच आहे, (आता येत्या एक वर्षातच हे स्थान भारताला मिळेल अशी लक्षणे आहेत!) ह्या प्रश्नाला तोंड देण्यासाठी चीनने अनेक उपाय केले. हुकुमशाही देश असल्याने त्यातील पहिला उपाय होता की प्रजेला जास्त मुले होऊ देण्यास बंदी घालायची! १९८० सालीच चिनी सरकारने एक कायदा केला, प्रत्येक कुटुंबाला फक्त एकच मूल होऊ देण्याचा! ह्यालाच 'वन चाइल्ड पॉलिसी' असे म्हणतात. आता ह्या धोरणामुळे लोकसंख्या आटोक्यात येऊ लागली खरी पण त्याचा दूरगामी परिणाम म्हणजे चीन ह्या देशात म्हाताऱ्या माणसांची संख्या वाढीस लागली आणि पुरेसे तरुण जन्म घेत नसल्याने त्या तुलनेत तरुणांची संख्या घटू लागली. राष्ट्राच्या आर्थिक उत्पादनामध्ये नेहमीच तरुणांचा हातभार जास्त असतो. वृद्ध प्रजेची उत्पादकता कमी झालेली असते आणि जर त्यांची संख्या प्रमाणाबाहेर वाढली तर ती संख्या राष्ट्रावर एक आर्थिक भार होऊन बसते. नेमके हेच सध्या चीनमध्ये घडत आहे. शिवाय भारताप्रमाणेच चीनमध्ये देखील 'मुलगा हवा' हा हव्यास खूप प्रमाणात आहे. त्यामुळे आजमितीला तिथे मुलांची संख्या मुलींच्यापेक्षा बरीच जास्त आहे. त्यामुळे सध्या चीनमध्ये लग्नासाठी मुली मिळणे कठीण झाले आहे. (त्यासाठी त्यांनी पाकिस्तानातून वधू आयात केल्याचे आपण वाचलेच असेल!) त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. ह्या

Highgate Academy (India)

# OVERSEAS EDUCATION CONSULTANT



- 17 years strong presence in providing services for study abroad.
- 800+ Universities representations across USA, UK, Australia, Canada, Germany, Ireland and other European Countries.

**WWW.HAINDIA.COM**

## COACHING

Coaching for GRE, GMAT, SAT, IELTS, TOEFL and PTE providing services to study abroad.

## INTERNSHIP PROGRAMS

- 1 year paid Internship Programs in Australia & 2 year work permit program.
- 1 year paid training program in the USA.

## WHAT ACTUALLY WE DO?

- University Applications.
- Course, Country, University selection and Admissions.
- Visa Services.

- Entrance Exam Coaching and Counseling services.
- High Value scholarships and Study Loans.
- Test Preparations.

- Internship Programs for USA and Australia.
- Forex Transfers.
- Accommodations.
- Work Permits for Australia / Canada Portugal.

B-309 Kadamgiri Apartment
Hanuman Road, Vile Parle (E)
Mumbai - 400057 (India)

info@haindia.com
iwepuk@yahoo.co.uk

GET IN TOUCH
+ 91-22-26184048
+91-98704 99953

कारणामुळे चिनी सरकारने २०१६ सालीच 'एक मूल' कायदा रद्द केला आहे. आता मुले होण्यास उत्तेजन दिले जाते, पण आत्ताच्या चिनी समाजात नवीन जोडप्यांना मूल नकोच आहे, कारण त्यांना जगण्यासाठी लहान बाळाची अडचण होते. मोठ्या शहरात त्यांना मुले सांभाळण्यासाठी आपल्या आई वडिलांना आणणे परवडत नाही. म्हणून अशी जोडपी मुले होऊच देत नाहीत! ह्यास्तव चिनी राज्यकर्त्यांच्यापुढे येत्या भविष्यात पुरेसे उत्पादक नागरिक नसण्याचा प्रश्न आ वासून उभा आहे.

त्यात चीनच्या वू हान शहरात २०१९ साली डिसेंबर महिन्यात 'करोना' साथीचा उद्रेक झाला. चिनी सरकारने ही बातमी दडपण्याचा खूप प्रयत्न केला पण आता जगाची पक्की खात्रीच पटली आहे की ह्या महाभयंकर साथीचा उद्रेक चीनमधील वू हान व्हायरॉलॉजी लॅब मधूनच सुरू झाला. सर्व जगाने ह्या साथीचा सामना केला, त्यातही भारताने तर त्यासाठी लस तयार करून सर्व जगाला पुरवली. चिनी राज्यकर्त्यांनी मात्र 'झीरो कोविड पॉलिसी' राबवली. ज्यात जिथेही कोविडचा एकही रुग्ण आढळला तिथे ती सगळी इमारत, किंवा गरज पडल्यास तो सगळा मोहल्ला किंवा सगळे शहर सील केले आणि सर्व लोकांना जबरदस्तीने डांबून ठेवले. ह्यामुळे लोकांचे रोजगार तर बंद पडलेच पण चीनचे कारखाने देखील बंद पडले. जगाला पुरवठा करणाऱ्या देशावर अशी पाळी आल्यावर सगळ्या जगातील पुरवठा साखळी उद्ध्वस्त झाली आणि अनेक देशांना जीवनावश्यक वस्तूंच्या कृत्रिम टंचाईचा सामना करावा लागला. त्यामुळे अनेक उद्योजकांना असे वाटू लागले आहे की, चीनप्रमाणेच एक आधिक पुरवठा केंद्र असायला हवे. इथे भारताला एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. अनेक प्रमुख उद्योजकांनी आपले उत्पादन कारखाने चीन मधून भारतात स्थलांतरित करणे सुरू केले आहे. चीनने आपले विविध प्रकल्प उभारताना पर्यावरणाची प्रचंड नासधूस केली आहे. त्याचा फटका आता त्या देशाला बसू लागला आहे. ह्या वर्षी चीनच्या अर्ध्या भागात महापूर आणि उर्वरित भागात दुष्काळ असे दुहेरी आव्हान




आहे, ज्यामुळे अन्न धान्याची प्रचंड नासाडी आणि त्या मुळेच टंचाई भासू लागली आहे. आपल्या प्रचंड लोकसंख्येला पुरेसे अन्न देण्यासाठी चीनमध्ये शेतीयोग्य जमिनीचा तुटवडा आहे. चीन जरी क्षेत्रफळानुसार भारतापेक्षा तिप्पट मोठा असला तरी तेथील शेतीयोग्य जमीन भारतापेक्षा थोडी कमीच आहे! (चीनच्या मध्यभागी प्रचंड असे 'गोबी'चे वाळवंट आहे!), म्हणूनच चिनी सरकारने आफ्रिकेतील अनेक लहान देशात प्रचंड शेतीयोग्य भूखंड लीजवर घेऊन ठेवले आहेत. त्यासाठी त्या देशांना कमी दराने कर्जे पुरवली आहेत. आता ते देश ही कर्जे परत करू शकत नसल्याने चीनची ही कर्जे बुडल्यातच जमा आहेत! ह्या दुष्काळ आणि महापूरामुळे चीनमधील अनेक वीजनिर्माण प्रकल्प बंद पडले आहेत. त्यामुळे नुकतेच शांघायसारख्या मोठ्या शहराला देखील प्रचंड अंधाराचा सामना करावा लागला कारण संपूर्ण वीजेची राष्ट्रीय ग्रिड बंद पडली होती! त्याहीमुळे कारखाने बंद झाले आणि उत्पादनावर विपरीत परिणाम झाला!

पण त्याहून भीषण अवस्था चीन मधल्या अंतर्गत रियल इस्टेट कर्जाची म्हणजे गृहबांधणी कर्जाची आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये चीनमधील दुसऱ्या क्रमांकाची घर बांधणी कंपनी 'एव्हरग्रँडे' हिने आपल्या ग्राहकांच्या घेतलेल्या पैशाच्या मोबदल्यात घरे देण्यात असमर्थता दाखवली. नंतर असे उघडकीला आले की ह्या कंपनीला प्रचंड तोटा झालेला आहे आणि त्यातून बाहेर निघणे ह्या कंपनीला अशक्य आहे. शेवटी ही कंपनी ३०० अब्ज डॉलर्सच्या कर्जाच्या डोंगराखाली बुडाली! त्यांच्या हजारो ग्राहकांचे घराचे स्वप्न तर विरूनच गेले, पण त्यांनी आत्तापर्यंत जमा केलेली स्वतःची जमा पुंजी देखील बुडाली. ह्यामुळे चीनमध्ये प्रचंड असंतोष माजला. काही ठिकाणी तर बेफाम झालेल्या ग्राहकांना आवरण्यासाठी सैन्याची मदत घ्यावी लागली! हा असंतोष अजूनही चीन देशात धुमसत आहेच! आर्थिक स्तरावर चीन मध्ये खूप झोलझाल आहे असा तज्ज्ञांचा कयास आहे. कारण तेथील सरकारच्या कडक धोरणांमुळे तेथील खरी माहिती फार मुश्किलीनी हाती लागते!

शेवटी चीनमधील राजकीय पेचप्रसंग बघू या. चीनचे राष्ट्राध्यक्ष, 'शी जिन पिंग' ह्यांनी नुकतेच स्वतःची लागोपाठ तिसऱ्यांदा, चीनचे सर्वात मोठे आणि महत्वाचे एकमेव नेते म्हणून नेमणूक करून घेतली। ह्यापूर्वी असा नियम केलेला होता की हे पद फक्त दोनदाच लागोपाठ एका व्यक्तीला दिले जाऊ शकते! पण शी जिन पिंग ह्यांनी ह्या नियमाला हरताळ फासला आणि स्वतःची ह्या पदी फेर नेमणूक करून घेतली. असे फक्त हुकुमशाही देशातच शक्य असते! नेमके असेच रशियात पुतीन ह्यांनी केलेले आहे. पण अशा प्रत्येक वेळेस त्यांच्या हाताखालच्या व्यक्तीच्या पदोन्नतीची संधी नाकारली जाते, त्यामुळे असे सहकारी प्रचंड नाराज असतात. ते योग्य वेळेची वाट पाहून गरज पडल्यास उठाव देखील करण्याची शक्यता असते. वर दिलेल्या अनेक प्रॉब्लेम्समुळे शी जिन पिंग ह्यांच्या विरोधात

बरीच चीनी जनता नाराज असल्याच्या बातम्या आहेत. अशा प्रकारच्या नाराजीचा उद्रेक होणारच नाही असे नाही! सध्याचा चीन हा विविध देशांचे अनेक प्रांत बळकावून तयार झालेला देश आहे. त्या त्या प्रांतातले लोक ह्या मध्यवर्ती सत्तेला कधी मधी आव्हान देत असतातच. चीनच्या पश्चिमेकडील 'शिन जियाङ्ग' प्रांतातील 'विघर' ह्या तुरकीच मुस्लिम प्रजेला चीन बद्दल प्रचंड द्वेष वाटतो. त्यांच्यावर तसेच तिबेटी जनतेवर चीनी सरकारकडून सातत्याने प्रचंड अत्याचार होत असतात. हे प्रांत बळजबरी असह्य झाली तर उठाव करतील. चीनला १४ देशांच्या सीमा संलग्न आहेत. त्यापैकी बहुतेक सर्व देशांशी, (अगदी रशिया सकट), चीनकडून भूमी बळकावण्यावरून भांडणे सतत चालू आहेत. त्यामुळे ह्या सर्व सीमांवर चीनला खडे सैन्य तयार ठेवावे लागते. त्यामुळे चीनकडे प्रचंड सैन्य असले तरी तो हे सर्व सैन्य भारताविरुद्ध लडाख व अरुणाचल सीमेवर आणू शकत नाही. शिवाय ह्या सीमेवरचा प्रदेश इतका दुर्गम आहे की तिथे मोठे सैन्य आणणे शक्यच नाही. त्यामुळे चीनच्या सैन्य शक्तीची भीती भारताला बाळगण्याचे काही एक कारण नाही. एक लक्षात ठेवायचे की हा ६२ सालचा पंडित नेहरूंचा भारत नाही, हा २०२२ सालचा नरेंद्र मोदींचा भारत आहे! एक नेहमी ध्यानात असू दे की, 'चीन दिसतो तितका प्रबळ नाही, आणि भारत वाटतो तितका दुर्बल नाही!'

**चंद्रशेखर नेने**

कॉर्पोरेट विश्वात आणि आयटी क्षेत्रात
वरिष्ठ पदांवर कार्यरत.
आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक
crnene@gmail.com
९८३३८ १५३०८

# हरवत जाणं

माझ हरवत जाणं हल्ली
आवडायला लागलं मलाच..
राम मारुती रोडवर मी
आइस्क्रीम खातो बरेचदा
मोठा ओढा आहे त्या जागेचा
त्याच ठिकाणी एक दिवस हरवलो

कधीकधी वाटते हे हरवून जाणे
अनंताची नांदी तर नाही ना!
नदीला, पर्वताला, झाडांना,
आकाशाला, चंद्राला, सूर्याला
कुठे हरवता येतं का?
पण....
पक्षी, ढग, समुद्र, अत्तर, फुले, दिवस,रात्र,
वारा, जळणारी उदबत्ती, आणि मी...
आम्हाला हरवता येतं
कशात ना कशात..
पण पुन्हा सापडताही येतं नव्याने

मी अमूर्तचा गाव शोधतोय
कारण त्या गावात मनसोक्त
हरवण्यासाठी जायचे आहे मला..

मला पुढे खुपदा
हरवायचेत दंभिकांना .
चमत्काराच्या गोष्टीना
माझ्या डोक्यात चिकटून बसलेल्या अचकट
विचकट गोष्टीना

हरवायचे आहेत मला
मेंदुतले भुताळलेले सारेच
काळे विणकाम..
अर्थाचे भान नसतांना आरत्या म्हणणारे
उत्सवी भक्त..
दिवसा झोपेत चालणारी माणसे..
व्रत वैकल्ये करणाऱ्या
भोळ्या बायका...
कर्मकांड करणारे भोंदू भक्त..
लोभी, मत्सरी, कामांध, क्रोधी, मस्तवाल,
बलात्कारी, चोरटे आणि बरचसं उरलेलं
माझंच विकृत मन..
हे सारं मला हरवायचं आहे.

राजकारणावर लिहलेले
अनेक पुस्तकं
मी मुद्दाम हरवलीत..ठरवून..
अजून मला खूप काही हरवायचे आहे
शत्रूने केलेले पाठीवरचे वार..
पैशासाठी गळे कापणारे..
मुलांना उगाच मारणारे मायबाप..
बायकोलाच
मोलकरीण म्हणून वागवणारे...
वृध्द आईबापांना घराबाहेर काढणारे..
मला हरवायचे आहेत यांना..

आता तर माझ्याच विकृत मनाला
आता मला हरवता येतं केव्हाही

पूर्णपणे मी स्वत:ला हरवेन
अमुर्ताच्या सुंदर गावात
तो दिवस आता दूर नाही
मीच तर शत्रू आहे माझा
त्याला हरवला की मग

मी पुन्हा नव्याने नवा होईल
माझ्यातला अहं हरलेला असेल...
फक्त काही काही मात्र
मला कधीच हरवायचे नाही..
जे मला आजही
शाश्वत अमुर्ताचे गावेच वाटतात
ते आहेत..
कबीर
बुद्ध
मीरा
आणि
सीमेवर लढणारे सैनिक
व अन्नदाते शेतकरी..

मला नाही हरवायचं यांना...!

**विजयराज बोधनकर**
९९२०४ ११८२८

# भासाचा दुर्योधन





**चित्रा वाघ**

महाभारतातील अत्यंत महत्त्वाकांक्षी, गर्विष्ठ, शीघ्रकोपी आणि पांडवद्वेष्टा खलपुरूष ही जनमानसावर शतकानुशतकांपासून रुजलेली दुर्योधनाची प्रतिमा! पांडवांना अर्ध्या राज्याचा न्याय्य हिस्सा नाकारणारा, त्यांना लाक्षागृहात जाळून मारण्याचे कारस्थान रचणारा, द्यूतात कपटाने युधिष्ठिराला हरवणारा, भरसभेत द्रौपदीची अक्षम्य विटंबना करणारा असा हा उर्मट राजा! धर्मयुद्धाचे नियम तोडून भीमाने त्याच्या मांडीवर प्राणांतिक गदाप्रहार करून त्याला मारले. पण असे वीरमरण पत्करूनही ज्याच्या वाट्याला यत्किंचितही सहानुभूती कधी आली नाही असा हा शूर योद्धा! एक लाख श्लोकांच्या प्रदीर्घ महाकाव्यातही ज्याच्या मरण घटिकांची सविस्तर नोंद घेण्याची तसदी महर्षी व्यासांना घ्यावीशी वाटली नाही असा हा बलाढ्य खलनायक!

आजपासून सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी भारतभूमीवर असा एक अलौकिक नाटककार होऊन गेला ज्याला इतिहासाची पानं चाळताना महाभारतातल्या या गाळलेल्या जागा आपल्या कल्पनाशक्तीने भरण्याची तीव्र इच्छा झाली आणि साकारली एक अद्भुत एकांकिका उरुभंग!

उरू म्हणजे मांडी. शीर्षकात सुचवल्याप्रमाणे कुरुक्षेत्रावरील निर्णायक गदायुद्धामुळे उरुभंग झालेल्या दुर्योधनाच्या आयुष्यातल्या शेवटच्या हृद्य क्षणांचा वेध या एकांकिकेत घेणारा तो नाटककार म्हणजे प्राचीन भारतातील प्रतिभासंपन्न आणि प्रयोगशील महाकवी भास. तज्ञांच्या मते त्याचा काळ हा इसवी सनपूर्व चौथे किंवा पाचवे शतक असावा.

श्रेष्ठ नाटककार म्हणून भासाचे कौतुक संस्कृत वाङ्मयात ठायी ठायी केलेले दिसत असले तरी कित्येक शतकं भासाची नाटकं उपलब्ध नव्हती. प्रत्यक्षात गेल्या शतकातच त्या नाटकांचा शोध लागला. १९१२ साली

श्रेष्ठ नाटककार म्हणून भासाचे कौतुक संस्कृत वाङ्मयात ठायी ठायी केलेले दिसत असले तरी कित्येक शतकं भासाची नाटकं उपलब्ध नव्हती. प्रत्यक्षात गेल्या शतकातच त्या नाटकांचा शोध लागला. १९१२ साली त्रिवेंद्रम येथील पुराण हस्तलिखित संग्रहालयाचे प्रमुख, महामहोपाध्याय टी.गणपती शास्त्री यांना

# Golden Gate to IIT

# Vile Parle

JEE (Advanced) Training Programme

in Vile Parle, since 2005



Our student
Manan Kher
100 percentile
in MHT-CET 2022

## TARGETS

- JEE (Advanced)
- JEE (Main)
- BITSAT
- MHT-CET

CONTACT US

98672 44891

VISIT US

goldengatetoiit.co.in

## FACULTY

Prof Manoj Karmarkar
M.Tech. (IIT Bombay)

Prof Vinayak Antarkar
B.Tech. (IIT Bombay)

Prof U. R. Kapadi
Ph.D. (IIT Bombay)

Prof Indraneel Naik
M.Tech. (NIT Trichy)

Prof Sudhanshu Kumar
B.Tech. (NIT Rourkela)

त्रिवेंद्रम येथील पुराण हस्तलिखित संग्रहालयाचे प्रमुख, महामहोपाध्याय टी.गणपती शास्त्री यांना 13 नाटकं सापडली. त्रावणकोर संस्थानातील एका मठात मल्याळी लिपीत ताडपत्रांवर ती लिहिलेली आढळली. अधिक छाननी करता ती सर्व महाकवी भासाचीच आहेत हे सिद्ध झालं. त्यामुळे त्याने जन्माने, तसंच उपलब्ध नाटकांच्या संख्येनेही पहिलं स्थान मिळवलं आहे. तसंच पहिला एकांकिकाकार आणि पहिला शोकांतिकाकार हा मान देखील त्याच्याकडेच जातो.

या नाटकात, उरुभंग झाल्यापासून अखेरचा श्वास घेईपर्यंतच्या काळात दुर्योधनाच्या मनात उमटणारी आंदोलनं आणि त्याच्या जवळच्या माणसांशी असलेल्या ऋणानुबंधांचं चित्रण करताना भासाने आपली प्रतिभा पणाला लावलेली दिसते. प्रत्यक्ष गदायुद्ध न दाखवता सामान्य सैनिकांच्या निवेदनातून आणि त्यांच्या बोलक्या प्रतिक्रियांमधून भासाने युद्धातला संपूर्ण थरार रंगमंचावर उभा केला आहे. कौरवसेनेमधल्या तीन सैनिकांच्या तोंडून येणाऱ्या ओजस्वी श्लोकांमधून भीम आणि दुर्योधनाचा आवेश, सामर्थ्य, त्यांची पिळदार शरीरयष्टी इतकंच नाही तर त्यांचे डावपेच, वेगवान हालचाली या सर्वांचं चित्रमय वर्णन भासाने केलं आहे.

या निवेदनात 'आपली उघडी मांडी दाखवून त्यावर दौपदीला बसण्यास सांगणाऱ्या दुर्योधनाला धडा शिकवण्यासाठी आतुर झालेला भीम' असं वर्णन हेतुपुरस्सर टाळलं आहे. त्याऐवजी 'भरसभेत दौपदीची वेणी धरून तिला ओढत आणणाऱ्या दु:शासनाला मारण्याची शपथ घेतलेला, क्रोधाग्नीने पेटलेला भीम आणि शंभर भावांच्या विनाशामुळे प्रक्षुब्ध झालेला राजा दुर्योधन', अशा शब्दांत दोघांकडेही घनघोर युद्धासाठी जी सबळ कारणं आहेत, त्यांचा उल्लेख सैनिकांच्या तोंडी येतो.

या दोघांमधलं अभूतपूर्व द्वंद्व पाहण्यासाठी प्रत्यक्ष व्यासमुनी, विदूर, बलराम, सर्व पांडव, कृष्ण अशी सर्व श्रेष्ठ पुरुषमंडळी उपस्थित आहेत. भीमाची प्रत्येक चाल हाणून पाडणाऱ्या, गोलाकार फिरत हल्ला चुकवणाऱ्या आणि संधी मिळताच चपळाईने चढाई करणाऱ्या दुर्योधनाने जबरदस्त आघात केल्याने वज्राघात झालेल्या पर्वताप्रमाणे भीम रणांगणावर कोसळला आहे. रक्ताच्या आणि घामाच्या धारांनी चमकणारं त्याचं बलदंड शरीर धुळीनेही माखलेलं आहे.

दुर्योधन धर्मयुद्धाचे नियम अतिशय कटाक्षाने पाळणारा आहे. त्यामुळे भीम जमिनीवर पडलेला असताना परत प्रहार करणं सहज शक्य असूनही तो भीमाने उठून पुन्हा युद्धाला सुरुवात करण्याची वाट पाहात आहे. धरणीवर कोसळलेल्या भीमाला तो उपहासाने सांगतो, 'भिऊ नकोस! दीनदुबळ्यांवर खरा योद्धा शस्त्र चालवत नाही!'

या प्रसंगी सैनिकाच्या तोंडी असलेल्या श्लोकाचा संस्कृतपंडित कै. बळवंत हिवरगावकर यांनी अगदी समर्पक अनुवाद केला आहे. त्यातून दुर्योधनाच्या सैनिकांच्या मनातला आपल्या राजाबद्दलचा आदर, त्याचा रुबाब आणि नीतिमत्ता या तिन्हीचं दर्शन होतं.

शीर्षावरी मुकुट तो खुलतो जयाला<br>
नाना प्रकार मणिंचे जडले तयाला<br>
जो वीर्यसागर महा अभिमानयुक्त<br>
की साहसी विनयशील तसा प्रदीप्त<br>
तो हा वदे वचन दावुनि तुच्छतेला<br>
भीमा अतां झडकरी त्यज रे भयाला<br>
आला कुणी पुरुष होउनि दीन फार<br>
त्याला रणीं न वधितो नरवीर शूर!

या प्रसंगी सगळेच श्वास रोखून भीमाकडे पाहात आहेत. भीम हा अधिक बलवान आहेच परंतु गदायुद्धातील कौशल्य, तयारी आणि सराव या तिन्हीत दुर्योधन उजवा आहे हे कृष्णही जाणून आहे. दुर्योधन या नावाचा अर्थही ज्याच्याशी युद्ध करणे अवघड आहे तो असाच आहे. सरळ युद्धात त्याला हरवणे शक्य होणार नाही हे ओळखून अर्जुनाने आपल्या डाव्या मांडीवर थाप मारून भीमाला खूण केली. त्या इशाऱ्यासरशी, कंबरेखालच्या भागावर गदाप्रहार करू नये हा नियम भीमाने मोडला. रक्ताळलेले ओले हात जमिनीवर घासून, ते एकमेकांवर चोळले आणि बाजुला पडलेली गदा हातात घेऊन अत्यंत क्रोधाने गर्जना करत दुर्योधनाच्या मांड्यावर सर्वशक्तीनिशी प्रहार करून त्याला घायाळ केले. महाभारतातील शल्यपर्वात येणाऱ्या या तपशीलात भास थोडे काव्यस्वातंत्र्य घेऊन भीमाला खूण करण्याचे काम कृष्णाकरवी घडवून आणतो. या लहानशा पण महत्त्वाच्या बदलाने दुर्योधनाच्या मुक्तीचं अप्रत्यक्ष कारण साक्षात भगवंताकडे जातं. शिवाय युद्धनीतिचा भंग करणाऱ्या भीमाच्या कपटाच्या पार्श्वभूमीवर, शूरवीराला शोभणारे वर्तन करणाऱ्या उमद्या दुर्योधनाविषयी वाचकांच्या मनात अपार सहानुभूती निर्माण होते. त्या त्या प्रसंगानुरूप संबोधन वापरण्याचे भासाचे कौशल्यदेखील याप्रसंगी लक्षात येते. इथे तो कृष्णासाठी 'जनार्दन' हा शब्द वापरतो. जनार्दन म्हणजेच (दुष्ट) लोकांना मारणारा. दुर्योधनाला मारण्याची सूचना देतो तो जनार्दन.

भीमाच्या अनपेक्षित प्रहाराने घायाळ होऊन रणभूमीवर कोसळलेल्या दुर्योधनाला बघताच व्यासमुनी स्तंभित होऊन उभे राहतात आणि भीमाला तेथून घेऊन जाण्याची खूण युधिष्ठिराला करतात. सर्व पांडव आणि कृष्ण आपल्या हातांचा पिंजरा करून भीमाला दूर नेतात. प्रेक्षकांना इथपर्यंतची कहाणी निवेदनातून सांगून झाल्यावर मुख्य प्रवेश सुरू होतो. क्रोधित झालेला नांगरधारी (हलाधर) बलराम रंगमंचावर येतो. गदायुद्धात नैपुण्य प्राप्त केलेल्या आपल्या पट्टशिष्यावर अक्षम्य अन्याय झाल्याचे पाहून साहजिकच तो संतापाने बेभान होतो आणि भीमाला आपल्या नांगराच्या शक्तिशाली तडाख्याने ठार मारण्याची भाषा बोलू लागतो.

आता पुढे काय होणार ही उत्कंठा शिगेला पोहोचली असताना नाटकाच्या या महत्त्वपूर्ण टप्प्यावर रंगमंचावर दुर्योधनाचा नाट्यपूर्ण प्रवेश होतो. आपले धुळीने माखलेले रक्तबंबाळ शरीर हाताने ढकलत, खुरडत खुरडत तो बलरामासमोर येतो. जन्मापासून राजवैभव उपभोगणाऱ्या त्या बलाढ्य वीराला भासाने नागराज वासुकीची उपमा दिली आहे. समुद्रमंथनाच्या वेळी मंदार पर्वताभोवती वेटोळे घालून, दोर म्हणून वापरला गेलेल्या, श्रांत-क्लांत एकाकी वासुकीप्रमाणे सरपटणाऱ्या असहाय्य दुर्योधनाला पाहताक्षणी प्रेक्षकांच्या

मनात त्याच्याविषयी करुणा उत्पन्न होते. आपल्या नायकाच्या दुष्कृत्यांचा पूर्ण विसर पाडण्याचा नाटककाराचा मानस या प्रवेश प्रसंगातच बराचसा सफल होतो.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात सांगितलेल्या नायकांच्या प्रकारांमध्ये आपल्या गर्वोद्धत स्वभाववैशिष्ट्यामुळे दुर्योधन हा खरं तर धीरोद्धत ह्या प्रकारात गणला जायला हवा. मात्र या नाटकात भासाने त्याची प्रतिमा धीरोद्धतच्या ऐवजी धीरोदात्त या प्रकारात साकारली आहे. रंगमंचप्रवेशापासून ते त्याच्या तोंडून येणाऱ्या प्रत्येक उद्गारात ही दक्षता त्याने घेतलेली दिसते.

ज्यांच्याकडून गदायुद्धाचं प्रशिक्षण घेतलं त्या बलरामाला विनम्र अभिवादन करून त्याला शांत राहण्याचा सल्ला देणारा दुर्योधन क्षत्रिय वीराला शोभणारे तत्त्वज्ञान मांडतो. वैरभावनेतली विफलता त्याला एव्हाना पटलेली आहे. आयुष्यभर उराशी बाळगलेली कटूता, सूडबुद्धी त्याला सोडून द्यायची आहे. म्हणूनच या टप्प्यावर युद्ध थांबवणंच कसं योग्य आहे हे तो समजावण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी बलरामाच्या अनावर क्रोधाच्या पार्श्वभूमीवर दुर्योधनाचं व्यक्तिमत्त्व अधिकच उठून दिसतं. भीमाने आपल्यावर अन्याय केला हे जाणवूनही त्याला भीमाचा राग येत नाही. 'मला पराजित करण्यासाठी त्याच्यासारख्या योद्ध्याला लबाडीचा आसरा घ्यावा लागला यातच माझा गौरव आहे' असे उद्गार तो काढतो. त्याही पलीकडे जाऊन जेव्हा तो म्हणतो की प्रत्यक्ष महाविष्णूने भीमाच्या गदेत प्रवेश केला आणि माझ्या स्वर्गारोहणाचा मार्ग मोकळा केला तेव्हा आयुष्याच्या अखेरच्या क्षणांमध्ये दुर्योधनाने गाठलेली अध्यात्मिक उंची पाहून आपण स्तिमित होतो.

यानंतर अचानक नाटकाला कलाटणी देणाऱ्या हृद्य प्रसंगांमधून एक कुटुंबप्रमुख म्हणून दुर्योधनाचं अगदी वेगळं व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येतं. व्यासांनी महाभारतामध्ये कधीही न रंगवलेली ही त्याची कौटुंबिक बाजू नाटकातल्या केवळ एका प्रवेशातून भासाने अतिशय कौशल्याने आणि हळूवारपणे रंगवली आहे.

प्रेतांचे खच पडलेल्या त्या भीषण रणभूमीवर कशीबशी वाट काढत, अंध धृतराष्ट्र, डोळ्यांवर पट्टी बांधलेली गांधारी, मालवी आणि पौरवी या दोन राण्यांना घेऊन येतो तो दुर्योधनाचा लहान मुलगा दुर्जय! दुर्योधनाच्या ह्या दोन्ही राण्या 'असूर्यपश्या' म्हणजे राजवाडा ओलांडून सूर्यप्रकाशात कधीही बाहेर न पडलेल्या आहेत. त्यामुळे मरणासन्न दुर्योधनाला शोधण्याची जबाबदारी आपसूकच दुर्जयावर आलेली आहे.

प्राणांतिक जखमांची वेदना सहजतेने सोसणाऱ्या दुर्योधनाला हे दृश्य मात्र असह्य होतं. आपले वृद्ध आईवडील, उघड्या डोक्याने बाहेर पडलेल्या आपल्या दोन्ही पत्नी आणि अंध आजोबांचे उत्तरीय धरून कष्टाने चालणारा आपला लाडका मुलगा पाहून त्याला भडभडून येतं. घायाळ दुर्योधन अजून कोणाच्या दृष्टीस पडलेला नाही. हिंडून हिंडून दमलेल्या दुर्जयाची समजूत घालत धृतराष्ट्र सांगतो, 'बाबांना शोध बरं, आणि ते भेटले की तू त्यांच्या मांडीवर बस!'. हे ऐकून आनंदलेला दुर्जय नव्या उमेदीने वडिलांना शोधायला सुरुवात करतो. त्या वाक्याने दुर्योधनाच्या काळजात मात्र तीव्र कळ उमटते. धावत आपल्या जवळ येणाऱ्या मुलाला मांडीवर घेता न येण्याच्या पराकोटीच्या दु:खाने त्याचं उरलंसुरलं अवसान गळून पडतं.

'आजवर तू ज्या आसनावर हक्काने बसत होतास ते आता राहिलेलं नाही!' असं सांगून तो दुर्जयाला हातानेच बाजुला सारतो.

'का ? तुम्ही कुठे निघालात ?'

'तुझे शंभर काका गेले आहेत तिथेच!'

'मग मलाही न्या तुमच्याबरोबर!'

'जा, त्या भीमकाकाला सांग!'

बालसुलभ प्रश्नांना दुर्योधनाने दिलेल्या या उत्तरांनी या प्रसंगामधलं कारुण्य आणि गांभिर्य अधिकच गडद होत जातं. दुर्जयाच्या पाठोपाठच धृतराष्ट्र, गांधारी आणि दोन्ही राण्या तिथे पोहोचतात. आयुष्याच्या शेवटच्या घटका मोजणारा दुर्योधन आपल्या आईशी बोलताना अतिशय भावनाविवश होतो. आयुष्यात मी थोडं जरी पुण्य कमावलं असेल तर पुढल्याही जन्मी तुझ्याच पोटी जन्म मिळो ही कुठल्याही मातृभक्त पुत्राची सनातन इच्छा तो व्यक्त करतो. उठून वृद्ध पित्याला अभिवादन करण्याची, त्यांच्या पायावर डोके ठेवण्याची शक्ती गमावल्याची वेदना जाळित असतानाही धीर एकवटून त्याचं सांत्वन करतो. 'रणांगणावर पाठ न दाखवता मृत्यु स्वीकारणाऱ्या पुत्राचा तुम्ही अभिमान बाळगा.' असे एका वृद्ध राजाला सांगणारा हा धीरोदात्त पुत्र आहे. 'आयुष्यभर मी स्वाभिमानाने जगलो आणि युद्धात प्राणपणाने लढून वीरमरण पत्करत आहे, तेव्हा तुम्ही कोणीही माझ्या मृत्युचा शोक करू नका.' अशा शब्दांत एका सच्च्या क्षत्रियाच्या कणखरपणाने तो आपल्या दोन्ही पत्नींचीही समजूत घालतो. दुर्जयाशी बोलताना मात्र तो अधिक जागरुक, प्रगल्भ दिसतो. 'माझ्यासारखीच युधिष्ठिरकाकांची आणि भीमकाकांची सेवा कर. कुंतीआजीची आज्ञा नेहमी पाळत जा.' असा मुलाच्या कल्याणाच्या दृष्टीने योग्य सल्ला देणारा दुर्योधन जेव्हा त्याला 'द्रौपदीकाकू आणि सुभद्राकाकूशी आदराने वाग' असा खास सल्ला देतो तेव्हा त्याला अभिमन्यूवधाच्या दुखऱ्या नसेचाही सूक्ष्म संदर्भ जोडला जातो.

जन्मभर सूडाने पेटलेल्या पण अखेरीस वैरभावनेच्या पलीकडे गेलेल्या दुर्योधनाच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक झळाळी मिळते ती या प्रसंगानंतर येणाऱ्या अश्वत्थाम्याच्या प्रवेशाने. सर्व वातावरण धीरगंभीर, शोकमग्न झालेलं असतानाच पांडवांच्या सूडाने पेटलेला अश्वत्थामा प्रचंड गर्जना करत येतो. अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी निरवानिरवीची भाषा करणाऱ्या घायाळ कुरुराजाला पाहून तो उद्वेगाने म्हणतो,

भीमें गदेचा करुनी प्रहार

खेंचून तैसा तव केशभार

ऊरुद्वयाच्या सह सांग काय

नेला हरोनी तव दर्प अद्य ?

(संदर्भ - कै.बळवंत हिवरगावकरकृत भास कवीची नाटके)

यावर 'स्वाभिमान हे तर क्षत्रिय राजाचे शरीर आहे. मी नेहमी त्याच बाण्याने वागलो. मात्र

झाला प्रकार हा माझ्या आयुष्यभराच्या असंतोषाचं फळ आहे हे दुर्योधनाचे पश्चात्तापदग्ध उत्तर ऐकूनही 'या सर्वाचे मूळ कारण असणाऱ्या कृष्णासकट मी सर्व पांडवांचं उच्चाटन करून टाकीन!' अशी आततायी प्रतिज्ञा अश्वत्थामा करतो. 'अनेक राजवंश या युद्धात नष्ट झालेत. भीष्म, द्रोणाचार्य, कर्ण, माझे सर्व भाऊ धारातीर्थी पडले आहेत. आता पुन्हा युद्धाची भाषा नको.' असे सांगत आपल्या हातून झालेल्या अक्षम्य चुकांचा पाढाही दुर्योधन वाचून दाखवतो. अश्वत्थाम्यावर त्याचा फारसा परिणाम झाला नसला तरी दुर्योधनाच्या मनावरचं ओझं उतरतं. ईश्वरेच्छेने प्राप्त झालेल्या वीरमरणाला तो निर्वैर भावनेने, शांतपणे सामोरा जातो. मृत्यु अत्यंत समीप आलेला असताना स्वर्गाच्या दारात शंतनू व इतर पूर्वज, कर्णासह आपले सर्व भाऊ आपल्या स्वागताला उभे आहेत असे भास त्याला होतात. ऐरावतावर बसलेल्या इंद्राच्या बाजुला बसलेला बालअभिमन्यू आपल्याकडे रागाने पाहात आहे असाही भास होतो. काळजात खोलवर रुतलेलं शल्य आणि पश्चात्तापाने भरलेले अंत:करण घेऊन, जीवनाचा अवघा अर्थ उलगडलेल्या दुर्योधनाचं प्राणोत्क्रमण होतं आणि अभिजात संस्कृत नाटकांच्या इतिहासातील एकमेव शोकांतिकेची सांगता होते.

एकमेव अशासाठी की संस्कृत नाटकाचा शेवट सुखान्त असावा असा दंडक प्राचीन काळात तर काटेकोरपणे पाळला जाई. सर्व नाटककार भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचे संकेत कटाक्षाने पाळत आणि स्वप्न, निद्रा, युद्ध, रंगमंचावर पात्रांचा मृत्यु इ. गोष्टी निषिद्ध मानल्या जात. अर्थात भासाचा काळ हा भरतमुनींच्या आधीचा होता आणि भास हा स्वभावत: एक बंडखोर नाटककार होता. म्हणूनच व्यासमुनींनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखेपेक्षा पूर्णपणे वेगळा असा हा भासकवीचा दुर्योधन आहे. ज्याच्या अनावर महत्त्वाकांक्षेतून, विखारी सूडभावनेतून महायुद्ध पेटले तो शीघ्रकोपी, आततायी, कपटी खलनायक उरुभंगमध्ये कुठेच दिसत नाही. विशेष म्हणजे त्याचं कुठलंच दुष्कृत्य भास लपवत नाही, वेगळ्या पद्धतीने मांडत नाही किंवा नाकारतही नाही. केवळ मृत्युसमयी त्याला झालेली उपरती, त्याची बदललेली मानसिकता आणि त्याची कुटुंबवत्सल बाजू एवढ्याच बळावर त्याच्यात दडलेल्या वात्सल्यभावनेशी, संवेदनशीलतेशी आणि मृत्युला उदारमनाने कवटाळणाऱ्या वृत्तीशी आपण सहज एकरुप होऊन जातो. महाभारतातल्या युद्धपर्वात दडलेलं नाट्य शोधून, ते आपल्या प्रतिभेने फुलवून दुर्योधनाच्या व्यक्तिमत्त्वाचे अप्रकाशित पैलू भासाने उलगडले. हे नाटक वाचणाऱ्याच्या मनातली दुर्योधनाची पूर्वप्रतिमा संपूर्णपणे बदलून टाकण्याची किमया या एका लहानशा एकांकिकेत त्याने साधली आहे.

सुप्रसिद्ध संस्कृत पंडित गोविंद केशव भट यांच्या निष्कर्षांनुसार ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाने शोकांतिका किंवा ट्रॅजेडीची जी व्याख्या केली त्या सर्व निकषांत उरुभंग हे नाटक तंतोतत बसते. वास्तविक भास आणि ॲरिस्टॉटल हे जगाच्या दोन टोकांना असणारे, भिन्न कालखंडातले विद्वान! मात्र सच्च्या कलावंतांच्या आणि कलाचिंतनाविषयीच्या त्यांच्या मूलभूत प्रवृत्तीला स्थळकाळाची बंधने लागू पडत नाहीत हेच यातून सिद्ध होतं. 'उरुभंग'सारख्या सकस शोकांतिकेने संस्कृत नाट्यसृष्टीला परिपूर्णता देणारा एक अलौकिक नाटककार आपल्या भारतभूमीवर निर्माण झाला आणि नावाजला गेला हे आपलं केवढं

**चित्रा वाघ**

लेखिका, सूत्रसंचालिका, निवेदिका, आकाशवाणीवर अनेक कार्यक्रमाचे सादरीकरण.
Chiwagh@gmail.com

# रस्ते फुलाफुलांचे.....

रस्ते फुला-फुलांचे,
नव्हतेच यार माझे
नशिबात लाड नव्हते,
कसलेच, यार माझे!

तुडवीत सर्व काटे,
मी चाललो मजेने,
तळवे तयार होते...
भलतेच, यार माझे!

थकलो न मी जराही,
ना घेतला विसावा
अडवून मात्र थकले,
रस्तेच यार माझे!

हासून बोलतो,अन्,
उघडा स्वत:च पडतो...
ते दु:ख पापण्यांतुन,
झरतेच यार माझे!

ना वर्ण मानतो मी,
ना धर्म, जात-पाती,
लोकांस नाव तरिही...
सलतेच यार माझे!

खोटीच दाद येथे,
देतात एकमेका...
मी बोलतो खरे,हे...
चुकतेच यार माझे!

त्या रूप-गर्वितेची,
होते अजून चर्चा...
हमखास नाव तेव्हा...
निघतेच यार माझे!

**सदानंद डबीर**
९८१९१ ७८४२०

# सप्तरंग
## हेल्थ केअर प्रा. लि.

24/7 Service

थकलेल्या जीवांना मायेचा आधार देणारे हात.

**We Provide... Nursing Care at Home & Hospital
Patient Care / Elderly Care / Baby care / Male / Female Attendant / Caretaker, Nursing Services
10, 12, 24 Hrs. & Monthly Services**



नर्सिंग सर्व्हिसेस



पेशंट केअर टेकर/ वयोवृध्द सेवा



बेबी केअर


रुग्णांची, वृध्दांची व बाळांची योग्यप्रकारे काळजी व देखभाल करण्यासाठी घरी व हॉस्पिटलमध्ये थांबण्यासाठी प्रशिक्षीत पुरुष व महिला मदतनीस (आयाबाई) वॉर्ड बॉय व नर्सेस मिळतील.

ज्यांना कुणालाही सेवेकरी, नर्स पाहिजे असल्यास खालील नंबर व संपर्क साधावा.

**7045030777/ 7045040777
7304048777/ 88508 26448**

## संपुर्ण देखभाल हिच आमची ओळख

**मुख्य कार्यालय : शॉप नं.४, फिश मार्केट जवळ, सायन ट्रॉम्बे रोड, सायन (पूर्व) मुंबई - २२**



# छत्रपती शिवाजी महाराष्ट्र टर्मिनस - स्थापत्य शास्त्राचा विलोभनीय नमुना

ताजमहालच्या बरोबरीने सर्वाधिक फोटो काढली गेलेली ही इमारत आहे. मुख्य रस्त्यावर बाहेरच्या बाजूला स्टेशनची लांबी पंधराशे फूट भरते. या पंधराशे फुटात व्हिक्टोरिया टर्मिनस प्रेक्षकाला रेखीव, सुडोल व देखण्या शिल्पाकृतींचे दर्शन घडवते.



संगीता बेहेरे

मुंबई हे गतीचे शहर. येथील रस्ते, रेल्वे, माणसे, एवढेच नाही तर मनं सुद्धा सतत धावतच असतात. या धावणाऱ्या मुंबईच्या मुख्य वाहिन्या म्हणजे तीनही रेल्वे लाईन. मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि हार्बर रेल्वे. मुंबईभर यांच विणलेल जाळ आणि त्यातून प्रवास करणारे लक्षावधी प्रवासी. याशिवाय तीनही दिशांनी भारतभरातून मुंबईत नशीब काढायला येणारे लोंढे. यांचा सारा भार या रेल्वेच तर वाहतात.

मुंबईत रेल्वेची सुरुवात झाली १६ एप्रिल १८५३ साली. एका तात्पुरत्या उभारलेल्या लाकडी शेड मधून ढोल ताशांच्या गजरात पहिली रेल्वे सुरू झाली. २१ मैलांचा प्रवास करून ठाण्याला पोहोचली. पण जेथून म्हणजे बोरीबंदरहून ही रेल्वेगाडी निघाली त्या जागी पूर्वी काय होते? माहित आहे? आज नगर चौकाची बाग जिथे आहे तिथे जुन्या ब्रिटिशकालीन किल्ल्याची दोन प्रवेशद्वारे होती. जी बझार गेट म्हणून ओळखली जायची. या प्रवेशद्वारांपलीकडे एक मोठा तलाव होता जो फाशीचा तलाव म्हणून ओळखला जाई. कारण जुन्या काळात खुनी गुन्हेगारांना इथे उघड्यावर फाशी दिले जायचे. गुन्हेगारांवर नागरिक चपलांचे हार, अंडी, चिखल व निर्भत्सनेचा मारा करीत. असा उल्लेख के एन काब्राजी या १९ व्या शतकातील नोंदी करणाऱ्या गृहस्थाने आपल्या दैनंदिनीत केलेला आहे. १८५० ला हा तलाव बुजवण्यात आला. याच परिसरात मूळ मुंबादेवीचे मंदिर होते जे आता हलवले गेले. याच परिसरात असलेला धोबी तलाव (धोबीघाट) महालक्ष्मीला हलवला गेला. त्याकाळी बोरीबंदर हे फक्त होड्या, गलबते यांना किनाऱ्यावर येण्यासाठी असणारे बंदर होते.

एक ऑगस्ट १८४९ या दिवशी इंग्लंडमध्ये ग्रेट इंडियन पेनानशुलार रेल्वे (जीआयपी) या कंपनीची स्थापना झाली. नंतर चारच वर्षात मुंबई - ठाणे ही पहिली रेल्वे धावली. १८६१ मध्ये मुंबई सरकारने एलफिस्टन लँड अँड प्रेस कंपनीला मोदीबे नामक परिसरात भराव टाकून जमीन उभारण्याचे काम दिले. या नव्याने तयार जमिनीतील शंभर एकर जागा सरकारला भव्य रेल्वे स्टेशन उभारण्यासाठी देण्याचे ठरवले. मग जी आय पी च्या डायरेक्टरनी पीडब्ल्यूडी खात्यातील वास्तुविशारद श्री. फ्रेडरिक्स स्टीव्हन्स यांच्यावर टर्मिनल डिझाईनचे काम सोपवले. यांनीच मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीचेही डिझाईन केले असून समोरासमोरील या दोन्ही वास्तू दोन वेगवेगळ्या शैलीत तरीही एकत्रितपणे सुयोग्य दिसतील



अशा रम्य बनवल्या आहेत.

टर्मिनलचे बांधकाम मे १८७८ मध्ये सुरू झाले व दहा वर्षांच्या कालावधीत पूर्ण झाले. मुख्यालयाच्या बांधणीत रुपये सोळा लाख तीस हजार व स्टेशनच्या बांधणीत रुपये दहा लाख खर्च झाले. श्री. फ्रेडरिक स्टीफन्स यांना ठरलेल्या मोबदल्यापेक्षा पाच हजार रुपये बोनस म्हणून देण्यात आले. त्यांची या वास्तूची डिझाइन्स लंडनला रॉयल अकॅडमीत १८८१ मध्ये मुद्दाम प्रदर्शित करण्यात आली. श्री. फ्रेडरिक स्टीव्हन्स यांना या प्रचंड प्रकल्पाच्या कामात श्री. सिताराम खंडेराव वैद्य यांचे बहुमोल सहाय्य झाले. वैद्य त्या काळात सहाय्यक इंजिनियर म्हणून काम करीत. त्याचप्रमाणे श्री. एम एम जनार्दन, सुपरवायझर यांचीही मोलाची मदत झाली. इमारतीच्या बाह्य सुशोभीकरणात वापरलेल्या शिल्पाकृतींचे डिझाईन मॉडेल्स जे जे स्कूल ऑफ आर्ट चे विद्यार्थी श्री.गोमेझ यांनी प्राचार्य श्री. ग्रिफिथ यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली आहेत. प्रत्यक्ष घडाई स्थानिक कारागीरांकडून करून घेतली आहे. वेटिंग हॉल व उपहारगृहे यातील रंगदृश्ये सिनॉर गिबेलो यांची आहेत. संगमरवरी काम मेसर्स मुरागलिया यांनी अपोलो बंदर भागातच करून घेतले. १८८७ मध्ये फक्त मुख्य जिना, घुमट व शिल्पाकृती बसवण्याचे काम बाकी राहिले. याचवेळी झालेल्या समारंभात मुख्यालय आणि टर्मिनल स्टेशनचे नाव महाराणी व्हिक्टोरिया यांच्या सन्मानार्थ व्हिक्टोरिया टर्मिनस ठेवण्यात आले.

व्हिक्टोरिया टर्मिनसचे काम पूर्ण झाल्यावर कालांतराने ते जगातले सर्वोत्कृष्ट रेल्वे स्टेशन म्हणून मान्यता पावले. ताजमहालच्या बरोबरीने सर्वाधिक फोटो काढली गेलेली ही इमारत आहे. मुख्य रस्त्यावर बाहेरच्या बाजूला स्टेशनची लांबी पंधराशे फूट भरते. या पंधराशे फुटात व्हिक्टोरिया टर्मिनस प्रेक्षकाला रेखीव, सुडोल व देखण्या शिल्पाकृतींचे दर्शन घडवते. अत्यंत सफाईदार काटेकोर आखणी करून बसवलेली गवाक्षे, त्यांची तावदाने, छपराखालील भिंतीवर केलेले नक्षीकाम, सज्जे व त्यांच्या आधार कमानी सर्वच अपूर्व आहे. मूळात याची योजनाबद्ध आखणीच इतकी प्रभावी व प्रतिभा संपन्न आहे व घडणमांडणी इतकी काळजीपूर्वक केलेली आहे की असा समसमासंयोग क्वचितच बघायला मिळतो.

मुख्यालयाच्या वास्तूवरील घुमट राजेशाही बांधणीचा असून प्रगतीचे प्रतीक म्हणून त्यावर भव्य शिल्प कोरले आहे. खालच्या प्रत्येक चांदईवर कृषी,उद्योग, अभियांत्रिकी, व्यापार इत्यादीची प्रतिकात्मक शिल्पे बसवली आहेत. गेटच्या दोन्ही बाजूंना ब्रिटिश साम्राज्याचे प्रतीक सिंह व भारताचे प्रतिनिधित्व करणारा झेप घेणारा वाघ यांची शिल्पे बसवलेली आहेत. आत मध्ये गर्दीने भरलेल्या तिकीट ऑफिसेसच्या मोठ्या प्रांगणात निवडक इटालियन संगमरवराचा वापर दिसतो. पॉलिश केलेला नीलवर्णी लाव्हा दगड आणि कौशल्यपूर्ण दगडी कमानींवर पानाफुलांची नक्षी, वैशिष्ट्यपूर्ण फरसबंदी व फरशीच्या काउंटर असे अनेक आलिशान राजेशाही गुणविशेष इथे आढळतात. छतही निळसर सोनेरी रंगाने मढवले आहे. लाकडी प्रवेशद्वारे संगमरवरी घडीव स्तंभात बसवलेली असून त्यावर नक्षीकाम केलेले आहे. पुढे दिसणाऱ्या प्रशस्त जिन्याच्या साडेआठ फूट लांब पायऱ्या भिंतीत बसवलेल्या असून बाहेरच्या बाजूस अधांतरी आहेत. ज्या नीलवर्णी लाव्हा पाषाणापासून बनवल्या आहेत त्याला लोखंडाचे घडीव कठडे आहेत.


भरती घुमटाच्या गोलाईत आठ रीब्स असून प्रत्येक दोन रिब्सच्या मध्ये लांब खिडकी स्टेंट ग्लासने शोभिवंत केली आहे १९२९ साली मूळ बांधणीत फेरबदल करून हे बांधलेले स्टेशन लोकल गाड्यांसाठी राखून ठेवण्यात आले. नवीन भागात लांब पल्ल्याच्या गाड्यांची सोय करण्यात आली. या वास्तूचे कौतुक करताना प्रसिद्ध 'मेकलीन गाईड बॉम्बे' या पत्रिकेने लिहिले आहे, 'पाहणाऱ्याचे डोळ्यात पाहता क्षणीच या महाकाय, उत्तुंग आणि भव्य बांधणीने आश्चर्याचे लोट उभे राहतात आणि कौतुक भरभरून वाहते. नंतर हळूहळू एकेक तपशील टिपू लागल्यावर हे कौतुक वाढत जाते. सजवलेले चांदई कोपरे त्यांचे घडीव पाषाणातले मनोरे, डौलदार घुमट आणि बाह्य भागावरची अनेक शिल्पे, खालच्या प्रवेश मंडपापासून ते वर कळसापर्यंत पहात पहात नजर पाव मैल अंतर तरी या दिमाखदार दर्शनी भागावरून फिरते.'

या स्टेशनमधील आणि स्टेशनबाहेरील वर्दळ थक्क करणारीच आहे. डोक्यावर



भिंतीजवळील कडांना केलेली सजावट सौंदर्यपूर्ण आहे. भिंतीचा भाग नक्षीदार कौलांनी तर खिडक्यांची गवाक्षे स्टेंट ग्लास पद्धतीने सजवली आहेत. नक्षीदार घडवलेल्या लोखंडाच्या गॅलरीज, लांबलचक तिकीट लांबलचक लाकडी खोक्यांमध्ये जेवणाचे डबे घेऊन गर्दीतून वाट काढत धावणारे डबेवाले पाहताना कोणीही थक्क होऊन जातो. दिवसभरात लाखाहून जास्त डबे घर ते कार्यालय अशी अचूक नेआण करणारे

अशिक्षित डबेवाले हे आज जगभरात व्यवस्थापकीय कौशल्याचे प्रतीक झाले आहेत. या उत्तुंग,भव्य इमारतीने मुंबईची कित्येक स्थित्यंतरे पाहिली व पहात आहे. अतिव सौंदर्यपूर्ण अशा या वास्तूशिल्पाला २६ नोव्हेंबर २००८ साली दहशतवादी हल्लेखोरांनी काडतुसांनी बोचकारले, भोसकले. २४ तास जिवंत वाहणाऱ्या इथल्या मनुष्यबळाच्या प्रवाहाला रक्ताच्या थारोळ्यात कोसळताना पाहिले. पण चिवट कणखर मुंबईकर तर यातून सावरलास पण या वास्तुशिल्पालाही त्यांनी पुन्हा जिवंत केले. आज हेच वास्तुवैभव जखमांचे व्रण छातीवर मिरवत 'छत्रपती शिवाजी टर्मिनस' या नावाने पुन्हा वैभवात दिमाखाने उभे आहे. स्वतःच्या धावपळीच्या जीवनात याच्या सहवासात अनेकदा तुम्ही आला असाल. कधीतरी निवांत समोरच्या फुटपाथवर मॅक्डोनल्डजवळ उभे रहा आणि रसिकतेने याचे सौंदर्य न्याहाळा. त्याच्या भव्यतेत हरवून जा. मान वर करून त्याची १३५ वर्षे जुनी महत्तमता उरात साठवून घ्या. याचसाठी केवळ हा लेखन प्रपंच.






**संगीता बेहेरे**

गेल्या अनेक वर्षांपासून 'आम्ही पार्लेकर' या वाचकप्रिय सदराचे लेखन.
sangeetabehere9920@gmail.com
९८६७७ ५८३१०

# गुलमोहोर ट्रॅव्हल्स

सुबोध म. जोशी

02226147888
02226151550
9769008775
9869376515
9869002219
9769069441

२, गगनगिरी अपार्टमेंट, पार्लेश्वर रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-५७.

**ए.सी. कार्स, मिनी, सेमी लक्झरी बसेस भाड्याने उपलब्ध.**

**पॅकेज टूर्स • हॉटेल बुकींग** Facebook / Instagram / Youtube

| दिनांक | सहलीचे ठिकाण |
|---|---|
| ३ ते ४ जानेवारी २०२३ | अष्टविनायक दर्शन |
| ८ जानेवारी २०२३ | पोपटी पार्टी, अलिबाग - नार्वेकर फार्मस रो रो बोट क्रुझ, ( भाऊचा धक्का ते मांडवा ) |
| ११ जानेवारी २०२३ | फ्लेमिंगो सफारी, नवी मुंबई, वाशी, बेलापूर, कारवे गांव, टी.एस.चाणाक्य, ऐरोली बोटींग. |
| १५ जानेवारी २०२३ | हुरडा पार्टी - संकल्प गार्डन, आळंदी |
| २२ जानेवारी २०२३ | पोपटी पार्टी - सरळगांव, म्हसकर फार्मस्. कालू धसई संगम व्ह्यू पाईंट, संगमेश्वर मंदीर. |
| २६ ते २९ जानेवारी २०२३ | नरसोबाची वाडी, खिद्रापूर, औंदुंबर, महालक्ष्मी, कणेर मठ, जोतिबा, पन्हाळा, पावनखिंड. |
| ५ फेब्रुवारी २०२३ | ऊकडहंडी - मनोर, रोहीणी कृषी पर्यटन केंद्र. |
| ७-८ फेब्रुवारी २०२३ | नाशिक-आर्टीलरी म्युझियम, भगूर, डुबेरे, सिन्नर |
| १०-१२ फेब्रुवारी २०२३ | स्ट्रॉबेरी महोत्सव-महाबळेश्वर, वाई, मॅप्रो, वेण्णा |
| १७-१८ फेब्रुवारी २०२३ | महाशिवरात्री-गुहागर, व्याडेश्वर, वेळणेश्वर, दुर्गादेवी |

**२०२३ च्या सहलींसाठी Website : www.gulmohortravels.com किंवा सुबोध जोशी 9769008775 / सचिन जोशी 9869376515 यांच्याशी संपर्क साधावा**

# सोशल मिडिया आणि घटस्फोट






**मुक्ता चैतन्य**

लग्न होऊन जेमतेम दोन तीन वर्षंच झाली असतील आणि अचानक तिने एके दिवशी नवऱ्याला सांगितले की तिला घटस्फोट हवा आहे. त्याच्या दृष्टीने सगळं नीटनेटके सुरु असताना बायकोने एकदम घटस्फोटाचा विषय काढल्यावर तो हबकून गेला. घरातली मोठी माणसं मधे पडली, नक्की झालं काय याची चर्चा सुरु झाल्यावर ती म्हणाली, “याला लग्न, बायको, घर, संसार यापेक्षा मोबाईल आणि त्यातलं गेमिंग जास्त प्रिय आहे. बघावं तेव्हा हा गेमिंग करत असतो, मी काही सांगत असले तरी त्याचं डोकं मोबाईलमधून बाहेर पडत नाही. बाथरूमला जाताना, जेवताना, झोपताना सतत हा मोबाईलवर गेमिंग करत असतो. शॉपिंगला गेलो तरी याच्या हातातून मोबाईल सुटत नाही. मला या सगळ्याचा कंटाळा आलेला आहे. मी याला काही सांगायला गेले तर हा माझ्यावर खेकसतो. तो मोबाईल ॲडिक्ट आहे हेच त्याला मान्य नाहीये, मला नाही राहायचं याच्या बरोबर.”

त्याच्यासह घरातले सगळेच हबकून गेले. आपलं गेमिंग या टोकाला गेलं आहे याची तोवर त्याला जाणीवच नव्हती. बायको गेमिंगवरून काही बोलली तर याला ती कटकट वाटत होती, पण आता लग्नच मोडतंय म्हटल्यावर तो हवालदिल झाला.

ही एका जोडप्याची गोष्ट नाहीये. अनेक जोडप्यांमध्ये डिजिटल स्पेसमुळे दुरावा निर्माण होताना दिसायला लागला आहे आणि त्यातून ‘डिजिटल डिव्होर्स’ होताना दिसत आहेत. म्हणजेच घटस्फोटाचे कारण डिजिटल स्पेसमधला जोडप्यातल्या कुणा एकाचा अतिवावर. मग ते गेमिंगचं व्यसन असो नाहीतर, सोशल मीडिया, OTT, पॉर्न किंवा व्हॉट्सअँपचं व्यसन असो. माणसं या डिजिटल स्पेसच्या गैरवापरामुळे दुरावत आहेत आणि वेगळे होतायेत. मध्यंतरी याविषयावर खळबळ माजली ती नाशिकमधली घटस्फोटांची आकडेवारी समोर आल्यावर. गेल्या पाच वर्षात जवळपास दहा हजारांहून अधिक घटस्फोट हे फक्त चुकीच्या डिजिटल सवयींमुळे झालेले आहेत. ही भारतातल्या एका छोट्या शहराची आकडेवारी आहे, संपूर्ण देशाचं चित्र काय असेल हे वेगळं सांगायला नको. दर तीन जोडप्यांमधील एका जोडप्यात सोशल मीडियामुळे भांडणं होतात असं एका सर्वेक्षणात दिसून आलेलं आहे. एकुणच वैवाहिक जीवनाच्या नात्यात सोशल मीडिया, गेमिंग आणि पोर्नोग्राफी यांनी वादळ आणलेलं आहे. ‘पॉर्न खेळ’ हे माझं पुस्तक करत असताना, आदिवासी भागात काम करणाऱ्या काही




कार्यकर्त्यांशी चर्चा करण्याची संधी मिळाली होती. हे कार्यकर्ते नवविवाहित आणि ज्यांच्या लग्नाला दोनचार वर्ष झाले आहेत अशा आदीवासी जोडप्यांबरोबर काम करत होते. शंभरहून अधिक जोडप्यांच्या एका कार्यशाळेत ९९ टक्के बायकांना लग्नातून बाहेर पडण्याची इच्छा होती, काडीमोड हवा होता. कारण एकच, पॉर्न साईट्स. अनेकींचं म्हणणं होतं नवरे तिथे काहीबाही बघतात आणि ते आम्ही करावं अशी अपेक्षा करतात, त्यातून भांडणं होतात.

लग्नाचं नातं आणि त्यात शिरलेलं डिजिटल जग हे वाटतं त्यापेक्षा बऱ्याच गुंतागुंतीचं प्रकरण बनलेलं आहे. मुळात डिजिटल स्पेस कितीही जादुई असली, त्याचे अनेक फायदे असले, सोशल मीडियाच्या निमित्ताने आपल्याला एकमेकांशी कनेक्ट होण्याची, अभिव्यक्त होण्याची संधी मिळत असली तरी सायबर स्पेस आपल्याला एका 'आयसोलेशन' मध्ये ढकलते. एक विचित्र एकटेपणा सगळ्याच युजर्सच्या वाट्याला येण्याची शक्यता असते. म्हणजे समूहात असूनही एकाकी अशी काहीतरी अवस्था अनेकांची होते. म्हणजे एकीकडे ऑनलाईन जगात हजारो मित्र पण प्रत्यक्षात बोलायला कुणी नाही, OTT वर प्रचंड मनोरंजन पण सिनेमा बघायला 'बडी' उपलब्ध नसणं, गेमिंग करत असताना आजूबाजूला काय सुरु आहे याचा विसर म्हणजे एक प्रकारे वास्तवाचा विसर पडत जाणं अशा कितीतरी गोष्टी घडत असतात. या सगळ्यामुळे एखाद्या छोट्या चौकोनात कोंबल्यासारखी सगळ्यांची अवस्था होते. प्रत्यक्ष आणि आभासी जग झपाट्याने एकमेकांमध्ये गुंतताना दिसत आहेत. एकमेकांवर परिणाम करू लागले आहेत आणि त्याचाच एक भाग म्हणजे 'डिजिटल डिवोर्स'

स्त्रीपुरुष संबंधात एक अलिखित असुरक्षितता अनेकदा असते. ती दरवेळी आर्थिक असेल असं नाही. उलट बहुतेकवेळा ती मानसिक आणि भावनिक असते. आपला जोडीदार आपल्याशी प्रामाणिक आहे का, तो आपल्यापेक्षा इतर नातेवाईकांचे तर जास्त ऐकत नाही ना, त्यालेखी आपल्याला पुरेसं महत्व आहे ना, आपल्या पाठीशी आपला जोडीदार नक्की असेल ना अशी शंका लग्नाच्या नात्यात अनेकदा अनेकांच्या मनात निर्माण होत असतात. या शंकांना खतपाणी सोशल मीडिया आणि डिजिटल स्पेस घातलं. एका केसमध्ये बायको सतत व्हॉट्सअँप वर असते म्हणून नवऱ्याने डिवोर्स मागितला तर अजून एका केसमध्ये नवरा पॉर्न बघतो तर बेडमध्ये थंड का असतो म्हणून बायकोने डिवोर्स मागितला. अशा घटनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढणारे आहे. त्यात ज्या लोकांचा स्वभाव मुळातच शंकेखोर असतो त्यांच्या मनात ही असुरक्षिततेची भावना आणखीनच तीव्र होते. त्यातून भांडणं, मत्सर, राग या भावना उफाळून येतात आणि संसार सावरण्याचा मुद्दा बाजूला पडून तुकडे पडायला सुरुवात होते.

अनेक जोडप्यांमध्ये 'प्रायव्हसी'च्या कल्पना निरनिराळ्या असतात. एखाद्या नवऱ्याला वाटत असतं बायकोने तिच्या मोबाईलचा पासवर्ड आपल्याला दिलाच पाहिजे तर एखाद्या बायकोला वाटत असतं नवरा कुणाशी चॅटिंग करतोय ते तिला कळलंच पाहिजे. अशा सगळ्या केसेसमध्ये जर प्रायव्हसीच्या कल्पना नवरा बायकोच्या वेगळ्या असतील तर गडबड व्हायला सुरुवात होते. अशावेळी, बायकोला हे समजत नाही की मोबाईलचा पासवर्ड का हवा, विश्वास नाहीये का तर दुसऱ्या केसमध्ये नवऱ्याला समजत नसतं की त्याचे सगळे चॅट्स त्याने बायकोला का दाखवायचे, मित्रांशी, सहकाऱ्यांशी झालेल्या चर्चा बायकोला का बघायच्या असतात. कुठेतरी आपल्यावर विश्वास नाही ही भावना बळावत जाते आणि त्याचा परिणाम म्हणून भांडणं सुरु होतात. लग्नाचं नातं नको असं वाटायला लागतं. लग्न करून आपण आपल्या स्वातंत्र्यावर गदा आणली आहे असंही वाटतं आणि नात्यातला आनंद संपून ते ओझं बनतं. अशी ओझी वागवण्यापेक्षा टाकून दिलेली बरी असं वाटून मग त्या नात्यातून बाहेर पडण्यासाठी त्या स्त्री पुरुषांची धडपड सुरु होते. आणि शेवट घटस्फोटात होतो.

अनेकदा असंही दिसून आलं आहे की इंटरनेटचं व्यसन असणाऱ्या व्यक्तींमध्ये त्यांच्या जोडीदाराबद्दल प्रेम नसतं अशातला भाग नाही पण व्यसनाधीनतेमुळे जोडीदाराच्या गरजांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेलं असतं. एकमेकांसाठी जो वेळ देणं अपेक्षित असतं तो सगळा वेळ इंटरनेटने गिळून टाकलेला असतो. भावनिक, शारीरिक गरजांकडे

पूर्णपणे दुर्लक्ष झालेलं असतं. अनेकदा गेमिंग आणि पेड पॉर्न बघण्याच्या सवयींमुळे खिसा रिकामा होत असतो. अनेक जण ऑनलाईन गॅम्बलिंगसाठी घरातले बचतीचे पैसे खर्च करताना दिसतात किंवा त्यासाठी कर्जे काढताना दिसतात. या सगळ्याचा परिणाम थेट नात्यांवर होतो. संसारापेक्षा ऑनलाईन जगात काय सुरू आहे हे अधिक महत्वाचं वाटायला लागतं. गेमिंग केलं नाही, क्षणाक्षणाला व्हॉट्सअ‍ॅप उघडून बघितलं नाही, सोशल मीडियावरच्या सगळ्या चर्चांमध्ये सहभागी झालो नाही तर आपण सगळ्यापासून तुटले जाऊ, आपण मागे पडू या भावनेच्या भरात सगळ्यात जवळच्या प्रेमाच्या नात्यात आपणच विष कालवतो आहोत हे लक्षात येत



नाही. आपला आपल्या जोडीदारासाठी प्रत्यक्ष वेळ किती आणि आभासी जगातल्या माणसांसाठी वेळ किती याचा हिशेब लावता येईनासा होतो. आभासी जग अधिक महत्वाचं आणि जवळचं वाटायला लागतं. कणाकणाने माणसं खऱ्या जगापासून दूर जायला लागतात. आभासी जगात अधिक रमायला लागतात, तिथे ताण येत नाही असं वाटून ताण हलका करण्यासाठी गेमिंग करायला लागतात पण प्रत्यक्षात त्यांच्या आयुष्याला तडे पडायला लागलेले असतात. ज्याचा पहिला घाव हा नात्यांवर होतो. कटुता, राग, अपेक्षाभंग, दुर्लक्ष या सगळ्या भावनांचा कल्लोळ माजतो आणि माणसं नात्यातून बाहेर पडण्याची भाषा बोलायला लागतात.

मग यावर उपाय काय ?

डिजिटल जगापासून फारकत हा उपाय असू शकतो का ?

की अधिक सजग वापर, समतोल वापर हे उत्तर असू शकतं ?

समतोल, सजग आणि सुज्ञ वापर हेच फक्त उत्तर असू शकतं. इंटरनेट आता आपल्या आयुष्यात अशाकाही पद्धतीने शिरलेले आहे की ते आपल्याला आयुष्यातून बाहेर काढून टाकता येणार नाही. डिजिटल डिटॉक्स किंवा उपास आपण केला तरीही समतोल आणि सजग वापर कसा करायचा हे जर समजलं नाही तर त्या डिजिटल उपासतापासांनाही काही अर्थ उरणार नाही.

काही बेसिक गोष्टींचा विचार केला तर या गुंत्यातून सुटता येऊ शकतं.

आपण ऑनलाईन का जातोय हा प्रश्न स्वतःला विचारायला विसरू नका. आपल्यासाठी काय महत्वाचं आहे याचा अग्रक्रम ठरावा, तो लक्षात ठेवा आणि परत परत तपासून बघा. एखादं नातं मुळातूनच कुजलेलं असतं अशावेळी सोशल मीडिया निव्वळ निमित्त ठरतं, आपल्या नात्यात जे काही चुकत असेल ते वेळेवर सुधारण्याचा प्रयत्न करा. भावनांचा निचरा करण्याचे सोशल मीडिया हे माध्यम नाही हे लक्षात ठेवा. एकमेकांवरचा विश्वास अढळ ठेवा. जर काही असुरक्षिततेचे मुद्दे असतील तर ते समोरासमोर बसून बोलले पाहिजेत. रागराग करुन उत्तरं कधीच मिळू शकत नाहीत. आपला स्क्रीन टाइम किती आहे याकडे लक्ष ठेवा, त्यासाठी फोनमध्ये असलेली डिजिटल वेलबीईंगची फीचर्स वापरा. आधी प्रत्यक्ष जगाला महत्व द्या, मग आभासी जगाला. जर गेमिंग, ऑनलाईन जुगार किंवा इतर कुठल्याही कारणासाठी पैसे खर्च होत असतील तर ती धोक्याची सूचना आहे हे लक्षात घ्या. तुमच्या संसाराचे पैसे तुम्ही या गोष्टींवर खर्च करणं अपेक्षित नाहीये, ते होत असेल तर तुमचे चुकते आहे हे लक्षात घेऊन लवकरात लवकर सुधारणा करा.


नवरा बायको आणि त्यांचा संसार हे एक टीमवर्क आहे. एकटा कुणीही हा खेळ मांडू शकत नाही, निभावून नेऊ शकत नाही. दोघांचं ही तितकंच योगदान अपेक्षित असतं आणि तो काळ गेला जेव्हा स्त्रिया फक्त संसार सावरण्याचा, टिकवण्याचा प्रयत्न करत राहायच्या. आजच्या घडीला संसार चालवण्याची, सावरण्याची, सांभाळण्याची, टिकवण्याची आणि समृद्ध करण्याची जबाबदारी दोघांची आहे. आणि दोन्ही बाजूंनी उचलली जाणं आवश्यक आहे, अन्यथा काडीमोड अटळ आहेत.


**मुक्ता चैतन्य**

लेखिका मुक्त पत्रकार असून समाज माध्यमांच्या संशोधक व अभ्यासक आहेत

९८२३३ ८८८२८

muktaachaitanya@gmail.com






















**CUSTOMISED HOLIDAYS**

Kashmir Or Switzerland...Kerala Or Scandinavia...
Andaman Or Maldives...Meghalaya Or Japan...
Kaziranga Or Kenya... Ladakh Or Iceland...

"Sankalp" Touch Services... Have 'A Unique Experience !'

**Customised Holidays...Packages**

SANKALP TM
TOURS & TRAVELS
*An Unique Experience*

## SANKALP TOURS & TRAVELS

**Call / WhatsApp 7738121381**

sankalptours1212@gmail.com

www.sankalptoursandtravels.com




# ऋषि सुनक

★ २५ ऑक्टोबर २०२२ पासून युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान

★ युनायटेड किंग्डमचे पहिले ब्रिटिश आशियाई आणि पहिले हिंदू पंतप्रधान

★ तत्पूर्वी अर्थमंत्री आणि कोषागाराचे मुख्य सचिव म्हणून कार्यरत

★ २०१५ पासून रिचमंड (यॉर्क्स) मतदारसंघाचे खासदार

★ ऑक्सफर्डच्या लिंकन कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्राचा अभ्यास

★ फुलब्राइट स्कॉलर म्हणून स्टॅनफोर्ड विद्यापीठातून एमबीए पदवी प्राप्त

★ २००९ मध्ये इन्फोसिसचे संस्थापक, भारतीय अब्जाधीश एन.आर. नारायण मूर्ती यांची मुलगी अक्षता मूर्ती यांच्याशी विवाहबद्ध

★ 'द संडे टाईम्स रिच लिस्ट २०२२' मध्ये प्रसिद्ध झालेल्या सर्वेक्षणानुसार सुनक आणि मूर्ति यांचा ब्रिटनमधील श्रीमंत कुटुंबांमध्ये २२२ वा नंबर

★ खासदार म्हणून निवडून आल्यावर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये भगवद्गीतेला साक्ष ठेवून शपथ




# द्रौपदी मुर्मू

★ भारताच्या राष्ट्रपतीपदासाठी निवड झालेल्या पहिल्या आदिवासी व्यक्ती

★ स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या भारताच्या पहिल्या राष्ट्रपती

★ आत्तापर्यंतच्या सर्वात कमी वयाच्या राष्ट्रपती

★ तत्पूर्वी २०१५ ते २०२१ या कालावधीत झारखंडच्या राज्यपाल म्हणून कार्यरत

★ पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या झारखंडच्या पहिल्या राज्यपाल

★ २००७ मध्ये ओडिशा विधानसभेतर्फे 'सर्वोत्कृष्ट आमदार' म्हणून नीलकंठ पुरस्काराने सन्मानित

★ भुवनेश्वरच्या रमादेवी महिला विद्यापीठातून १९७९ साली कला शाखेतील पदवी प्राप्त

★ राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी लिपिक, नंतर कनिष्ठ सहाय्यक आणि नंतरच्या काळात शिक्षिका म्हणून कार्यरत




# वोलोडिमिर झेलेन्स्की

★ २०१९ पासून युक्रेन देशाचे राष्ट्राध्यक्ष

★ २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनवर हल्ला चढवून रशियाने सुरू केलेल्या युद्धात ठाम भूमिका घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा

★ रशियन सेनेने काबीज केलेल्या काही शहरांवर पुन्हा ताबा मिळवण्यात यश

★ अमेरिकेच्या प्रतिष्ठित टाईम मासिकाकडून 'पर्सन ऑफ द ईअर २०२२' म्हणून निवड

★ क्रिवी रिह इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्समधून कायद्याची पदवी प्राप्त

★ राजकारणात येण्याआधी स्टॅंडअप कॉमेडियन म्हणून प्रसिद्ध

★ २०१५ ते १९ या काळात लोकप्रिय ठरलेल्या Servant of the People या टिव्ही शोमध्ये राष्ट्रपतीची भूमिका




# विवेक अग्निहोत्री


- ★ राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट दिग्दर्शक, लेखक, पटकथा लेखक आणि निर्माते
- ★ 'द कश्मीर फाईल्स' ह्या काश्मिरी पंडितांच्या नरसंहाराचे चित्रण दाखवणाऱ्या चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक
- ★ २०१९ साली प्रदर्शित 'ताश्कंद फाइल्स' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पटकथा-संवादांचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त
- ★ २०१९पर्यंत भारताच्या सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनच्या बोर्डाचे सदस्य तसेच इंडियन काउन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्समध्ये भारतीय सिनेमाचे सांस्कृतिक प्रतिनिधी
- ★ जाहिरात एजन्सींमधून कारकिर्दीची सुरुवात,काही दूरचित्रवाणीमालिकांची निर्मिती आणि दिग्दर्शन

**प्रज्ञा काणे**
९८६९५ ४७५७७

# सिनेमा पोस्टर्स




नवकेतन - गाईड (१९६५)
देव आनंद
पेंटर - डी. आर .भोसले



**अरुण पुराणिक**

प्रसिद्ध चित्रकार एम. व्ही . धुरंधर हे भारतातील पहिले पोस्टर कलाकार मानले जातात. 'पंढरपूरची यात्रा' या नावाने धुरंधर यांनी १९१३  मध्ये रेल्वेची पोस्टर्स रंगविली होती.

याच दरम्यान हिंदुस्थानात एका नाविन्यपूर्ण अनोख्या कलेचा जन्म झाला. सिनेमाच्या मोठ्या पडद्यावर हलत्या चित्रांनी कथा सांगण्याची कला व तंत्र विकसित होऊन मूकपटांची निर्मिती होऊ लागली. या कलेचे पहिले भारतीय प्रणेते होते कै. धुंडीराज गोविंद फाळके उर्फ दादासाहेब फाळके! १९२० पर्यंत वृत्तपत्रातून, नियतकालिकांमधून जाहिराती देऊन, जनतेमध्ये पत्रके वाटून मूकपटांची प्रसिद्धी, प्रचार करण्यात येत असे.

ह. ना. आपटे यांच्या कादंबरीवरून बाबुराव पेंटर यांनी १९२३ मध्ये 'सिंहगड' या मूकपटाची निर्मिती केली . बाबुरावांना कलेची नैसर्गिक देणगी होती. त्यांचे खरे नाव होते बाबुराव मेस्त्री ! लाकूड काम, मूर्तीकला आणि चित्रकलेतील त्यांचे असामान्य कौशल्य पाहून कोल्हापुरातील चाहत्यांनी त्यांचे नामकरण 'बाबुराव पेंटर' केले. बाबुरावांनी 'सिंहगड'ची लक्षवेधक पोस्टर्स तयार करून ग्रँटरोडचे नोव्हेल्टी थिएटर असे काही सजविले, नटविले की त्या काळी अर्धी मुंबई खास नोव्हेल्टी थिएटर पहायला तिथे लोटली होती. ती पोस्टर्स नंतर जे. जे. स्कूलच्या कलादालनात लावण्यात आली होती.

मेट्रो सिनेमाच्या सजावटीत द . ग . गोडसे व दादा भडसावळे यांचा सिंहाचा वाटा होता. एल्फिस्टन स्कूलसमोर धोबी तलावला गोडसेंची पोस्टर्स पहायला गर्दी उसळत असे. भडसावळे मेट्रो गोल्डविनची पोस्टर्स रंगवीत. एस. एम . पंडित १९४० मध्ये त्यांचे सहाय्यक होते.




सनलाईट साबू (१९१२)
विष्णू - गरुड -वाहन
पेंटर - राजा रविवर्मा

१९३० ते १९४० या काळांत जी. व्ही. वाटेगावकर, बी.पी. मिश्रा, खिरे, जे. वी. दिक्षित, प एन. के वैद्य, गवंडळकर या सारखे नामवंत पोस्टर पेंटर्स होते. प्रख्यात चित्रकार एम. एफ. हुसेनही उमेदवारीच्या काळात (१९४०-४५) खेतवाडीतल्या जयहिंद स्टुडिओत पोस्टर पेंटींग करत. पोस्टरवरील एका मुंडीला म्हणजे चेहऱ्याला पाच आणे हा त्या काळचा रेट होता. हुसैन तिथे पगारी नोकर असल्याने पोस्टरवर त्यांची स्वाक्षरी नसे.




सोहराब मोदी - झांसी की रानी ( १९५३)
मेहताब, सोहराब मोदी
पेंटर - बी. विश्वनाथ

सिनेमा हे हलत्या चित्रांनी कथा सांगण्याचे तंत्र असल्याने, चित्रकलेचे कसब असलेल्या बाबूराव पेंटर, व्ही. शांताराम दामले, फत्तेलाल, भालजी पेंढारकर, सोहराब मोदी या सारख्या निर्मात्यांना ध्वनीपेक्षा चित्रातूनच प्रसंग पटविण्याचे महत्व उत्तम कळले होते. एस. फत्तेलालनी प्रभातच्या बोधचिन्हाची (तुतारी फुंकणारी कमनीय युवती) निर्मिती केली होती. जे. वी. दिक्षित, अण्णा काळे तिथे स्टुडिओत पोस्टर्स व बॅनर्स बनवत तर कुळकर्णी व साळुंखे शो कार्डस व पोस्टरवर सुलेखन करीत. कुंकू सिनेमातील शांता आपटेचा फणी




फिल्मीस्तान - चंपाकळी (१९५७)
सुचित्रा सेन, भारत भूषण
पेंटर - राजकुमार शर्मा

करंड्याच्या पेटीसमोर बसून कुंकू लावत बसलेल्या पोजमधील कलात्मक फोटो घराघरातून दिसत होता. विविध राज्यात प्रदर्शित होणाऱ्या प्रभातच्या भालजींच्या मराठी चित्रपटांनाही भाषेची अडचण कधीच जाणवत नसे. चित्रकलेत मुरलेल्या दिग्दर्शकाच्या डोक्यात दृष्यरुपाने पटकथा निर्माण होत असते.

चित्रपटांच्या सुरवातीच्या काळात मिडिया हा प्रकार नव्हता. चित्रपट प्रदर्शित होण्याआधी मायबाप प्रेक्षकांना त्याची कथा कल्पना सांगणार कशी ? त्यातून त्या काळात भारतातील ३० टक्के लोक अशिक्षित निरक्षर




एम . सादिक - सैया (१९५१)
मधुबाला , सज्जन
पेंटर - एस . एम . पंडित

होते . ते सिनेमाचे पोस्टर फोटो पाहूनच आपले आगामी सिनेमाविषयी मत बनवित. या गरजेतूनच पोस्टर कलेचा एका नवीन शैलीच्या चित्रकला तंत्राचा उगम झाला. या कलेमध्ये भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील संस्कृतींचा सुंदर मिलाफ पहायला मिळतो.

कलात्मक पोस्टर पहाता क्षणीच त्या सिनेमाविषयी उत्सुकता निर्माण करून कमीत कमी शब्दात एक संदेश देणे ओन्ली विमल' बस! त्यावरील बोधचिन्ह (लोगो) निर्मिती संस्थेची आठवण करून देते. हे आकर्षक बोधचिन्ह या कंपनीच्या प्रतिष्ठेला साजेसे असे. महाराष्ट्र फिल्मस, प्रभात, न्यू थिएटर्स, फिल्मीस्तान, मिनर्व्हा , मेहबूब, रणजीत, प्रकाश, वाडिया, राजकमल, आरके, बीआर फिल्म्स आदी संस्था कसबी चित्रकारांना नोकरीवर ठेवून स्टुडिओतच उत्कंठावर्धक पोस्टर्स तयार करून घेत. ही चित्रकार मंडळी सौंदर्य कथनी होती. त्यांच्या चित्रातील नट्यांचे दर्शन मनाला गुदगुल्या करत असे. पण त्यांच्या चित्रांमध्ये सौंदर्याच्या नावाखाली अश्लीलता दडलेली नसे. यामुळे लौकिक, आर्थिक यशाबरोबरच या संस्थांची प्रतिष्ठाही वाटचाल करीत राहिली.

परदेशात पोस्टर पेंटिंग ही कला मानली जाते. पोस्टर्स सन्मानाने शोकेस (फ्रेम) मध्ये लावली जातात. आपल्याकडे अपुऱ्या, अंधा-या गलिच्छ जागेतही गुणी कलाकार पहाता क्षणीच थक्क करणारी पोस्टर्स रंगविताना दिसतात. ते तयार करताना निर्मात्याचा माईंडसेट (मनोवृत्ती) महत्वाचा असतो. पोस्टरने लाल रंग डालो, पिक्चर हिट' असे सांगितले जाते, काहीना झगमगीतपणा लागतो. इथे पोस्टरमध्ये काळा रंग अशुभं समजला जातो . कलाकारांची लोकप्रियता फार महत्वाची असते. जोधा अकबरच्या पोस्टरवर फक्त दोनच व्यक्तीरेखा ऐश्वर्या, ऋतिक आणि सेट होता. दुष्ट खलनायक असूनही गब्बरसिंग शोलेच्या पोस्टरवर झळकला. स्टंट चित्रपटात साहसी प्रसंग, भयपटात भयावह चित्रे असतात. संगीत प्रधान चित्रपटांच्या पोस्टरवर त्यातील गाण्यांचे शब्दही दिलेले असतात.

दीवाकर करकरे यांनी अमिताभच्या राकट, रगेल भूमिकेला साजेसे 'दीवारचे' पोस्टर बनविले. चेहऱ्यावर ओबडधोबडपणा आणला, ओरखडे दाखविले,त्यामुळे अमिताभची 'अँग्री यंग मॅन' प्रतिमा निर्माण झाली. ही चित्रकर्त्याची कमाल होती.

भारतात पोस्टर्स ही गलिच्छ भिंतींवर पत्र्यावर, छपरावर,गटारांच्या दारावर,जिथे मोकळी जागा मिळेल तिथे ओंगळवाण्या प्रकारे चिकटवली जातात. वितरकांकडे शिल्लक राहिलेली व्हिनाईलची पोस्टर्स पावसाळ्यात चक्क झोपडया झाकण्यासाठी वापरली जातात. दादरला कोहीनूर मिलच्या भिंतींवर तर एकाच चित्रपटाची वीस वीस पोस्टर्स लागत. असा प्रकार परदेशात नाही. तिथे पोस्टर आर्टला, पोस्टर पेंटर्सना इज्जत आहे, प्रतिष्ठा आहे.

दक्षिणेतील पेंटर्स ॲक्शन आणि नृत्यगीतावर भर देत. उत्तान, कामुक आणि भडक पोस्टर्ससाठी तेथील चित्रकार प्रसिद्ध आहेत.




अलंकार चित्र - बारिश (१९५७)
नूतन
पेंटर - वसंत गोविंद परचुरे.

तीस वर्षापूर्वी रेहाना सुल्तानाच्या चेतना आणि राधा . नामवंत चित्रकारांच्या अशा या पहिल्या दुर्मिळ पोस्टरला मोठी किंमत मिळते. मूळ पोस्टरवर जास्तीत जास्त चार प्रतिमा असतात. काही मल्टीकास्ट चित्रपट याला अपवाद आहेत. मूळ पोस्टर वरील काही प्रतिमा निवडून त्यावरून सेकंडरनसाठी रि-रिलीज (पुनर्प्रदर्शित) पोस्टर्स तयार करण्यात येतात. तोच सिनेमा परत सेकंडरनला अथवा मॅटिनीला प्रदर्शित होतो तेव्हाही रि-रिलीज पोस्टर्स लावण्यात येतात.


हॅन्डपेंटेड पोस्टर्स ही झगमगीत, आकर्षक लिओग्राफीक अथवा ऑफसेट प्रिंट्स असतात. ती लहान मोठ्या आकारात शीट्समध्ये छापली जातात. सर्वसाधारण पोस्टर हे सहा सिंगल शीट साईजचे असते. 'कागज के फूल' 'मुगल ए आजम' साठी २४ शिटस साईजचे पोस्टर बनवण्यात आले होते. पोस्टर साठी खूप हलक्या प्रतीचा पातळ कागद वापरला जात असल्याने घडी घालताना ती




राजकमल - दो आँखें बारह हाथ (१९५७)
संध्या
पेंटर - गोपाळ कांबळे.

फाटून जात. ऊन, पाऊस ,वाऱ्याने ती खराब होत. कालमानाने त्यांचे आयुष्य लवकर संपत जुन्या आर्ट स्टुडिओजचाही मागमूस कुठे दिसत नाही. पोस्टर कलाकारांकडे त्यांच्या चित्रकृती नाहीत. त्यांच्या पुढच्या पिढ्यांना या धंद्यात रस उरलेला नाही. ऑल्फ्रेड टॉकीजच्या रहमान सारखे हाताच्या बोटावर मोजण्यासारखे गुणी कलाकार आज शिल्लक आहेत.

तीस फूट उंचीच्या बांबूच्या परातीवर उभे राहून स्वतःचा जीव धोक्यात घालून एकाग्र चित्ताने पोस्टर, बॅनर रंगविणे अतिशय कष्टाचे व कौशल्याचे काम असे. संगणकाच्या




श्याम सुंदर अगरवाल -
दिलेर जिगर (१९३१)
(GALLANT HEART )
पेंटर - खिरे.

मदतीशिवाय दहा फूट व्यासाचा माणसाचा डोळा रंगविणाऱ्या दादरच्या समर्थ गुरुजींना पहायला खास परदेशाहून चित्रकार येत होते. लंडनमध्ये त्यांनी याचे जाहीर कार्यक्रम करून दाखविले आहेत.

आजकाल केश - वेष - रंगभूषा करणाऱ्या कलावंताचाही चित्रपट उद्योगात सन्मान केला जातो. त्यांना पारितोषिके दिली जातात. पण या पोस्टर कलाकारांना पूर्वीही कुणी वाली नव्हता आणि आताही कोणी नाही. बाबुराव पेंटर, विश्वनाथ भिडे, डी. आर . भोसले, एस. एम. पंडित, गोपाळ कांबळे, वसंत परचुरे, कबे, दिवाकर करकरे, रामकुमार शर्मा यासारख्या नामवंत चित्रकर्त्यांनी जोपासलेली, संवर्धित केलेली गेल्या शतकातील ही अभिजात हिंदुस्थानी कला आता काळाच्या उदरात गडप होण्याच्या मार्गावर आहे. सुदैवाने या कलेचे काही अवशेष आजही राष्ट्रीय फिल्म संग्रहालय- पुणे, मुंबईचा चोर बाजार आणि काही खाजगी संग्रहकांनी जपून ठेवले आहेत. पण शेवटी तो हलक्या प्रतीचा कागद आहे.




मेहबूब - आन (१९५२)
दिलीप कुमार, नादिरा
पेंटर - वि. विश्वनाथ.

आपल्याकडे जुने दस्तऐवज जतन करण्याचे पाश्चात्त्यांसारखे तंत्र अजून विकसित झालेले





बी आर फिल्म - नया दौर (१९५७)
दिलीप कुमार, वैजयंतीमाला
पेंटर - डी . आर.भोसले.

**अरुण पुराणिक**

30 वर्षापासून मुक्त पत्रकार, सारेगम, अनसंग, हिरोज, हरवलेली मुंबई, हमारी याद आयेगी अशी पुस्तके प्रसिद्ध.
arun.puranik@gmail.com
९३२२२ १८६५३

# गजल कशी ऐकावी?




गजल म्हणजे, एकाच वृत्तातील स्वरसाम्यता युक्त काफिया (पूर्वयमक) व एकच एक रदीफ (अंत्ययमक) असलेल्या प्रत्येकी दोन-दोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची (शेरांची) बांधणी म्हणजे गजल.



**सदानंद डबीर**

गजल कशी ऐकावी ?ह्यातच गजल कशी वाचावी ? हेही अध्याह्रत आहे. थोडक्यात गजल कशी आस्वादावी, ह्यावर बोलणार आहे. गजल कशी लिहावी ह्यावर नाही, ते खूप तांत्रिक होईल.

शास्त्रीय गायनाच्या किंवा वादनाच्या मैफिलीत सामान्य श्रोताही आनंद घेऊ शकतो.राग/ताल ह्यांची माहिती नसली तरी, त्याच्या तोंडूनही काही ठिकाणी आपोआपच 'वाह!' अशी दाद येते. मात्र श्रोत्याला सूर, राग, ताल ह्यांची जुजबी का होईना माहिती असली तर तो अधिक मर्मज्ञपणे आनंद लुटतो. जाणकाराने दिलेली दाद कलाकारालाही सुखावते. कुठल्याही कलाप्रकाराचा डोळस आणि रसिकतापूर्ण (विद्वज्जड नव्हे!) आस्वाद घेण्यासाठी त्या कलाप्रकाराची थोडीतरी जाण आवश्यक असते.

गजल अरेबिक, फारसी, उर्दू असा प्रवास करत मराठी व इतर भाषांत आली. त्या भाषांमध्ये 'गजल लिहिली/गजल वाचली' असा शब्दप्रयोगच नाही. 'गजल कही/गजल सुनी' असेच म्हटले जाते. गजल ही 'सांगितली / ऐकली / गायली' जायची. अर्थात तेव्हाही 'दीवान' म्हणजे गजल संग्रह निघायचे...पण श्रवण संस्कारच महत्वाचा. **म्हणून गजल कशी ऐकावी असं म्हटलं.**

गजल गायन हा तसा उपशास्त्रीय गायन प्रकार आहे. मराठी मंडळींनी बेगम अख्तर, मेहदी हसन गुलाम अली, जगजितसिंग अशा गायकांनी गायलेल्या गजला ऐकलेल्या असतात. त्यांना भावलेल्याही असतात.कधी कधी, शब्दार्थ किंवा खयाल नीटसा कळला नाही तरी दाद देत असतात. कधी गजल गायन मैफिलीला किंवा गजलमुशाय-याला (कवी संमेलन) गेल्यावर जाणकार श्रोते, जेव्हा **इर्शाद/मुकर्रर/क्या काफिया निभाया है** असे शब्द प्रयोग करतात तेव्हा सामान्य श्रोता बावचळतो. आपल्याला कळत नाहीय असा न्यूनगंड त्याला येऊ शकतो.

तर गजलचा रसास्वाद घेता यावा, ह्यासाठी गजल ह्या काव्यप्रकाराची काही आवश्यक माहिती आपण बघू.

गजल बद्दल सुरेश भट म्हणतात, **गजलचा प्रत्येक शेर(द्विपदी) म्हणजे,दोन ओळींची एक स्वतंत्र, संपूर्ण, सार्वभौम, स्वायत्त कविता असते. आधीच्या किंवा नंतरच्या ओळींचा संदर्भ नसला तरी, शेराचा आस्वाद घेता येतो.** तर **गजल म्हणजे, एकाच वृत्तातील स्वरसाम्यता युक्त काफिया (पूर्वयमक) व एकच एक रदीफ (अंत्ययमक) असलेल्या प्रत्येकी दोन-दोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची (शेरांची) बांधणी म्हणजे गजल.**

हे थोडं क्लिष्ट वाटतंय ह्याची मला कल्पना आहे.पण तसं नाहीय. एका उदाहरणाने हे स्पष्ट होईल. मी माझ्या एका गजलचे तीन शेर सांगतो,आणि उदाहरणाने ह्या संज्ञा स्पष्ट करतो.

**फुलांनी दृष्ट काढावी, असा तो चेहरा आहे**
**कळ्यांची नजर लागावी, असा तो चेहरा आहे!**

**गव्हाळी गौर रंगाला, नव्हाळी सोनचाफ्याची**
**सणाला गौर मांडावी, असा तो चेहरा आहे!**

**फुलांच्या पाकळ्या ओल्या, असे ते ओठ नाजुकसे**

**गुलाबाला नशा यावी, असा तो चेहरा आहे!**

पहिली गोष्ट ही, की या सर्व ओळी एकाच वृत्तात आहेत. त्या वृत्ताचे नाव **वियतगंगा** आहे. ते माहिती असण्याची आवश्यकता नाही.जे काही वृत्त असेल निर्दोष व न बदलता वापरायचे हा नियम.

ह्यातला जो पहिला शेर आहे, त्याला **मतला** म्हणतात.

पहिल्या शेराच्या दोन्ही ओळींच्या शेवटी **असा तो चेहरा आहे** हे शब्द जसेच्या तसे येतात. **ह्या शब्दांना रदीफ म्हणतात** हा शब्दसमूह (रदीफ) मतल्याच्या दोन्ही ओळीत आला आहे. तर पुढील शेरांच्या फक्त दुस-या ओळीच्या शेवटी, जसाच्या तसा आला आहे.

ह्या रदीफच्या आधी, मतल्यात, **काढावी / लागावी** असे शब्द आहेत.ह्या शब्दांना काफिया

म्हणतात.

इथे काफिया मध्ये **वी** हे अक्षर समान आहे. तसे आल्यास आधीच्या असमान अक्षराची स्वरसाम्यता बघतात. जसे मतल्यात **काढावी/लागावी** आहे **ढा/गा** ह्या अक्षरात **आ** स्वर समान आहे. ह्या स्वरसाम्यतेला **अलामत** म्हणतात. यमक आणि काफिया ह्यात हाच फरक आहे.

**आले / गेले** हे योग्य यमक आहे. पण काफिया चूक आहे. कारण **ले** ह्या समान अक्षराआधीच्या अक्षराचा स्वर (**अलामत**) चुकलाय. तो **आ** आणि **ए** असा आहे. म्हणून आले / गेले हा काफिया होत नाही. **आले / झाले / भाले / न्हाले** असेच काफिया होतील.

मात्र काफियाचे शेवटचे अक्षर असमान असेल तर त्याचा स्वर समान असल्यास ती स्वरसाम्यताच काफिया होऊ शकतो. म्हणून **दिया / हवा** हा काफिया गजलेत येऊ शकतो. असे यमक आपण मराठी गीतात ग्राह्य धरत नाही. म्हणूनच,

हंगामा है क्यों बर्पा, थोडीसी जो पी **ली है**
डाका तो नहीं डाला, चोरी तो नहीं **की है**

इथे **ली** आणि **की** चा **ई स्वर** काफिया आहे व तो योग्य आहे. है हा रदीफ आहे.

**गजलचा पहिला शेर -मतला.**

गजलचा पहिला शेर म्हणजेच मतला कवीकडून किंवा गजलगायका कडून ऐकला की श्रोत्याला त्या गजलचा छंद (उर्दूत **बहर** म्हणतात) काय आहे, ह्याचा अंदाज येतो,भले छंदाचे नाव कळले नाही तरी अडत नाही.रदीफ असल्यास काय आहे, हे कळते. (असल्यास, म्हटले कारण रदीफ नसलेली गजल असू शकते.) तसेच काफिया काय आहे,अलामत काय आहे हेही कळते.

**गजलची जमीन**

बहर (छंद), रदीफ, काफिया, अलामत ह्या चार घटकांना गजलची जमीन म्हणतात. म्हणजे हे घटक पुढील सगळ्या शेरात सांभाळणे कवीला सक्तीचे आहे. कवीने स्वतःहून ही चौकट निवडलीय. आता तो, ही **जमीन** सोडून जाऊ शकत नाही! हा जणू जमीनीचा प्लॉट आहे गजलची काय जी इमारत किंवा महाल उभारायचा आहे, तो ह्याच प्लॉटवर उभारायचे बंधन कवीवर आहे.

**गजल कशी ऐकावी?**

गजलचे हे घटक कळल्यानंतर आपण गजल कशी ऐकावी ह्या शीर्षकाकडे वळू या. वर दिलेले तीन शेर बघू.मतला आहे,

फुलांनी दृष्ट काढावी असा तो चेहरा आहे
कळ्यांची नजर लागावी, असा तो चेहरा आहे!

हे ऐकताच कळले की, वृत्त काय आहे.इथे नाव माहित असण्याची गरज नाही. पण इतकं लक्षात येतं की, साने गुरुजींची कविता **खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे** अशीच आहे. ह्याच मीटर मध्ये आहे, परिचित आहे.

**असा तो चेहरा आहे** हा रदीफ आहे.

**काढावी / लागावी** काफिये आहेत. आ स्वर अलामत आहे. म्हणजे काढावी / लागावी / बोलावी / सांगावी / फुलवावी....इ.इ. काफियेच येऊ शकतील. फुलवी / जेवी / तेवी...किंवा रंगी असे चालणार नाहीत.

हे कळलं की रसिकाला जमीन कळली, तो गजल ऐकायला सिद्ध झाला. मतला ठसावा, ऐकताना समोर शब्द नसतात, त्यामुळे श्रोत्याला जमीन परिचित व्हावी म्हणून दोनदा तीनदा गायला जातो.

**शेराचा उत्कट शेवट, किंवा विस्मय किंवा चकवा**

मतला म्हणून झाला, आता गायक पुढला शेर गातोय. शेर गाताना शेराच्या दुसऱ्या ओळीला श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद 'वाहवा, क्या बात है' अशी अक्षरशः उसळते. श्रोता आनंद विभोर होतो, तो का हे बघू. उदाहरणातला दुसरा शेर घेऊ.

गव्हाळी गौर रंगाला नव्हाळी सोनचाफ्याची

ही ओळ गायक दोनतीनदा आळवून म्हणेल. श्रोत्याला कळेल की शायर **तिचे** वर्णन करतोय, ती गव्हाळी गौर वर्णाची आहे,तरूण आहे, कारण चेहऱ्यावर सोनचाफ्याच्या रंगाची नव्हाळी आहे, इथे गव्हाळी / नव्हाळी हा अनुप्रास सौंदर्य वृद्धी करतोय. ही ओळ दोन तीनदा ऐकली की श्रोता अंदाज बांधू लागतो की आता शेराची जमीन सांभाळून शायर काय वेगळं सांगणार? काही काफियांचा तो अंदाज बांधू लागतो. जर त्याचा अंदाज बरोबर आला तर त्याला आनंद होतोच, पण त्याचा अंदाज चुकवून शायराने वेगळाच काफिया आणला,तर विस्मय निर्माण होऊन रसिकांची उत्स्फूर्त दाद येते.

इथे शेराची दुसरी ओळ आहे

सणाला गौर मांडावी असा तो चेहरा आहे!

त्यापैकी असा तो चेहरा आहे हा रदीफ जसाच्या तसा येणारच, हे जाणकार रसिकाला माहिती आहे. त्याच्या आधी शायराकडे अर्धी ओळच आहे.जिथे त्याला शेर सिद्ध करायचा आहे आणि दादही घ्यायची आहे! एकेक शब्द जपून, नेमका आला पाहिजे फापटपसाऱ्याला जागाच नाही. शायराची प्रतिभा आणि कसब पणाला लागले आहे. **सणाला गौर मांडावी** येते आणि चमत्कार घडतो, व **असा तो चेहरा आहे** ही अर्धी ओळ / रदीफ श्रोते स्वतःच म्हणतात! उत्स्फूर्त दाद येते.

पहिल्या ओळीत ती गव्हाळ गोरी आहे तरूण आहे, नव्हाळी आहे कळले, पण तिच्या चेहऱ्यावरचे सौंदर्याचे तेज कसे आहे? तर सणाला गौरीच्या मुखवट्यावर असावे तसे! हे अनपेक्षित आहेच आणि केवळ तीन शब्दांत सांगितले आहे.

**सणाला गौर मांडावी** इतकेच शब्द.

गजलतंत्राची जुजबी माहिती नसेल तर हे ॲप्रिशिएट करता येणार नाही, आणि मग इतर श्रोते इतके वेडे होऊन दाद का देताहेत हेही कळणार नाही!.

**वाचकांसाठी स्वाध्याय!**

आता पुढचा शेर....

**फुलांच्या पाकळ्या ओल्या, असे ते ओठ नाजुकसे**

ही शेराची पहिली ओळ दोनतीनदा वाचा. तिचे सौंदर्य बघा, फुलांच्या ओलसर पाकळ्यांसारखे तिचे ओठ आहेत. खरं तर **पंखुडी गुलाबकीसी है** ही मीरची उर्दू गजल गाजलेली आहेच. जाणकार रसिकांना माहिती आहे. ह्यात नाविन्य नाहीय. त्यांना उत्सुकता ही आहे की आता दुसऱ्या ओळीत शायर काय व कशी कलाटणी देतोय. कसा विस्मय निर्माण करतोय?

तुम्हीही विचार करा, असा तो चेहरा आहे हा रदीफ यायलाच हवा. तीन शब्द वापरून दुसरी ओळ, तुम्ही मनातच जोडून बघा.वर दिलीय ती दुसरी ओळ, बघू किंवा स्मरू नका.

मग दुसरी ओळ वाचा

**गुलाबाला नशा यावी, असा तो चेहरा आहे**
सोनेपे सुहागा! जणू काही तिचे ओल्या पाकळ्यांसारखे ओठ असे आहेत की गुलाबालाच नशा यावी!

मग, दुसरी ओळ वाचा बहुतेक करून शायराने तुम्हाला चकवले असेल....पण हा अपेक्षाभंग सुद्धा खूप सुंदर, कलात्मक असेल तर तुमची दाद तुमच्याही नकळत गेली असेल.

आता काही जुजबी संज्ञा गजल गायन किंवा मुशायरा ऐकताना---**गजल के चंद अशआर** म्हणजे गजलचे काही शेर. अशआर हे शेरचे अनेकवचन. **पेशे खिदमत** असे कवी / गायक म्हणतात म्हणजे श्रोत्यांच्या सेवेत सादर करतोय. अनुज्ञा असावी. **इर्शाद** कवीने पेशे खिदमत, म्हटल्यावर श्रोते इर्शाद म्हणतात. म्हणजे अनुमती देतात. **मुकर्रर** एखादा शेर आवडला की मुकर्रर म्हणतात, म्हणजे वन्स मोअर आणि कवी, गायक आनंदाने तो शेर पुन्हा गातात. शेराच्या ओळीला **मिसरा** म्हणतात. उला मिसरा म्हणजे पहिली ओळ, सानी मिसरा=दुसरी ओळ.

बस्स हे शब्द  मैफिल ऐकताना योग्य ठिकाणी म्हणा टाका.... बघा, अन्य श्रोत्यांच्या आणि कवी / गायकाच्या नजरेत तुम्ही मैफिलीचे मानिंद (व्ही.आय.पी.) बनून जाल.

मात्र सावध! चुकीच्या ठिकाणी चुकीचा शब्द वापरू नका, तुमचे पितळ उघडे पडेल!


**सदानंद डबीर**

ज्येष्ठ कवी,गीतकार व सुप्रसिद्ध गजलकार.
अनेक गीत,गजला दिग्गज संगीतकारांनी स्वरबद्ध केल्या असून अनेक नामवंत गायक,गायिकांनी गायल्या आहेत.आठ गजल-काव्य संग्रह प्रकाशित.चित्रपट व संगीत नाटकांसाठी गीतलेखन.
९८१९९७८४२०


# संवाद

सडा टाकता टाकता
विचारते रखुमाई ,
'नाथ नाही राऊळात
कुठे गेला सांग बाई ?'

'लग्न लावून माझ्याशी
गेला जनीच्या घरला'
खाली पाहून जराशी
बोलली ती रुक्मिणीला

शेला देवाचा पाहून
रुक्मिणीने प्रश्न केला
सांग ना ग तुळशीबाई'
शेला तुला कोणी दिला ?

लोकनाथ पती तुझा
नाही दोघींचाही झाला
कान्होपात्रा भेटताच
शेला इथं विसरला'

'तुझे माझे दु:ख एक
कसे कळावे जणाला
धूप कापुराच्या संगं
संसार कर्पुनी गेला ?'

'भक्तांची तू झाली माय
तुझी जागा राउळात
लग्न करून देवाशी
मी गं सदा अंगणात'

किती भांडले रुसले
खोड त्याची गेली नाही
राउळाच्या पिंजऱ्यात
जीव व्याकुळला सई'

संवाद पडता कानी
देव बोलले हसून
ऋण फेडण्या भक्तांचे
जावे लागते धाऊन

नका खेचाखेच करू
तुम्ही दोघी प्रिय मला
राउळात प्राण माझा
मंजिरीचा हार गळा


**लता गुठे**
९८७०६ १७१२४


# घर

घर मातीच्या भिंतींचे,
घर कौलारू छताचे,
वर डौलदार माडी,
घर दगडी जोताचे.

स्वैंपाकघर, माझघर,
देवघर देवाजीला,
ओटी पै-पाहुण्यांची,
झुला झुले पडवीला.

घरा मागे एक गोठा,
झाडे माडे परसात,
गोड पाण्याची विहिर,
चाले रहाट मजेत.


माझ्या घराच्या या भिंती,
अशा रुंदावत जाती,
आजुबाजुच्या घराना,
देती किती नाती गोती.

काळ कसा किती गेला,
बालपण ही सरले,
माझे धकलेले घर,
माती मोलाचे उरले.

झाली जमीन सोन्याची,
भाव गगनाला गेला,
मन कावरे बावरे,
सौदा घराचा मी केला.

घर पाडले मोडले,
मागे राहिले ना काही,
बंद पापणीला माझ्या,
आसवांचा भार होइ.


**चारुलता काळे**
९८२१८ ०६८२७




# पार्लेकर आणि दिवाळी अंक

१९०९ साली मनोरंजन मासिकाचा पहिला दिवाळी अंक प्रकाशित झाला. त्याचे संपादक होते का. र. मित्र. यंदा मौज दिवाळी अंकाने शंभरी गाठली. दसरा झाल्यानंतर दिवाळी अंकांच्या येण्याचे वेध लागतात. पण दिवाळी अंकांच्या लिखाणासाठी सात आठ महिने आधीच संपादकांकडून साहित्याची जुळवाजुळव सुरु होते.

यंदा दिवाळी अंकांसाठी पार्ल्यातल्या आणि पार्ल्याचे शेजारी असणाऱ्या साहित्यिकांच्या साहित्याचा जितका जमेल तितका आढावा घेण्यात आला. निरीक्षणाअंती असं दिसून आलं की पार्ले आणि आसपास अनेक साहित्यिक आपल्या सारख्या वाचकांना वाचन फराळ देत आहेत.

यंदाच्या म्हणजे २०२२ च्या दिवाळी अंकात आलेल्या साहित्याचा थोडक्यात आढावा ...

लता गुठे यांनी एकूण पाच दिवाळी अंकांमधून लिखाण केले आहे. 'हेमांगी' या अंकात जुन्या काळातील स्त्रियांची सामाजिक परिस्थिती दर्शवणारी 'एकनाथांची स्त्री-जाणिवांची भारुडे' या लेखातून मांडली आहे. मुक्त आनंदघन संत सोयराबाईच्या अभंगावर आधारित 'मी चोख्याची महारी' हा समीक्षात्मक लेख प्रकाशित झाला आहे. 'एक्ज फ्रोजिंग'ही विज्ञान कथा कलामंचच्या अंकातून प्रसिद्ध झाली आहे. कोमसापच्या 'झपूर्झा' या अंकात पत्नीवर नित्तांत प्रेम करणाऱ्या एका सृजनशील माणसाला उध्वस्त करणारी कथा वाचकाला विचार करायला लावणारी कथा आपल्याला वाचायला मिळेल. इंदौरच्या 'सर्वोत्तम' या दिवाळी अंकात 'वैचारिक परिवर्तन यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली' या शीर्षकाखाली वैचारिक लेख प्रकाशित झाला आहे.

सदानंद डबीर हे खरे तर गजलकार. शब्दरुची, दीपावली, साहित्य, दर्याचा राजा या अंकात त्यांच्या गजला प्रकाशित झाल्या आहेत. डबीर फारसे गद्य लेखन करत नसले तरी दर्याचा राजा या अंकात कुसुमाग्रजांपासून अनेक कवींनी राजकारणावर कोरडे ओढणाऱ्या कविता कशा लिहिल्या आहेत ह्याचा संक्षिप्त आढावा 'धनुष्य तू घे..बाण मला दे' या शीर्षकांतर्गत लेख लिहिला आहे.

दीपा मंडलिक यांनी नवल, धनंजय, जत्रा, हेमांगी, आश्लेषा आणि ताऱ्यांचे जग अशा एकूण सहा दिवाळी अंकांमधून लेखन केले आहे. नवलमधील 'कलेचा उत्सव - विजयविठ्ठल मंदिर' आणि आश्लेषा अंकातील 'इतिहासाचे साक्षीदार- विरुपाक्ष मंदिर, हंपी' या लेखातून या दोन मंदिरांची सर्वांगाने माहिती वाचकांना मिळू शकेल. हेमांगी या अंकात 'निर्मितीपासून मोक्षापर्यंतचा प्रवास - नटराज शिव' या लेखातून नटराज शिवशिल्पाला जोडलेले अनेक पदर समजून घेता येतील. ताऱ्यांचे जग मध्ये 'प्राचीन मंदिरे - एक सांस्कृतिक वारसा' हा लेख वाचायला मिळेल. धनंजय आणि जत्रा या अंकात विज्ञान काल्पनिक 'झिरो - टू - नेचर' आणि 'मुंगीची वाट आणि कात्रजचा घाट' या कथा प्रकाशित झाल्या आहेत.

मुकुंद सराफ हे गेली दहा वर्ष अंकातून लिखाण करत आहेत. 'मुक्त आनंदघन' या अंकात मुक्ताबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई अशा स्त्री संतांच्या रचनांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. ताऱ्यांचे जग या अंकात सुप्रसिद्ध वृत्त निवेदक श्री. प्रदीप भिडे यांच्या आठवणींना उजाळा द्यायचा प्रयत्न केला आहे. मैत्री या विषयावर असलेल्या 'जाणीव' या अंकात एका मित्राविषयी सत्यकथेवर आधारित असलेली साक्षीदार या नावाची कथा प्रकाशित झाली आहे. 'धमाल मस्ती' या खास बाल मित्रांसाठी असलेल्या दिवाळी अंकात आपल्या बालपणीच्या खास दिवाळीच्या वेळच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

शर्मिला फडके यांनी एकूण सहा दिवाळी अंकात वेगवेगळ्या विषयावर लेखन केले आहे. 'मौज' या अंकात 'शाबिस्तान' आणि 'मैत्र' मध्ये 'द रेड स्टुडिओ' या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत तर लोकमत दीपोत्सव या अंकात फ़ाळणी नंतरची तिसरी पिढी आपल्या आजी-आजोबांच्या मनातल्या फ़ाळणीच्या जखमांवर फुंकर मारण्यात यशस्वी होत आहे पण ती नेमकी कशी ? यावर प्रदीर्घ लेख आला आहे. वारसः दत्तात्रय आणि देवदत्त पाडेकर या चित्रकार पितापुत्रांशी कलेचा वारसा संदर्भात मारलेल्या गप्पांवर आधारित लेख शब्दरुची ग्रंथाली मध्ये प्रकाशित झाला आहे. ऋतुरंग




**मंजिरी वैद्य**

दिवाळी अंकात बंगलोरच्या मिंजल मखिजा या चित्रकार तरुणीने गुलझारजींच्या कवितांवर आधारित काढलेल्या चित्रांच्या संदर्भात तिच्या मनोगताचे शब्दांकन केले आहे. सृजन संवाद अंकात चित्रकलेचे प्रवासी हा लेख प्रसिद्ध झाला आहे.

सविता दामले या अनुवाद लेखनात व्यग्र असल्या तरी यंदा त्यांनी ऋतुरंग आणि अक्षरगंध या दिवाळी अंकातून लिखाण केले आहे. ऋतुरंग या अंकात 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा' या मुलाखतवजा लेखात वैदू समाजाची दुर्गा गुडिलु हिचा तिच्याच समाजातील अनिष्ट रूढींविरोधात सुरु असलेला लढा या विषयी तिने मोकळेपणाने मत मांडले आहे. अक्षरगंध या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या प्रथम पत्नी रमाबाई आंबेडकर यांच्या सहजीवनाविषयी लेख प्रकाशित झाला आहे.

आशुतोष उकिडवे यांनी विपुलश्री च्या अंकात 'भग्न-मग्न चिरेबंदीची स्वच्छंदी नायिका – निर्मला देशपांडे.' असे शीर्षक असलेल्या लेखात निर्मला देशपांडे यांच्या साहित्याचे मूल्यमापन आणि त्यांच्या वाङ्मयातून साकारलेली जुनी माळव्यातील कायस्थ संस्कृति यांचे विहंगम दर्शन घडवून आणले आहे. अक्षरगंध या अंकात ' मरावे परी मराठीरुपे उरावे." या लेखात मी मराठीसाठी काय केले यापेक्षा मराठी भाषेने माझ्यासाठी काय केले, या सुंदर मातृभाषेमुळे मी कसा घडत गेलो आणि मराठीच्या संवर्धनासाठी काय केले जाणे गरजेचे आहे याचा ऊहापोह चपखल उदहरणातून देऊन केला आहे. ताऱ्यांचे जग या दिवाळी अंकात लिहिताना, पारंपरिक कला व संस्कृतिचा अभ्यासक व जुन्या वस्तूंचा संग्राहक असल्याने उकिडवे यांनी काही टाकावू पण अनवट वस्तूंचे पुनर्वसन केले त्या बद्दलचे अनुभव तसेच फ्रान्समधील वास्तव्यात या संदर्भातील काही रंजक निरीक्षणे सांगणारा 'जीर्णोद्धारातला चैतन्यझरा' याबद्दल आपले मनोगत मांडले आहे.

ख्यातनाम कथा लेखिका माधवी कुंटे यांनी यंदा विपुलश्री, किस्त्रीम, सुवासिनी, श्यामसुंदर, हेमांगी, लीलाई, लोकमत, भरारी, दर्याचा राजा, लोकसंवाद एकूण दहा दिवाळी अंकांतून कथा लेखन केले आहे. या कथांचे वैशिष्ट्य असे आहे की यातल्या कथा या ७० ते ९० च्या दशकात घडणाऱ्या कश्मिरी डोगरी भाषेतल्या अनुवादित कथा आहेत.




मराठी वाचकांना वेगळ्या प्रांतांमधल्या तेथील संस्कृती, परिस्थिती, सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीचं दर्शन घडवणाऱ्या कथा वाचायला नक्की आवडाव्यात अशा आहेत. याशिवाय हेमांगी, लीलाई, लोकमत, दर्याचा राजा या अंकातून वेगवेगळ्या विषयावर कथा लेखन आणि श्यामसुंदर या अंकात विनोदी, खुसखुशीत बाजाची कथा लिहिली आहे.

विजयराज बोधनकर यांनी यंदा मनशक्ती या अंकात ईश्वर, चमत्कार आणि त्याचा भ्रम याविषयी आणि शब्दरुची या अंकात पाश्चिमात्य चित्रकारांविषयी लेख प्रसिद्ध झाला आहे. या अंकातून लेखन केले आहे तसाच ऋतुरंग या अंकासाठी भरपूर व्यक्ती चित्रे रेखाटली आहेत.

अशोक बेंडखळे यांनी यंदा एकूण सहा दिवाळी अंकातून लेखन केले आहे. हेमांगी आणि दीपावली या अंकात कविता प्रकाशित झाल्या आहेत तर आश्लेषा अंकात ललित लेखन आणि ग्रंथप्रेमाच्या आसक्तीतून जे उपक्रम राबवले यावर बालपणापासून ते अलीकडे राबवण्यात येणाऱ्या पार्लेकट्ट्यापर्यंत असा 'सतत वाहणारा परिमळ' या नावाचा आत्मपर लेख लिहिला आहे. करोना काळात जुने कागदपत्र चाळताना ज्या आठवणी समोर आल्या त्यांचा 'आठवणींचा कोलाज' या लेखात परामर्श ताऱ्यांचे जग मध्ये घेतला आहे. याशिवाय दोन व्यक्तीपर लेखही त्यात प्रसिद्ध झाले आहेत. दर्याचा राजा या अंकात विंचू दंशावर संशोधन करून आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवलेल्या डॉ. हिम्मतराव बावसकर यांच्यावर त्यांचा लेख प्रकाशित झाला आहे. याशिवाय चौफेर समाचार या अंकात राजा राजवाडे यांचे विविध पैलू 'सूर्य नसलेलं आभाळ' या लेखातून उलगडले आहेत.

सरतेशेवटी कवयित्री, संपादक आणि प्रकाशक असलेल्या मधुवंती सप्रे यांच्या अक्षरगंध अंकाविषयी. अक्षरगंध या अंकाचे यंदाचे तेरावे वर्ष आहे. अंकात एकूण आठ वेगवेगळे भाग आहेत. या भागांतून अनेक विषय घेतलेले आहेत. युगकन्या लता या पहिल्या भागात मधुवंती सप्रे, अविनाश प्रभावळकर यांचा लेख आहे. इतर वेगवेगळ्या भागात देवगंधर्व भास्करबुवा बखले यांच्यावर शैला दातार आणि अजय मांजरेकर यांचे लेख आहेत. ज्येष्ठ लेखक मधु मंगेश कर्णिक याच्याविषयी डॉ. विलास खोले यांचा प्रज्ञावंत सुहृद हा लेख आहे. विलक्षण कर्तुत्वशालिनी या चौथ्या विभागात अहिल्याबाई रांगणेकर, रमाबाई आंबेडकर आणि भानू अथय्या यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे लेख आहेत. डॉ. मिलिंद बोकील आणि सुनील सुखटणकर यांचे लेख, तसेच मराठी भाषा आणि माझं मराठीपण हा भाग , सई परांजपे, दिपक घारे, शारदा लिमये, आशुतोष उकिडवे, ऐश्वर्य पाटेकर, राजीव जोशी, वारली भाषा आणि सामाजिक पैलू या विषयावर डॉ. सुधाकर चव्हाण यांची रेणुका माडीवाले यांनी घेतलेली मुलाखत अशा विविध लेखांनी भरलेला आहे. याशिवाय पद्य विभागही समृद्ध आहे.

तर ही आहे पारले आणि शेजारच्या उपनगरातील साहित्यिकांच्या समृद्ध साहित्याची थोडक्यात ओळख.


**मंजिरी वैद्य**

२६ वर्षांपासून टिळक मंदिराच्या श्री.वा. फाटक या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत.
manjiriav11@gmeail.com
९७६९० ६०४८४

# संगीतोपचार



> संगीतोपचार किती परिणामकारक आहे असे विचारल्यावर त्यांचे मत असे होते. "संगीत हे खर म्हणजे 'डिजिटल ड्रग' म्हणता येईल. विशिष्ठ राग हा एक सुरांचा समूह असतो."



**मिलिंद जोशी**

काहीतरी कधीतरी गुणगुणावेसे वाटले नसेल अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. संगीत हा आपल्या सर्वांच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग असतो. अजिबात सूरात गाता येत नसेल तरीही कोणीही शॉवर मध्ये गायला तयार असतोच. आपल्याला आवडते त्या संगीताने आपला मूड एकदम छान होतो हे नक्कीच. प्रत्येकाचे आवडणारे संगीत वेगळे असले तरी त्याचा त्याच्यावर चांगला परिणाम होऊ शकतो हे आज अनेक शास्त्रीय प्रयोगात सिद्ध झाले आहे.

माणसाला होणाऱ्या आजारापासून बरे करायला औषधे आणि मेडिकल तंत्रज्ञान जसे विकसित झाले आहे तसेच आपल्या शरिराला बरे करायला आपल्या मनाची मदत लागते हेही वारंवार सिद्ध झाले आहे. मनाची उभारी अनेक रोगांपासून बरे होण्यास मदत करते आणि मुख्य म्हणजे ती शरिराला सहनशक्ति प्रदान करते. रोगी बरे होण्याला त्याच्या इच्छा शक्तीचा मोलाचा वाटा सर्व डॉक्टर मान्य करतातच. थोडक्यात काय तर रोगांवर उपचार करण्यासाठी जशी औषधे लागतात तशीच मनाची मदत मिळवण्यासाठी संगीत वापरता येईल का यावर प्राचीन काळापासून अनेक संशोधने झाली आहेत. आपली प्राचीन परंपरा तर या बाबतीत समृद्ध आहेच तसेच विदेशातही यावरती बरेच संशोधन झाले आहे. यामध्ये Alzhimer's, stress management, dementia, insomnia आजारांवर तर अगदी क्लिनिकल टेस्टच्या निकषानुसार चांगले परिणाम दिसून आले आहेत. संगीतोपचार हा आता नुसता फॅड सारखा प्रकार न राहता एक नेहमीच्या उपचार पद्धतीतला एक अविभाज्य भाग (थेरपी) होत आहे. या विषयात खूप संशोधन होत आहे आणि पुढेही चालू राहील. यामध्ये औषधे न घेता फक्त संगीतोपचार घ्या असे कोणी म्हणत नाही पण औषधांच्या परिणामकतेला एक मोठी मदत म्हणून याकडे बघितले जाऊ लागले आहे.

आता परिणामकतेसाठी कुठच्या आजारासाठी कुठचे संगीत विशेष उपयुक्त ठरेल हा एक खूप गहन विषय आहे. प्रत्येक माणूस वेगळा आणि त्याच्या आवडी वेगळ्या असतात, परत प्रत्येक रोग वेगळा आणि

माणसाला झालेली लागण वेगळ्या स्टेजला असू शकते. त्यामुळे कुठच्याही तापावर जसे डॉक्टर paracetamol देतात तसे प्रत्येक रोगाला अमुक एकाच प्रकारचे संगीत असे करून चालणार नाही. म्हणूनच या थेरपीसाठी संगीतात अगदी पंडित असलेला माणूसच नीट उपाय देऊ शकतो.

संगीताचा परिणाम केवळ माणसावर होतो असे नाही. प्राणी आणि वनस्पती, झाडे यांच्यावरही संगीताचा खूप चांगला परिणाम होतो हे सिद्ध झाले आहे. शेतांमध्ये , द्राक्ष बागांमध्ये विशिष्ठ संगीत लावल्यावर उत्पादन जास्त येते असे सांगतात. गाईचे दूध काढताना जास्त पान्हा फुटावा यासाठी संगीत वापराचे प्रयोग होत आहेत. असे म्हटले जाते की श्रीकृष्ण, चरायला लांब गेलेल्या आपल्या गाई परत बोलावण्यासाठी बासरीचा वापर करत असे. समयोचित भीमपलास रागाचा उपयोग करत असे. असो.

आपल्या संस्कृतीत संगीताचे खूपच मोठे भांडार आहे. प्रत्येक सूर आणि ताल हा कसा वापरायचा याचे रागबद्ध नियम आहेत. प्रत्येक रागाचे स्वरूप, सुरावट, पकड आणि लय वापरुन एखादा मूड निर्माण करता येतो हे सिद्ध झाले आहे. अर्थात हे सगळे अजिबात सोपे किंवा अगदी सरळ नाही. केवळ जाणकार आणि सिद्ध संगीतकारच यावर अधिकारवाणीने सांगू शकतो. आजपर्यंत बऱ्याच संगीत विशारदानी संगीताचा विचार 'performing art' म्हणून जास्त केला आणि म्हणून संगीतोपचार या विषयावर पाहिजे तेव्हढे संशोधन झाले नाही. याला अपवाद अर्थातच आहेत. संगीतोपचार या वेगळ्या आणि कठीण वाटेवर यशस्वी प्रयोग करून मानाचे स्थान मिळवणाऱ्या एका संगीतकाराशी बोलून मिळालेली माहिती आपल्यासमोर मांडत आहे. मांडलेली मते ही त्यांची वैयक्तिक आहेत आणि मी त्याच्यावर बरोबर की चूक हे भाष्य करू शकत नाही. जिज्ञासूनी उपचार करण्यापूर्वी किंवा सुचवण्यापूर्वी स्वतः खातरजमा करावी.

आपण जाणून घेणार आहोत सरोद वादक पंडित विवेक जोशी यांचा प्रवास.



संगीतोपचार हा सामान्य माणसाला आनंद देतो, उपचार करतोच पण हाच संगीतोपचार मानसिक रुग्णांवर वापरला जाऊ शकेल असा वेगळा विचार सरोद वादक पंडित विवेक जोशी यांनी मांडला आणि चक्क ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटल मध्ये कार्यक्रम केला. तिथल्या डॉक्टर मंडळींच्या मतानुसार हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला. त्यांना तिथल्या रुग्णात मानसिक स्थितीत चांगले बदल दिसून आले. पंडित विवेक जोशी यांनी सांगितले की तिथले रुग्ण शांत बसून सरोद वादन ऐकत होते, त्याच बरोबर ते बरोबर जागांवर योग्य अशी दाद ही देत होते. हा अनुभव नक्कीच विलक्षण असणार. संगीतोपचाराचे परिणामकारकतेचे हे उदाहरण खूपच बोलके आहे. याचबरोबर कारागृहातील कैदी, कामाच्या तणावाखाली असणारे कामगार अशा विविध लोकांसाठी संगीतोपचार असे लोकविलक्षण प्रयोग राबवणारे पंडित विवेक जोशी नक्कीच कौतुकास पात्र आहेत.

पंडित विवेक जोशी तसे केमिस्ट्रीचे ग्रॅजुएट, घरची आयुर्वेद फार्मा औषधे बनवणारी कंपनी. असे असताना संगीतात रुचि असल्यामुळे आधी तबला, मेंडोलिन आणि नंतर सरोद असा त्यांचा प्रवास झाला. एकदा सरोद आवडल्यावर त्या मध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले. मैहर घराण्यामध्ये चार गुरूंकडे शिक्षण घेतल्यावर आज ते सुमधुर पद्धतीने सरोद हे कठीण वाद्य अप्रतिम वाजवतात. गेली तीस हून जास्त वर्षे सरोद वादनातून संगीतोपचार करत आहेत. सिंगापूरमध्ये सरोद वादनाचे कार्यक्रमात काही डॉक्टर्सनी प्रोत्साहित केल्यामुळे त्यांचा या विषयावर अभ्यास सुरू झाला. मग भारतातल्या अनेक हॉस्पिटल्स आणि जाणकार यांच्याशी चर्चा आणि प्रयोग झाले. सध्या ते अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये स्ट्रेस मॅनेजमेंट, काऊनसेलिंग, इवेंटस् आणि हॉस्पिटल्स मध्ये संगीतोपचार देत आहेत. त्यांना आजवर बरेच पुरस्कार मिळाले आहेत. पुण्यात 'गानवर्धन' पुरस्कार, बांद्रा क्लबचा 'रोटरी एक्सेलंस अवॉर्ड', 'ट्रान्स आशिया चेंबर ऑफ कॉमर्स अवॉर्ड' असे बरेच. याच बरोबर अमेरिकेतील मेडिकल जर्नल मध्ये त्यांची माहिती छापून आली आहे.

संगीतोपचार किती परिणामकारक आहे असे विचारल्यावर त्यांचे मत असे होते. ' संगीत हे खर म्हणजे 'डिजिटल ड्रग' म्हणता येईल. विशिष्ठ राग हा एक सुरांचा समूह असतो. वादी, संवादी, टेम्पो किंवा गती, पकड, स्वर ठेहेराव हे सर्व मिळून रागाची रस निर्मिती होते. हा holistic approach आहे जो शरीर, मन, बुद्धी आणि आत्म्या वर एकाच वेळी काम करतो. चित्त शांत होते, आनंदाची निर्मिती होते, positivity वाढीला लागते. रोग्याला जगण्याची, बरे होण्याची इच्छाशक्ती निर्माण करते. प्रत्येक रागामध्ये एक विशिष्ठ




सुरावटीमुळे एक वेगळा मूड निर्माण होतो आणि त्याचा उपयोग मनावर होतो. यामध्ये vocal पेक्षा instrumental जास्त प्रभावी ठरते.

आपल्या मानवी शरीरात ७ चक्रे मानली गेली आहेत. प्रत्येक चक्र विशिष्ठ भागांशी निगडीत असते. यांच्या अनुसार प्रत्येक रोगासाठी कुठच्या चक्राचा विचार करायचा ते ठरते. प्रत्येक राग हा therapeutic आहे कारण तो biological clock प्रमाणे तयार केला आहे. कोमल स्वर झोप देतात आणि शुद्ध स्वर ताजेपणा देतात. प्रत्येक रागात वापरलेल्या सुरांमुळे त्याचा एक विशिष्ठ असा परिणाम होणे स्वाभाविकच आहे."

ते कुठचेही नवीन आव्हान घ्यायला कायम तयार असतात. संगीतोपचार या विषयात त्यांच्या समोर खूप योजना आहेत आणि ते सतत कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या सर्व उपक्रमात यश मिळो ही सदिच्छा.

पंडित विवेक जोशी यांच्या व्यतिरिक्त देशी आणि विदेशी संगीतकारांचे संगीत या विषयात संशोधन चालू आहे. इतर काही संगीतकारांचे अनुभव आणि कार्य याहूनही इतके मोठे आहे की प्रत्येकाच्या कार्याबद्दल स्वतंत्र मोठा लेख लिहावा लागेल. या अंकात तूर्त एव्हढेच. पुढील लेखाची प्रतीक्षा करा.

**मिलिंद जोशी**

आय आय टी इंजिनियर, संगीताचे अभ्यासक आहेत. कॉर्पोरेट जगतात मोठ्या भूमिका यशस्वीरीत्या पार पाडून आता त्यांची कला आणि साहित्यात मुशाफिरी चालू आहे. सध्या ललित लेखन आणि स्ट्रयाटेजी कन्सल्टिंग करतात.

milind547@gmail.com

९८१९७ ९७२५८

# वळणावरती

त्या मधल्या वळणावरती,
झाडांची हिरवी पलटण ।
सळसळती झुलती पाने
अन् फिरतो वारा वणवण ।।

त्या मधल्या वळणावरती
वेलींच्या गर्द कमानी ।
रांगोळी रेखित बसते
ऊन ओले आरस्पानी ।।

त्या मधल्या वळणावरती
वाटही अल्लड होते ।
वय स्वप्नाळू सोळावे
धावत पुढ्यात येते ।।

त्या मधल्या वळणावरती
येतो बकुळ फुलांचा गंध ।
उरी दडवुनि आर्त विराणी
वारा दरवळतो धुंद ।।

**सविता दामले**
९९३०३ ११५४६

# अरे माणसा

अरे माणसा माणसा
किती तुझा रे हव्यास
भले तुझ्या स्वार्थासाठी
ओढविशी सर्वनाश

भरभरुन दिले तुला
निसर्गाने देणे
घे खुशीने पदरात
कर कष्टाने रे सोने

कुणी धरुन विश्वास
तुला दिले अधिकार
जप त्यांची मने
राख मतांचा रे मान

नको उतुस मातुस
ये भानावरी जरा
कर तयांचे रक्षण
ज्यांना तुझा रे आसरा

माणसा माणुसकी रे
न होवो कधी परागंदा
तुझ्या जगण्याला आता
लाव माणुसकीचा लळा

**अल्पना कशाळकर**
९८२०७ ४८६४४

# Will you and your family be richer in 2023?

**Insure** Protect Life, Health

**Invest** Balance growth & risk

**Income** Tax free for Lifetime

## INSURANCE & WEALTH ENGINEER ™

INSURANCE AND WEALTH ENGINEER ™

Arvind Prabhu
9967632222 Mumbai
Licentiate Insurance

Top 1% in the world

**Higher tax benefits for Business Owners, NRIs and Government employees. Call.**

# Hurry UP !

**Builders, Developers, Banks, Financial Institutions & Allied Products & Services**

**Limited Stalls**

**Expected Footfall : 15000+**

PROPERTY EXHIBITION

# Gruh Mahotsav

ONE STOP SOLUTION

**Only RERA Registered Projects have to be showcased in the Expo**

**BOOK YOUR STALL NOW**

January 20 21 22 2023

**Organised by**

लोकमान्य सेवा संघ, पारले १०० शताब्दी वर्ष २०२२-२०२३

पार्ले BAZAAR www.parlebazaar.com

**Lokmanya Seva Sangh, Parle & Parle Bazaar**

**Contact us : 81698 25961 / 93218 29681**

**Email : gruhmahotsav@gmail.com**

**@gruhmahotsav • www.gruhmahotsav.com**

**Venue : Lokmanya Seva Sangh, Parle**

**Ram Mandir Road, Vile Parle (East), Mumbai 400057**

ACE GRAPHICS